# आमचें पुण्यक्षेत्र (काशी).

हें पुस्तक,

**विश्वनाथ बापूजी घोपेश्वरकर**

यांनीं केलें

तें

मुंबई येथें,

'इंदुप्रकाश' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८२२; सन १९००.

किंमत १ रुपया.

[ हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून कर्त्यानें सर्व हक्क आपल्याकडे राखिले आहेत. ]

2/226

# अर्पणपत्रिका.

हिज् एक्सेलेन्सी

## संभाजीराव बाबूराव आंग्रे

वजारत, माब, सवाई, सरखेल, फर्स्टक्लास

सरदार, ग्वाल्हेर.

यांस

त्यांच्या ठायीं असलेल्या अनेक गुणांचें

अभिनंदन करण्याकरितां हा ग्रंथ

कर्त्यानें त्यांच्या परवानगीनें

अत्यंत आदरपूर्वक

अर्पण केला आहे.

# प्रस्तावना.

१. हें लहानसें पुस्तक लिहून आज सुमारें ८ वर्षें झालीं, परंतु कांहीं अडचणीमुळें आजपर्यंत प्रसिद्ध करितां आलें नाहीं. आजपर्यंत महाराष्ट्र भाषेंत **काशीक्षेत्रवर्णन**-युक्त मूळ दोन तीन लहान पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, पण त्यांत यात्रावर्णन पुष्कळसें असून ऐतिहासिक माहिती फारच थोडी आहे, किंबहुना नाहीं ह्मटलें तरी चालेल. हें पुस्तक निराळ्या धर्तीवर लिहिलें आहे, हें पुस्तकावलोकन केल्यानें विद्वज्जनांचे लक्षांत येईल. ज्याप्रमाणें प्राचीनकालीं रोम, अॅथेन्स वगैरे नामांकित शहरें इतिहासांत गाजलीं; इतकेंच नव्हे, परंतु कांहीं कालपर्यंत त्यांचा राजकीयदृष्ट्या अन्य राष्ट्रांवर पगडा होता, त्याचप्रमाणें राजकीयदृष्ट्या जरी नाहीं तरी धर्मदृष्ट्या काशीक्षेत्र हें पुरातन कालापासून आर्यधर्माचा एक मजबूत किल्ला आहे; व हा किल्ला आजतागाईत सर करण्याकरितां अन्य धर्मानुयायांनीं अनेक वेळां खटपट केली—भगीरथ यत्न केले, पण या किल्ल्याला किंचित देखील धक्का पोहोंचला नाहीं! तात्पर्य हें क्षेत्र पुरातन कालापासून इतिहासप्रसिद्ध आहे.

ज्या क्षेत्रांत शंकराचार्यासारखे धर्मस्थापक, बुद्धासारखे ज्ञाते, तुलसीदासासारखे कवि, जगन्नाथरायासारखे पंडित होऊन गेले–ज्या क्षेत्राच्या प्रत्येक स्थलाची,–प्रत्येक तीर्थाची,–प्रत्येक कूपाची कांहींना कांहीं तरी आख्यायिका आहेच, व ज्यांवर बहुजनसमाजाची भक्तिपूर्वक श्रद्धा आहे,–जें क्षेत्र अवलोकन करण्यास्तव दूर देशांतून प्रतिवर्षी शेकडों लोक येतात, व अनेक श्रद्धाळु लोक संसारत्याग करून केवळ 'काशीवास' घडेल या हेतूनें वृद्धावस्थेंत काशींत येऊन राहतात–अशा ह्या क्षेत्राचें ऐतिहासिक स्थलवर्णन–( मग तें अल्प कां होईना ) महाराष्ट्रभाषाभिज्ञ जनांपुढें ठेविलें असतां 'अंशांत अंश' ह्मणीप्रमाणें मातृभाषेची अल्पसेवा केल्यासारखें होईल व मराठी भाषेच्या ग्रंथमालेंत 'फुलांत पाकळी' या न्यायानें थोडीशी तरी भर पडेल या उद्देशानें प्रवास वर्णनादि ग्रंथांत मी हें एक पुष्प गोंविलें आहें. हा उद्देश कितपत् सफल झाला आहे हें निर्णय करण्याचें काम मी वाचकांवरच सोपवितों.

२. या पुस्तकांतली माहिती इंग्रजी ग्रंथांच्या आधारें घेतली आहे हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. तथापि त्यांतल्यात्यांत शेरिंगकृत Sacred city of the Hindus या पुस्तकांतून मला पुष्कळ माहिती मिळाली. हें पुस्तक प्रसिद्ध होऊन आज जरी ३०–४० वर्षें झालीं आहेत व इतक्या अवधींत काशींत अनेक उलाढाली झाल्या आहेत,–पुष्कळ स्थित्यंतर झालें आहे, तरी तें वाचलें असतां आजकालच्या स्थितीलाच उद्देशून लिहिलें आहे कीं काय

असा भास होतो. शिवाय या पुस्तकांत या क्षेत्राची फार काळजीपूर्वक माहिती दिलेली आहे, व तिचा मी प्रसंगोपात् पुष्कळ स्थलीं उपयोग केला आहे; ह्मणून मी या ग्रंथकाराचा फार उपकारी आहे. तसेंच मराठी भाषेंत झालेल्या पुस्तकांपैकीं जीं माझे पाहण्यांत आलीं त्यांतूनही थोडीशी माहिती घेतली आहे; विशेषेंकरून थोड्या वर्षांपूर्वीं '**केसरी**' पत्रांत "**उत्तर हिंदुस्थानचा प्रवास**" या सदराखालीं आलेल्या मजकुराचा उपयोग मी दुसऱ्या भागांत आणि भाग १ २ यांत बराच केला आहे. तसेंच हंटरकृत गॅझेटीअर व अनेक इंग्रजी बुकें, ज्यांचा स्थलप्रसंगीं मी उल्लेख केलाच आहे, या सर्वांचा मी आभारी आहे. याशिवाय जी माहिती दिली आहे ती अगदीं स्वतःच्या अनुभवावरून होय. कर्मधर्मसंयोगानें माझें वास्तव्य जवळ जवळ तीन वर्षें **काशींत** झालें. इतक्या अवधींत अनेक गोष्टी माझे अवलोकनांत आल्या; लोकस्थिति पूर्णपणें लक्षांत आली; अनेक स्थलांविषयीं अनेक गोष्टी ऐकल्या. त्या सर्वच पुस्तकांत देतां आल्या नाहींत. परंतु ज्या देण्यासारख्या वाटल्या त्या क्वचित्प्रसंगीं स्वानुभवावरून दिल्या आहेत. तसें करतांना कोणत्याही विशिष्ट पंथाचें अनुकरण न करितां क्षेत्राची वस्तुस्थिति काय आहे हें होतांहोईल तितकें कोणत्याही व्यक्तीस अथवा वर्गास उद्देशून न लिहितां प्रसंगोपात् योग्य व वाजवी टीका करून वाचकांपुढें ठेविली आहे. पण जाणूनबुजून बहुजनांचीं मनें दुखविण्याच्या इराद्यानें नव्हे; तर त्यांत सुधारणा होणें इष्ट आहे एवढाच उद्देश आहे. पुस्तकांतील सर्वच पौरा-

णीक गोष्टींवर माझी श्रद्धा आहे व ह्मणून मी त्या येथें दिल्या आहेत अशांतूलाही प्रकार नाहीं. तर अ-मक्या स्थलाविषयीं लोकमत काय आहे हें महाराष्ट्र लोकांपुढें ठेवण्याचा या पुस्तकांत यत्न केला आहे.

३. सुमारें तीन वर्षांपूर्वी मी पुण्यांत असतांना या पुस्तकाची हस्तलिखित प्रत के० रा. सा. **नारायण बाळकृष्ण गोडबोले**, बी. ए. व **अच्युत सीताराम साठे**, एम्. ए; बी. एल. ( त्यावेळीं एम्. ए. ) या दोघां विद्वज्जनांस दाखविली होती. त्यांनीं मला अनुकूल असेंच मत दिल्यावरून पुस्तक प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रबल झाली. पैकीं रा. सा. **ना. बा. गोडबोले** हे थोड्या दिवसांपूर्वी परलोकवासी झाले ह्मणून या स्थलीं त्यांचें दुःख प्रदर्शित केल्यावांचून माझ्याच्यानें राहवत नाहीं. त्यांनीं मला ज्या अनेक उपयुक्त सूचना केल्या त्याप्रमाणें फेरफार करून मीं हें पुस्तक लिहिलें आहें.

४. या पुस्तकांतलीं दोन प्रकरणें ह्मणजे भाग पहिला आणि भाग १४ वा हे मुंबईतील सुप्रसिद्ध '**इंदुप्रकाश**' पत्रांत इ. स. १८९२ चे मार्च व एप्रिल महिन्यांत प्रसिद्ध केले होते. त्यांत थोडासा फेरफार करून ते जसेच्या तसे या पुस्तकांत दिले आहेत. तसेंच '**भारतधर्ममहामंडल**' सभेची हकीकत त्याच सुमारास मीं प्रसिद्ध केली होती; परंतु ती हकीकत येथें देणें अनावश्यक वाटल्यावरून तो भाग या पुस्तकांतून मीं मुळींच गाळून टाकला आहे.

५. नौकरीसंबंधीं माझें राहणें आजकाल येथें अस-

त्यामुळें व पुस्तक छापण्याचें काम मुंबईत झाल्यामुळें या पुस्तकांत कांहीं स्थळीं अशुद्धें राहिलीं आहेत; त्यास इलाज नाहीं. सबब वाचकांस इतकीच विनंति आहे कीं, शेवटीं दिलेल्या शुद्धिपत्रावरून पुस्तक शुद्ध करून नंतर वाचावें.

६. या प्रसंगीं इतकें सांगणें मात्र अवश्य वाटतें कीं, हें पुस्तक छापविण्याच्या कामीं येथील माझ्या मित्रमंडळींनीं मला अनेक प्रकारें सहाय्य केलें, व येथील सन्माननीय गृहस्थ रा. रा. भिकाजी कृष्ण रानडे यांनीं एक दोन ठिकाणीं उपयुक्त सूचना केल्या, व रा. रा. मंगेशराव लाड यांनीं पुस्तक छापविण्याविषयीं मला मनोभावानें प्रोत्साहन दिलें; आणि तसेंच हें पुस्तक तपासण्याचे कामीं माझे मित्र रा. रा. बळवंत नारायण कुळकर्णी व रा. रा. गणेश श्रीधर साठे यांनीं बरीच मेहेनत घेतली, ह्मणून या सर्वांचा मी आभारी आहें.

७. ही प्रस्तावना संपविण्याचे पूर्वीं ज्या सद्गृहस्थांस हें पुस्तक अर्पण केलें आहे, त्यांनीं या पुस्तकास चांगला उदार आश्रय दिला व ह्मणूनच हें पुस्तक बाहेर पडलें आहे; याबद्दल मी त्यांचे जितके उपकार मानावेत, तितके थोडेच आहेत.

८. सरतेशेवटीं हें पुस्तक छापविण्याचे कामीं इंदुप्रकाश प्रेसचे मॅनेजर यांनीं बरीच मेहनत घेऊन झटून काम

केलें व बडोद्यांतील चित्रकार, रा. रा. **गणेश नारायण डांगे** यांनीं वेळेवर चांगलीं चित्रें तयार केलीं, ह्मणून या दोघां गृहस्थांचे आभार मानून ही लांबलचक प्रस्तावना पुरी करितों.

मु. झांशी,
ता. १ फेब्रुवारी सन १९०० } **ग्रंथकर्ता.**

## ह्या पुस्तकावर कांहीं विद्वान् लोकांचे

# अभिप्राय.

रा. रा. **वि. वा. धोपेश्वरकर** यांसः-

सा. न. वि. वि. तुह्मी केलेल्या 'आमचें पुण्यक्षेत्र (काशी)' नांवाच्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत मी साग्र वाचिली. * * * * * * एकंदरींत हा ग्रंथ इंग्लिश लोकांच्याच नव्हे तर सर्व लोकांच्या आश्वास पात्र झाला आहे. पुस्तकांत माहिती संस्कृत ग्रंथांतून व इंग्रजी ग्रंथांतून दिलेली बरीच पाहण्यांत आली. शिवाय पुस्तकांतील विचार हल्लींच्या काळाला अनुरूप असेंच आहेत. पुस्तकाची भाषा बरीच जोरदार आहे. एणेंप्रमाणें माझें झालेलें मत मी तुह्मांस मोठ्या संतोषानें कळवित आहे. लोभ असावा हे विनंति.

पुणें, पेठ सदाशिव ता. २५-६-९६.

**ना. बा. गोडबोले** बी. ए.
पुणें ट्रेनिंग कॉलेजांतील व्हाइस प्रिन्सिपाल.

---

सा. न. वि. वि. आपण कृपा करून आपल्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत अभिप्रायाकरितां पाठविली ती पावली. पुस्तकाचे कांहीं भाग मी वाचून पाहिले; त्यावरून हे पुस्तक चांगलेंच साधलें आहे व महाराष्ट्र सरस्वती मंदिरांत चांगल्या ठिकाणीं शोभेल असें मला वाटतें. काशीक्षेत्र हें सर्वत्र प्रसिद्ध असून रोमप्रमाणेंच याची अविनाशित्वाबद्दल ख्याती आहे. इंग्रजी बंगाली व इतर बऱ्याच भाषांत ह्याचीं वर्णनपर पुस्तकें प्रसिद्ध झालीं असून भाविकजनांना ह्या शहराच्या बाह्यांतर्गत स्वरूपाची साक्ष पटवीत आहेत. असें

असून नाणावलेल्या महाराष्ट्र भाषेंत या संबंधानें चांगलें पुस्तक नसावें हा आमच्या वाङ्मयावर मोठाच डाग होता व तो आपण बहुतेक अंशीं नाहींसा केला हें आपणास कळविण्यास मला फारच आनंद वाटतो. आपल्या हातून अशींच आणखी इतर पुस्तकें बाहेर पडून देशभाषेची सेवा घडो असें मी इच्छितों.

पुणें—ता. १-९-१८९६ } अच्युत सीताराम साठे, एम्. ए.
प्रो. महाराष्ट्र कॉलेज—पुणें.

---

सा. न. वि. वि. 'आमचें पुण्यक्षेत्र (काशी)' ह्या पुस्तकाचा बराच भाग मीं वाचून पाहिला. हें पुस्तक ठिकठिकाणच्या माहितीनें व वर्णनानें भरलेलें असून त्यांत ग्रंथकारानें आपले सामाजिक व नैतिक विचार मोठ्या चातुर्यानें गोंविले आहेत; त्यामुळें हें पुस्तक यात्रेकरूंस तर उपयोगी आहेच; परंतु सामान्य वाचकांसही मनोरंजन होण्यासारखें आहे. अशा प्रकारच्या पुस्तकांची मराठी भाषेंत उणीव आहे व ती भरून काढण्याचा रा. रा. विश्वनाथ बापु यांचा हा प्रथम प्रयत्न आहे. त्यांस उत्तेजन मिळाल्यास ह्याहूनही अधिक उपयुक्त व मनोरंजक ग्रंथ हे गृहस्थ लिहितील अशी माझी खात्री आहे.

लष्कर—ता. १४-२-१९०० } सदाशिव गोपाळ परचुरे, बी. ए.
सुपरींटेंडंट सरदार स्कूल, लष्कर.

---

# विषयानुक्रम.


पृष्ठें.

उपोद्घात. ... ... ... ... ... ... १–६

## भाग १ ला.

### काशीक्षेत्राचें प्राचीनत्वः—

काशीक्षेत्र आर्यधर्माचें आदिपीठ आहे–इतिहासाचा अभाव–पुराणें गेल्या दोन हजार वर्षांतलीं आहेत–काशीखंड पुराण–कालाविषयीं अज्ञान–बुद्धाचें चरित्र–बौद्ध मताचा प्रसार अशोक राजाचे कारकिर्दीत झाला–हुऐनसँगचें काशीक्षेत्रवर्णन–आर्यांचें मूळस्थान–हिंदुस्थानांत प्रवेश व गंगातीरीं वसाहत–पूर्व कालीं हें क्षेत्र सुधारणेच्या शिखरास पोहोंचलें होतें. ... १—१४

## भाग २ रा.

### क्षेत्राची रचनाः—

क्षेत्राची सीमा पंचक्रोशी होय–नौकेतून अवलोकन केलें असतां क्षेत्राचा देखावा–लॉर्ड मेकालेकृत वर्णन–गंगोदकाचा गुण–डफरिन् ब्रिज्–क्षेत्राचे विभाग–बुटी ऊर्फ भांगेची चाल–लोकवस्ती–नेपाळी लोक–त्यांचे पोशाख वगैरे. ... ... ... ... ... १५—२९

## भाग ३ रा.

पृष्ठें

**शिवालयांची शोचनीय स्थितिः—**

पौराणिक मताचा उत्कर्ष—मूर्तिपूजेसंबंधीं रिकामा वाद—मुख्य देवता—शिवालयाचा रेलचेल—मंदिरांची संख्या—काशींतले पंडे—यात्रेकरूंना त्रास—घाटे अथवा गंगापुत्र. २९—३९

## भाग ४ था.

**काशींतील प्रसिद्ध देवालयेंः—**

विश्वेश्वर—विश्वेश्वराचा दरबार—मंदिर अर्वाचीन असून प्राचीन स्थानीं मशीद आहे—मशिदीचें वर्णन—ज्ञानवापि—तत्संबंधीं कथा—बायजाबाईचें दालन—नेपाळच्या राजानें विश्वेश्वरास अर्पण केलेला नंदी—शनैश्वर—शुक्रेश्वर—धुंडिराज—साक्षीविनायक—काशीकर्वतकूप.... ४०—४९

## भाग ५ वा.

**प्रसिद्ध देवालयें ( घाट वर्णन ):—**

मणिकर्णिका तीर्थ व कथा-चक्रपुष्करणी तीर्थ-हरिश्चंद्राची मढी—त्या विषयीं पौराणिक कथा—काशींतील संन्यासी—अमेटीच्या राजाचें मंदीर—बायजाबाईचा घाट.... ४९—५६

## भाग ६ वा. पृष्ठें.

प्रसिद्ध देवालयें ( पुढें चालू ):—

दशाश्वमेधघाट व त्याची कथा—दिवोदास राजाची कथा—चौसष्टीदेवी व त्यांविषयीं कथा—सोमेश्वर—मानमंदिर-घाट—वेध शाळेचें वर्णन—दिवोदासेश्वर. ... ... ५७—६६

## भाग ७ वा.

प्रसिद्ध देवालयें ( पुढें चालू ):—

पंचगंगाघाट—बिंदु माधव·औरंगजेबचे मनोरे—त्यांचें वर्णन—वायकांचा विठोबा—काळभैरव देऊळ-दंड पाणी—वृद्धकाळ-दक्ष राजाची गोष्ट—रत्नेश्वर—गोपाळ मंदिर. ... ... ... ... ... ... ६६—७५

## भाग ८ वा.

प्रसिद्ध देवालयें ( समाप्त ):—

त्रिलोचन घाट—पौराणिक कथा—यमयातनेचा देखावा—कामेश्वर—बडा गणेश—पिशाचमोचन तीर्थ व कथा—ज्वर हारेश्वर—सिद्धेश्वर. ... ... ... ... ७८—८३

## भाग ९ वा.

महाराष्ट्रवस्ती:—

प्रामण्य प्रकार·काशीकरांची स्थिति·काशी हें हिंदुस्थानचें ऑक्सफर्ड—अध्ययनाची पद्धति—काशींतील विधवा—त्यांवर आक्षेप—काशीकरांचा स्वभाव—निरुद्योगी लोक—अन्नसत्रें—त्यांचा दुरुपयोग—अन्नसत्रचालकांस सूचना. ८४—९८

भाग १० वा. पृष्ठें.

इतर देवालयें:—

केदारेश्वर व त्याविषयीं कथा—तिलभांडेश्वर—बंगाली लोक—त्यांच्या चाली—संमति कायद्याला हेच लोक कारणीभूत झाले—दुर्गेचें देवालय—दुर्गेची पौराणिक कथा—राममंदिर—तत्संबंधीं झालेल्या दंग्याचा वृत्तांत—लोलार्क कूप. ... ... ... ... ... ९९—११४

भाग ११ वा.

वरुणासंगम:—

आदिकेशवाचें स्थान—या स्थानाचें महात्म्य-लाट भैरव—यासंबंधीं हिंदुमुसलमानांत झालेला दंगा... ... ११५—१२०

भाग १२ वा.

पंचक्रोशीयात्रावर्णन:—

पंचक्रोशी रस्त्याचा इतिहास—गबिन्ससाहेबांविषयीं स्मरणीय गोष्ट—नंगे वैरागी—परमहंस तैलंगस्वामी—पंचक्रोशी यात्रावर्णन. ... ... ... ... १२१—१२८

भाग १३ वा.

रामनगर ऊर्फ व्यासकाशी:—

राजघराण्याचा वृत्तांत—चेतसिंगाच्या दंग्याची हकीकत—राजवाड्याचें वर्णन—दुर्गेचें देवालय—व्यासकाशी—व्यासेश्वर—त्याविषयीं कथा. ... ... ... १२९—१४०

## भाग १४ वा. पृष्ठें.

कार्शीतील मेळे. ... ... ... ... १४१–१५६

## भाग १५ वा.

सारनाथवर्णनः—

प्राचीन शिल्प कलेचें ज्ञान करून घेण्यास काशीक्षेत्र योग्य स्थल आहे–बौद्ध लोकांची सारनाथाविषयीं पूज्य बुद्धि–हुएनसँगकृत वर्णन–मे. ज. कनिंगह्यामचे शोध. १५७–१६५

## भाग १६ वा.

कार्शीतील शिक्षणसंस्थाः—

क्वीन्स कॉलेज–संस्कृत व इंग्लिश डिपार्टमेंट–शिलास्तंभाची माहिती–विद्वान् अध्यापक–सेंट्रल हिंदू कॉलेज–या संस्थेचा उद्देश–कॅर्मायकल लायब्ररी–उपयुक्त समाज. ... ... ... ... ... ... १६६–१७३

## भाग १७ वा.

काशीयात्रेविषयीं चार शब्द. ... ... १७४–१८८

## भाग १८ वा.

उपसंहार. ... ... ... .... ... ... १८९–१९२

परिशिष्ट–अ. ... ... ... ... ... १९३

# चित्रानुक्रम.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | विश्वेश्वरावरील सोनेरी घुमट. (मुखपृष्ठ) | |
| २ | श्री. स. संभाजीराव आंग्रे. | |
| ३ | अर्धचंद्राकृति देखावा. .... .... .... | ५० |
| ४ | मणिकर्णिका घाट. .... .... .... | ५४ |
| ५ | अमेठीच्या राजाचें शिवालय. .... .... | ५६ |
| ६ | औरंगजेबाचे मनोरे .... .... .... | ६९ |
| ७ | श्री. परमहंस तैलंग स्वामी. .... .... | १२४ |
| ८ | सारनाथ—बुरुज. .... .... .... | १६३ |

# उपोद्घात.

प्राचीनकालीं या भरतखंडांत अनेक लहान मोठीं राज्यें होतीं, पैकीं कांहीं स्वतंत्र व कांहीं मोठ्या राजाच्या अंकीत असत, ही गोष्ट पुराण परीक्षणावरून चांगली व्यक्त होते. पुराणांतरीं **हस्तिनापूर, कनोज, अयोध्या, मथुरा** व **वाराणसी** हीं राज्यें प्रसिद्ध आहेत. या राज्यांत नेहमीं कलह व लढाया होत असत हें देखील **महाभारत** अथवा **रामायण** यांवरून चांगलें सिद्ध होतें. काशी (वाराणसी) राज्याविषयीं बहुतेक पुराणांत थोडा-बहुत उल्लेख आढळतो. **वामन** पुराणाचे तिसरे अध्या-यांत काशी क्षेत्राचें पुढील थोडें वर्णन आहे.

**हरिरुवाच.**

महेश्वर शृणुष्वेमां मम वाचं कलस्वनाम् ।
ब्रह्महत्याक्षयकरीं शुभदां पुण्यवर्धिनीम् ॥
योऽसौ ब्रह्माण्डके पुण्ये मदंशप्रभवोऽव्ययः ।
प्रयागे वसति नित्यं योगशायीति विश्रुतः ॥
चरणाद्दक्षिणात्तस्य विनिर्गता सरिद्वरा ।
विश्रुता वरणेत्येव सर्वपापहरा शुभा ॥
सव्यादन्या द्वितीया च असिरित्येव विश्रुता ।
ते उभे च सरिच्छ्रेष्ठे लोकपूज्ये बभूवतुः ॥
तयोर्मध्ये तु यो देशः स क्षेत्रं योगशायिनः ।
त्रैलोक्यप्रवरं तीर्थं सर्वपापप्रमोचनम् ॥
न तादृशं हि गगने न भूम्यां न रसातले ॥

तत्रास्ति नगरी पुण्या ख्याता वाराणसी शुभा ।
यस्यां हि भोगिनो नाशं प्रयान्ति भवतो लयम् ॥

येणेंप्रमाणें वर्णन आहे. त्याचप्रमाणें रामायणांत देखील उत्तरकांडांत रामचंद्राचा व काशीपति प्रतर्दन राजाचा खालीं लिहिल्याप्रमाणें संवाद आहे.—

तं विसृज्य ततो रामो वयस्यमकुतोभयम् ॥
प्रतर्दनं काशीपतिं परिष्वज्येदमब्रवीत् ॥ १५ ॥
दर्शिता भवता प्रीतिर्दर्शितं सौहृदं परम् ॥
उद्योगश्च त्वया राजन् भरतेन कृतः सह ॥ १६ ॥
तद्भवानद्य काशेयपुरीं वाराणसीं व्रज ॥
रमणीयां त्वया गुप्तां सुप्राकारां सुतोरणाम् ॥ १७ ॥
एतावदुक्त्वा चोत्थाय काकुत्स्थः परमासनात् ॥
पर्यष्वजत धर्मात्मा निरंतरमुरोगतम् ॥ १८ ॥
विसर्जयामास तदा कौसल्याप्रीतिवर्धनः ॥
राघवेण कृतानुज्ञः काशेयोह्यकुतोभयम् ॥ १९ ॥
वाराणसीं ययौ तूर्णं राघवेण विसर्जितः ॥

(सर्ग ३८.)

वरील उताऱ्यावरून एक सिद्धांत अगदीं निर्विवादपणें स्थापित होतो कीं, वाराणसी राज्याची काशी ही राजधानी होती. वायु पुराणांतही या क्षेत्रासंबंधीं पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आढळतो.

आतां अर्वाचीन इतिहासाप्रमाणें आमचीं पुराणें जरी समजलीं जात नाहींत; व त्यांत जरी अतिशयोक्तीच्या पुष्कळ गोष्टी आढळतात, तरी कोणत्याही स्थलाची ऐति-

हासिक माहिती मिळविणें झाल्यास आजकाल दुसरें कांहींच साधन उपलब्ध नसल्यामुळें पुराणें हाच आधार समजून त्यांपासून चाळून माहिती मिळवूं असें जर कोणी ह्मणेल तर त्यास थोडाबहुत फायदा होण्यासारखा आहे, व या न्यायानें पुराणांत वर्णन केल्याप्रमाणें या क्षेत्राचा पहिला राजा **काश** नामें कोणी होता. त्याचे पश्चात् **काशय** व नंतर दीर्घतप, धर्म, धन्वंतरी, केतुमत, भीमरथ व दिवोदास वगैरे काशीपति एकामागून एक झाल्याविषयीं अनेक पुराणांत उल्लेख आढळतो. पुढें कालांतरानें अजातशत्रु नांवाचा एक पराक्रमी राजा होऊन गेल्याविषयीं लेख आहे, व **कथासरित्सागरमधील ब्रह्मदत्त** काशीराजाविषयीं तर अनेक कथा प्रसिद्धच आहेत.

या राजांविषयीं पुराणांत जरी पुष्कळ वर्णन आहे, तरी यांचा काल निश्चयात्मक सांगणें कठीण आहे. दिवोदास राजाविषयीं **वायुपुराण, ब्रह्मपुराण, हरिवंश** इत्यादि पुराणांत मनोरंजक कथा वर्णन केल्या आहेत; आणि **काशीखंड** पुराणांत याचें लांबलचक चरित्र वर्णन दिलें आहे. याचे कारकिर्दींत काशींत बौद्ध धर्माचा प्रसार पुष्कळ झाला होता, व हा स्वतः बौद्धमताचा होता, असें काशीखंड पुराणपरीक्षणावरून अनुमान निघतें.

गौतमबुद्धानें सुद्धां **काशींत** राज्य केल्याविषयीं पालिभाषेंतील कांहीं ग्रंथांत उल्लेख आहे. परंतु हें चुकीचें वाटतें. कारण त्याच्या चरित्रावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, ज्या सत्पुरुषानें नवीन मत स्थापन करण्या-

करितां राजकुलांत जन्म झाला असतांही, व त्यावर त्याचा हक्क असतांही त्याचा त्याग करून वैराग्यशाली झाला, असा पुरुष राज्यतृष्णेला वश होऊन त्यानें काशींत राज्य केलें असावें हें अगदीं संभवनीय वाटत नाहीं. सारांश आमचीं पुराणें व बौद्धांचे उपलब्ध ग्रंथ यांच्या परीक्षणावरून या क्षेत्रासंबंधीं फार प्राचीन माहिती आजपर्यंत फारच थोडी उपलब्ध झाली आहे असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

इ. स. चे पांचव्या व सातव्या शतकांत दोघे चिनी प्रवासी या देशांत प्रवासाचे हेतूनें आले होते. त्यांचें काशीक्षेत्रवर्णन प्रसंगानुसार या पुस्तकांत दिलेंच आहे. परंतु हें देखील वर्णन ख्रिस्ताच्या नंतरचें आहे. त्याच्या पूर्वींचा इतिहास मुळींच अवगत होत नाहीं.

इ. स. चे दहाव्या शतकांत गिझनीचा बादशाहा सुलतान महंमद यानें काशीवर स्वारी केल्याविषयीं मुसलमान लोकांच्या ग्रंथांत वर्णन आहे. पुढें सन ११९४त शहाबुद्दीन घोरीनें काशीक्षेत्रावर स्वारी करून सुमारें १००० मंदिरांचा विध्वंस केल्याविषयीं देखील हिंदुस्थानच्या इतिहासांत§ आधार सांपडतो. यापुढें हें क्षेत्र सुमारें ६०० वर्षेंपर्यंत ह्मणजे इ. स. च्या १७ व्या शतकापर्यंत दिल्लीपतीचे स्वाधीन होतें. इतक्या अवधींत मुसलमानांनीं हिंदूंचा छल केल्याविषयीं प्रमाण पहाणें असल्यास पुस्तकें चाळण्याची अवश्यकताच नाहीं. परंतु आमच्या

§ *Major Stuert's History of Bengal p. 36.*

पूज्य देवालयाचे जागीं सांप्रत असलेल्या मशिदी या क्षेत्रांत अनेक अवलोकनांत येतात; हा इतका पुरावा बस्स आहे.

पुढें इ. स. १६६१त शहाजहान बादशाहाचा मुलगा दाराशुको हा कांहीं वर्षें काशी परगण्याचा सुभेदार होता. याला विद्येची फार आवड होती. यानें काशींतील पंडितांना बक्षिसें देऊन त्यांजकडून उपनिषदांचीं फारशी व अरबी भाषेंत भाषांतरें करविलीं हें इतिहासप्रसिद्ध आहेच.

अलीकडील ह्मणजे गेल्या दोनशें वर्षांपासून काशींत एक नवीन राजघराणें अस्तित्वांत आलें आहे. हा इतिहास थोडक्यांत या पुस्तकांत एका स्वतंत्र भागांत दिलाच आहे. ह्मणून येथें अधिक लिहिण्याची मुळींच जरूरी नाहीं. हें घराणें अस्तित्वांत येण्याचे पूर्वीं काशी व आसपासचा प्रदेश हीं कनोजचे राजाचे ताब्यांत जरी होतीं तरी अयोध्येच्या नबाबाचा तो मांडलिक असल्यामुळें हें क्षेत्र मुसलमानांचेच अंमलांत होतें असें म्हटलें तरी चालेल; व त्या वेळीं हें क्षेत्र फारसें भरभराटींतही नव्हतें. काशीक्षेत्राची सांप्रतची स्थिति लक्षांत आणली असतां आजकालचें वैभव, भव्य व प्रेक्षणीय इमारती, हीं सर्व मराठ्यांच्या उत्कर्षापासून वाढत गेलीं असावीं असें वाटतें. याविषयीं एका प्राच्यभाषाविद आंग्लपंडितानें पुढील उद्गार काढलेले सत्य आहेत. "आर्यधर्माचा जो ऱ्हास होत चालला होता त्याचें पुनरुज्जीवन, तसेंच काशींतील अवलोकनांत येत असलेल्या सुंदर इमारती, ह्या सर्व गोष्टींस मुख्य कारण

मराठ्यांचा गेल्या शतकांतला उत्कर्ष व त्यांची सत्ता हींच पुष्कळ अंशीं कारणीभूत आहेत. आजकालची उन्नतावस्था, संपत्ति, व लोकवृद्धि, वगैरे गोष्टींची पूर्व स्थितीशीं तुलना केली असतां प्राचीन काळीं (मुसलमानाच्या आमदानींत) हें क्षेत्र हल्लींपेक्षां सुस्थितींत असेल असा तर्क इतिहासपरीक्षणावरून अगदीं निराधार ठरतो.§ "

§ *See Introduction "Sacred city of the Hindus" by Fitzedward Hall p. p.* 36.

# आमचें पुण्यक्षेत्र (काशी).

## भाग १ ला.

### काशीक्षेत्राचें प्राचीनत्व.

वाराणसी ऊर्फ काशीक्षेत्र हें फार पुरातन कालापासून जगप्रसिद्ध आहे, इतकेंच नव्हे परंतु या पवित्र नगराचा प्राचीन इतिहास धार्मिक व सामाजिकदृष्टयां पाहूं गेलें तर तो मोठा चित्तवेधक व मनोरंजक आहे. हें क्षेत्र आज हजारों वर्षांपासून आमच्या सनातन हिंदुधर्मोचें व संस्कृत विद्येचें आदिपीठ समजतात; आणि आर्यधर्मरूपी वृक्षाचें मूळ याच क्षेत्रांत आढळतें. येथूनच या धर्मवृक्षाच्या अनेक शाखा सर्वत्र देशभर पसरल्या आहेत असें ह्मणण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं. सांप्रत या जीर्ण झालेल्या धर्मवृक्षाचीं मूळें समूळ उखडून काढण्याविषयीं जरी दीर्घोद्योग चालू आहे, तथापि हीं

मुळें जमिनींत इतकीं रुतून बसलीं आहेत कीं, हें काम महान् प्रयत्नांनीं झालें तर होईल. ह्मणून काशीक्षेत्राचा फार पुरातन इतिहास अथवा आद्येतिहास ह्मटला ह्मणजे आमच्या धर्माची उत्पत्ति, स्थिति व ऱ्हास इत्यादि गोष्टींचा ज्यांत अंतर्भाव झाला आहे असा होय. हा संपूर्ण इतिहास प्रस्तुत भागांत निवेदन करणें अगदीं अशक्य आहे, इतकेंच नव्हे परंतु तसें करणें अप्रासंगिकही होणार आहे. ह्मणून शिरोलेखीं लिहिल्याप्रमाणें या क्षेत्राचें प्राचीनत्व संक्षेपरूपानें वर्णन करण्याचा येथें यत्न केला आहे.

आमच्या पूर्वजांनीं सर्व प्रकारचे शोध लाविले खरे; त्यांनीं कलाकौशल्यांतही पुष्कळ सुधारणा केली होती; तसेंच वेदान्त, न्याय्य, मीमांसा, व्याकरण वगैरे गहन विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले व ओतप्रोत माहितीचीं लांबलचक ह्मणजे पाश्चात्य मोठमोठ्या इतिहासकारांस थक्क करून सोडणारीं सुरस पुराणें (मग त्यांस पाहिजे तर सुरस मनोरंजक गोष्टी ह्मणा) गीर्वाण भाषेंत लिहिलीं; परंतु इतिहास लिहिण्यांत किंवा विख्यात पुरुषांचीं चरित्रें लिहिण्यांत मात्र त्यांनीं जितकी शिथिलता दाखविली तितकी अन्य कोणत्याही गोष्टींत नसेल. ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं आमच्या प्राचीन व अर्वाचीन मिळून शेकडोंशें ग्रंथांत ‘ **इतिहास** ’ या संज्ञेखालीं एकही ग्रंथ मोडत नाहीं. या इतिहासाच्या अभावामुळें आमच्या देशाची प्राथमिक स्थिति, तसेंच सामाजिक अथवा राजकीय स्थि-

तींत पूर्वकालीं झालेले फेरफार वगैरे अत्यावश्यक गोष्टींचे ज्ञानाची आमच्यांत एक जबरदस्त उणीव आहे; व ही उणीव आज दूर होण्यासारखी नाहीं. आमचीं पुराणें चित्तवेधक आहेत खरीं; तथापि त्यांतील बहुतेक कथा अतिशयोक्तीनें वर्णिल्या असल्या कारणानें ऐतिहासिकदृष्ट्या त्यांपासून आह्मांस फारच थोडा फायदा होण्यासारखा आहे. ह्मणून त्यांत सत्यासत्यतेची निवडणूक करणें मोठें मुश्किल झालें आहे. प्रो. **मॅक्समुलरचे** या विषयींचे उद्गार येथें देण्यासारखे आहेत. 'हिंदू लोकांच्या प्राचीन ग्रंथांत दंतकथा व ऐतिहासिक गोष्टी एकमेकांशीं अशा तऱ्हेनें गोंविल्या आहेत कीं तें सर्व एकजीव जाळें झालें आहे; या कारणांमुळें पाश्चात्य देशांतील सूक्ष्म शोधक पंडितांचे दंतकथांपासून ऐतिहासिक माहिती मिळविण्याविषयीं आजपर्यंत केलेले उद्योग सर्व निष्फळ झाले आहेत.'* अस्तु.

अलिकडील कित्येक पाश्चात्य महापंडितांनीं लाविलेल्या शोधावरून असें दिसून येतें कीं हीं सर्व पुराणें फार प्राचीनकाळीं लिहिलीं गेलीं नसून या गेल्या दीड किंवा दोन हजार वर्षांतलीं आहेत. ह्यापूर्वीं आमच्या पुराणकालाविषयीं अनेक पंडितांचे अनेक तर्क होते, परंतु ते अलिकडील नवीन शोधावरून दूर होण्यासारखे आहेत. आमच्यांतील कित्येक विद्वज्जनांस देखील ही गोष्ट आतां

* Pro. Max Muller's *History of Ancient Sanskrit Literature* p. 62.

संमत झाली आहे कीं, आपल्या पुराणकालाची उडी शिकस्त दोन हजार वर्षांपलीकडे जात नाहीं. हा सिद्धांत केवळ भाषासरणीवरून पाश्चात्य पंडितांनीं काढिला आहे. आतां हा कालनिर्णय केवळ खराच आहे असें धरून आपल्याला मुळींच चालावयाचें नाहीं, कारण त्यांचा कल होतां होईल तितका अलिकडील काल दाखविण्याकडे असतो हें प्रत्येकानें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. तथापि पूर्वी इकडील सामान्य लोकांच्या ज्या कांहीं अमर्यादित कल्पना असत त्यांस या शोधांमुळें किंचित् मर्यादित स्वरूप मिळालें एवढ्याबद्दलच आपणास पाश्चात्यांचे आभार मानले पाहिजेत. असो. यासंबंधानें आपणास अन्य पुराणांचा विचार मुळींच कर्तव्य नाहीं, परंतु '**काशीखंड**' पुराणापासून ऐतिहासिकदृष्टयां कितपत माहिती उपलब्ध होण्यासारखी आहे हें मात्र पाहूं.

**काशीखंडां**त एकंदर ८० अध्याय असून त्यांत या क्षेत्राचें महात्म्य, क्षेत्रांतील देवतांचा महिमा, तीर्थांविषयीं व कूपांविषयीं चमत्कारिक कथा सुरसरीतीनें वर्णिल्या आहेत. परंतु ऐतिहासिक माहिती फारच थोडी आढळते; किंबहुना मुळींच नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. या पुराणांत प्राचीन **बौद्धां**विषयीं जी थोडी उपलब्ध माहिती आहे त्यावरून इतकें अनुमान करण्यास चांगला आधार आहे कीं हें पुराण बौद्धांचा ऱ्हास झाल्यानंतर लिहिलें असावें. हा काल ह्मटला ह्मणजे **ख्रिस्ता**चे पहिल्या शतका-

पासून तों दहाव्या शतकापर्यंत होय. प्रो. **वुइल्सन्**चें* मत असें आहे कीं, **गिझनीच्या महंमदानें काशीक्षेत्रावर** स्वारी करण्यापूर्वी **काशीखंडा**चा कांहीं भाग लिहिला गेला होता; परंतु हें केवळ अनुमान असून त्याच्या पुष्टीकरणार्थ त्यानें कोठें सप्रमाण आधार दिलेला नाहीं. तात्पर्य—या पुराणाचे परीक्षणावरून **काशीक्षेत्राच्या** पूर्वस्थितीचें ज्ञान करून घेणें ह्मणजे अंधकारांत चांचपण्यासारखेंच होय.

आमच्या पुराणकारांवर दुसरा एक जबरदस्त आक्षेप येण्यासारखा आहे तो हा कीं, त्यांनीं पुराणकथा जशा अतिशयोक्तीनें वर्णन केल्या आहेत तितपतच त्यांचीं कालाविषयीं हंसूं येण्यासारखीं चमत्कारिक विधानें होत. **दिवोदास** राजाविषयीं **काशीखंडा**त ह्मटलें आहे कीं, त्यानें **काशीं**त ८० हजार वर्षें राज्य केलें ! आतां असें ह्मणणें भाग पडतें कीं आमच्या पुराणकारांची कालाविषयीं कल्पना कांहीं भिन्न असली पाहिजे; किंवा हा काल तरी चुकीचा असला पाहिजे. कोणत्याही गोष्टीविषयीं कालनिर्णय ठीक झाला ह्मणजे इतिहासास त्यापासून पुष्कळ मदत मिळते. कालनिर्णय हें इतिहासाचें एक मुख्यांग आहे व त्याची अपेक्षा असली ह्मणजे फार घोटाळा होतो हें येथें निराळें सांगण्याची गरज नाहीं.

---

* Translation of the *Vishnupuran* Vol. I preface p. p LXXII, LXXIII. by Pro. Wilson.

वर निर्दिष्ट केलेल्या दोन कारणांमुळें—ह्मणजे इतिहासाभाव व कालाविषयीं चमत्कारिक विधानें—या क्षेत्राची पुरातन स्थिति अवगत होणें हें दुरापास्त आहे; इतकेंच नव्हे परंतु ती होणें अशक्य आहे. जी थोडी माहिती आज उपलब्ध होण्यासारखी आहे ती फक्त अर्वाचीन असून विदेशीय लोकांचा इतिहास किंवा प्रवासवर्णन यावरून होय.

**काशी**क्षेत्राच्या प्राचीन इतिहासाशीं **बौद्धांचा** फार निकट संबंध असल्यामुळें त्यांविषयीं स्थलप्रसंगीं उल्लेख केला असतां अनुचित् व अप्रासंगिक होणार नाहीं. **बौद्ध**-धर्मस्थापक **शाक्यमुनि** अथवा **गौतमबुद्ध** याचा जन्म खिस्तापूर्वी सहाव्या शतकांत काशीपासून सुमारें १०० मैलांवर उत्तरेस **गोरखपुरा**जवळ एका राजकुलांत झाला. या राजपुत्रानें आपली पहिली पंचविशी मोठ्या सुखावस्थेंत घालविल्यानंतर पुढें त्याचे मनांत वैराग्य उत्पन्न झालें व तदनंतर धर्मविषयक कल्पना त्याचे मनांत घोळूं लागल्या. त्या काळीं ब्राह्मणधर्माचें प्रस्थ फारच माजलें होतें, जातिभेद हा पूर्णपणें अमलांत आला होता, त्याचप्रमाणें सतीचाही प्रचार जारी होता, पशुयज्ञ सर्वत्र चालू होते; यांशिवाय आणखी अन्य क्रूर व रानटी चालींचें प्राबल्य उत्तरोत्तर वाढत चाललें होतें. यामुळें तत्कालीन समाजस्थिति अगदीं निकृष्टावस्थेस पोहोंचली होती. अशा समयीं एक नवीन धर्म—अर्थात् ब्राह्मणधर्म विरोधी—स्थापन करावा कीं,

त्यापासून सर्व प्राणीमात्रांस सुखोत्पत्ति अधिक होईल, अशी कल्पना **गौतमबुद्धा**सारख्या पुरुषास सुचणें स्वाभाविकच आहे. असो. पुष्कळ विचार केल्यावर त्याचे मनाचा निश्चय झाला कीं, एक नवीन मत स्थापन करावें. अखेरीस त्यानें सर्व ऐहिक सुखांवर लाथ मारून व स्त्रीपुरुष, आप्तवर्ग, इष्टमित्र वगैरे सर्वांचा त्याग करून केवळ परोपकारार्थ आपला देह झिजवावा या हेतूनें तो देशपर्यटणास निघाला. प्रथमतः तो **गयेस** गेला. तेथें त्यानें चार पांच वर्षें योगाभ्यासांत व तपश्चर्येंत घातल्यानंतर धर्मोपदेश अथवा आपलें नवीन मत स्थापन करण्याकरितां तो **काशीस** येण्याकरितां निघाला. त्यावेळीं **काशीक्षेत्र** हें फार भरभराटीस आलें होतें व ब्राह्मणधर्माचें मुख्य स्थान होतें. तेथें गेल्यावर **सारनाथ** ह्मणून जें एक प्राचीन स्थान आहे त्या ठिकाणीं त्यानें प्रथम आपल्या पांच शिष्यांस उपदेश* केला; त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—ज्या कोणाला खरोखरी मोक्षाची अभिलाषा आहे त्यानें प्रचलित दोन मार्गांचा अगदीं परित्याग केला पाहिजे किंवा त्यांपासून अलिप्त राहिलें पाहिजे. ते दोन मार्ग कोणचे तर विषयोपभोगांत नेहमीं निमग्न असणें किंवा आपल्या सर्व वासना परिपूर्ण कशा तऱ्हेनें होतील याविषयीं सतत चिंतन करणें हा जो एक मार्ग आहे हा अश्लाघ्य, हीनपणा, आणणारा, आलस्यवृद्धिकारक, सुधारणाविघातक व निरु-

* See *Buddksim* by T. W. Rhys Davids p. 44

पयोगी आहे. आणि दुसरा मार्ग जो इंद्रियदमन—शरीरास कष्ट देऊन मोक्षाची अभिलाषा करणें हाही मार्ग त्याज्य आहे. परंतु या दोहोंच्या मधला मार्ग जो मीं शोधून काढला आहें हा अनुकरणीय व फायदेशीर आहे. याच्यापासून शहाणपण, ज्ञानप्राप्ति, मनाला शांतता वगैरे प्राप्त होते; व ह्याच मार्गानें खरी मुक्ति प्राप्त होते.* असो. कालांतरानें हें मत इतकें फैलावलें कीं, एके समयीं संपूर्ण काशीक्षेत्र बौद्धधर्मानुयायी होतें; आणि आजकाल पृथ्वीचे पाठीवर तीन चतुर्थांश लोक त्या मताचे अनुयायी आहेत ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. बुद्धानें आपला धर्म महंमदाप्रमाणें तलवारीचे बलावर फैलावला नाहीं परंतु केवळ युक्तिवादावरच त्यानें आपल्या धर्माची इमारत उभारिली.

बौद्धधर्माचा उत्कर्ष व प्रसार विशेषेंकरून इतिहासप्रसिद्ध चंद्रगुप्त राजाचा नातू अशोक राजा याचे कारकिर्दींत खिस्तापूर्वी तिसरे शतकांत झाला. अशोक राजा हा प्रथम ब्राह्मणधर्मानुयायी असून नंतर त्यानें बौद्धमत स्वीकारिलें होतें. त्यानें आपल्या हयातींत या धर्माचे उन्नत्तीकरितां भगीरथ प्रयत्न केले ते इतके कीं, एका काळीं हा राष्ट्रीयधर्म झाला होता. धर्मोपदेश व त्याचा प्रसार करण्याकरितां त्यानें आपल्या एका मुलास व मुलीस लंकेंत पाठविलें

* See *Buddhism* by Sir Monior Williams p. p. 42, 43.

होतें. तसेंच त्यानें सर्व देशभर बौद्धांचीं स्मारकें, कोठें उंच विजयस्तंभ, कोठें अत्युत्तम कोंरीव काम ज्यांस 'लेणी' अशी संज्ञा आहे इत्यादि अचाट कामें केलेलीं अद्याप दृष्टीस पडतात.

वरील वृत्तांतावरून वाचकांची खात्री होईल कीं, **गौतमबुद्ध** हा सामान्य पुरुष नव्हता, परंतु एक ज्ञाता, महात्मा आणि तत्ववेत्ता होता.

या वरील माहितीवरून एक दोन गोष्टी चांगल्या सिद्ध होतात, त्या ह्या कीं, हें क्षेत्र निदान गेल्या अडीच हजार वर्षांपासून सुप्रसिद्ध आहे, व दुसरी गोष्ट ही कीं, ब्राह्मण व बौद्धांत बऱ्याच झटापटी होऊन अखेरीस **शंकराचार्यांचे** समयीं ह्मणजे सुमारें ८ व्या शतकांत ब्राह्मणांनीं आपला पगडा पुन्हा पूर्ववत बसविला असला पाहिजे.

**अशोक** राजा होऊन गेल्यानंतर १००० वर्षांचा अर्थात् ख्रिस्ताचे दहावे शतकापर्यंतचा इतिहास अज्ञानांधःकारांत आहे. इ. स.चे ५ व्या आणि ७ व्या शतकांत दोन चिनी प्रवासी बौद्धधर्माचें ज्ञान करून घेण्यास्तव **हिंदुस्थानांत** आले होते. त्यांनीं आपल्या प्रवासवर्णनांत **काशीक्षेत्राचें** अल्प वर्णन दिलें आहे. त्यांपैकीं पहिला प्रवासी जो '**फाहायन**' याचें वर्णन अगदीं संक्षिप्त आहे; परंतु दुसरा जो '**हुएनसँग्**' यानें क्षेत्राच्या त्या वेळच्या स्थितीचें एक मनोवेधक व चटकदार वर्णन दिलें आहे, तें

वाचून तत्कालीन स्थितीचें किंचित् स्वरूप वाचकांचे ध्यानांत येण्यासारखें आहे. **हुएनसँग्** हा पांच वर्षें **पाटना** ( पाटलीपुत्र ) शहरांत संस्कृत अध्ययनार्थ राहिला होता. अभ्यास परिपूर्ण झाल्यावर त्यानें हिंदुस्थानभर प्रवास करून नंतर तो स्वदेशीं परत गेला. त्यानें आपल्या प्रवासवर्णनांत पुढील वृत्तांत लिहिला आहे.

**हुएनसँग** ह्मणतो—'मोलोनिशी **(वाराणशी)** राज्याचा घेर सुमारें सहा हजार **ली** ( ८०० मैल ) आहे. पश्चिमेस गंगेचे तीरीं या राज्याची एक सुंदर राजधानी आहे, तिची लांबी सुमारें १८ किंवा १९ **ली** आहे आणि रुंदी पांच किंवा सहा **ली** आहे. राजधानीचे आसपास पुष्कळ खेडीं असून त्यांतील वस्ती दाट आहे. राज्यांतील लोक कुलीन असून सधन आहेत व त्यांचे घरीं अमोल वस्तूंचा संग्रह व धान्यसमृद्धि विपूल आहे. प्रजा निष्कपटी असून चालीरीति साध्या आहेत. विद्याव्यसनी लोकांचा येथें चांगला आदरसत्कार आहे. पुष्कळ लोक ब्राह्मण धर्मानुयायी असून कांहीं बौद्ध मतांचेही आहेत. हवा समशीतोष्ण असून सर्व प्रकारचीं धान्यें व फळफळावळ विपूल आहेत. या राज्यांत बौद्धांचे तीस मठ आहेत व त्यांत ३ हजारांवर शिष्यवर्ग अध्ययनांत निमग्न आहे. ब्राह्मणांचीं १०० देवालयें असून दहा हजारांवर लोक महेश्वरभक्त आहेत; पैकीं पुष्कळ शिखानष्ठ असून कांहींना शेंड्या आहेत, पुष्कळांना नाहींत व कांहीं अंगाला भस्म फांसून परमहंसदीक्षा घेतलेले लोकही अनेक अवलोकनांत येतात.'

'खास राजधानींत (काशींत) वीस मंदिरें आहेत. अनेक उंच उंच मनोरे, भव्य इमारती व अत्युत्कृष्ट कोरीव काम केलें आहे अशीं प्रेक्षणीय मंदिरें अनेक पाहण्यांत येतात. तसेंच सर्वत्र स्वच्छोदकाचे जलाशय अनेक आहेत. महेश्वराची मूर्ति ताम्रधातूची असून १०० फुटांहून कांहीं कमी उंच आहे, व एकंदरींत मूर्तीचा डामडौल मोठा भव्य असून दुरून जणुकाय ती सजीव आहे असा भास होतो.'

हें वरील वर्णन सांप्रतच्या स्थितीशीं पुष्कळांशीं मिळतें. वरील वर्णनांत त्या समयीं कोण राजा राज्य करीत होता याचा उल्लेख नाहीं. त्याचप्रमाणें महेश्वराच्या मूर्तीविषयीं वर्णन आहे, परंतु त्या मूर्तीची कालांतरानें काय स्थिति झाली हें समजण्यास आमच्याजवळ सुळींच साधन नाहीं!

**काशी** क्षेत्राविषयीं बहुतेक पुराणांत **'मुक्तिक्षेत्र' 'वाराणसी'** वगैरे नांवांनीं अनेक ठिकाणीं उल्लेख आढळतो. फार पुरातनकाळीं या क्षेत्रांत महान् पंडित, तपस्वी, साधु, संत वगैरे पुरुष झाल्याविषयींही पुराणांतरीं पुष्कळ उल्लेख आलेला आहे. हीं व अशींच अनेक कारणें या क्षेत्राचें प्राचीनत्व स्थापित करतात.

या क्षेत्राचे उत्पत्तीविषयीं जुन्या लोकांच्या विलक्षण समजुती आहेत हें निराळें सांगणें नकोच. त्यांचे समजुतीप्रमाणें या क्षेत्राचा पृथ्वीशीं कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं. 'नऊ खंड पृथ्वी आणि दहावें खंड काशी' असें म्ह-

णण्याचा गर्भितार्थ तरी हाच आहे. ह्या व दुसऱ्या अशा अनेक वेडगळ समजुती जुन्या लोकांचे डोक्यांतून काढणें अगदीं दुरापास्त आहे. एक कल्पना करण्यास मात्र सबळ आधार आहे; तो हा कीं, अलीकडील भाषाशास्त्राधारें निघालेल्या नवीन शोधावरून असें कळतें कीं, सुमारें पांच हजार वर्षांपूर्वी मध्य एशियांतून आर्यांच्या एका शाखेनें पंजाबांतून हिंदुस्थानांत प्रवेश केला. प्रथमतः पंजाबदेश हस्तगत करून क्रमाक्रमानें ते लोक पुढें सरसावले; व जसजसें आर्यलोक विजयी होऊन त्यांचें पाऊल पुढें पडत चाललें तसतसें त्यांनीं निरनिराळीं राज्यें स्थापिलीं असावीत हें साहजिकच आहे. कारण मनुष्यस्वभाव असा आहे कीं, जे बलवान असतात ते बलहीनास आपले गुलाम किंवा दास करतात. याविषयीं इतिहासांत अनेक उदाहरणें सांपडतात. अथवा फार दूर कशाला, आपल्या सद्यःस्थितीकडेच पाहिलें असतां हें लक्ष्यांत येण्यासारखें आहे. अस्तु. आर्यांनीं अनार्यांस जिंकून, हस्तिनापूर, कुरुक्षेत्र, मथुरा, अयोध्या, वाराणसी व पाटना वगैरे गंगाकिनारीं सर्व प्रदेशांत निरनिराळीं राज्यें स्थापन केलीं. या सर्व प्रदेशास 'पवित्र भूमि' असें पुराणांतरीं नांव आहे, व बहुतेक क्षेत्रें याच देशांत आढळतात. ही विचारसरणी जर वाचकांस ग्राह्य झाली व ती होण्यासारखी आहे तर काशीक्षेत्राचा उदयकाल कोणता असावा याचा निर्णय करणें फारसें कठिण नाहीं; व हा काल या पांच हजार वर्षांत-

लाच असला पाहिजे असें आधुनिक विद्वानांचें ह्मणणें आहे. वङ्ग देशीय सुप्रसिद्ध इतिहासकार **सर रोमेशचंद्र दत्त** यांचें मत असें आहे कीं, **आर्यांनीं** गंगाकिनारीं वसाहत केल्याचा काल ख्रिस्तापूर्वीं १४०० वर्षांपासून तों १००० हजार वर्षांपर्यंत असला पाहिजे.

हा प्रथम भाग संपविण्यापूर्वीं इतकें सांगणें अवश्य आहे कीं, अन्यदेशांतील फार पुरातन शहरें, ह्मणजे **रोम, ॲथेन्स, बॅबिलन, जरूशेलम** वगैरे—ज्यांविषयीं इतिहासकार पोवाडे गातात, व ज्यांचा एके कालीं अन्य राष्ट्रांवर मोठा दरारा असे—अशीं शहरें अस्तित्वांत येण्याचे पूर्वींच **काशी** क्षेत्र हें सुधारणेच्या उच्च कोटीप्रत पोहोंचलें होतें असें अनुमान अगदीं चुकीचें होईलसें वाटत नाहीं. सांप्रत वरील नामांकित व इतिहासप्रसिद्ध शहरांचीं नांवें फारशीं पुढें येत नाहींत; परंतु **काशी** क्षेत्राविषयीं तसें नसून त्याचें महत्व अद्याप पूर्ववत् कायम आहे ही गोष्ट मोठ्या आश्चर्याची आहे. धर्मसुधारणा व अनेक जुने विचार आणि समजुती यांविषयीं हल्लीं जरी मोठी गर्जना होऊन राहिली आहे, तथापि सुधारणेचें वारें या शहरांत अद्याप पूर्णपणें खेळूं लागलें नाहीं. सृष्टिनियमाप्रमाणें या क्षेत्राच्या इतिहासांत आज मितीस बराच फेरफार व्हावयाला पाहिजे होता; परंतु आश्चर्य हें कीं, **काशी**च्या आद्यस्थितींत व सांप्रतच्या स्थितींत फारच सूक्ष्म भेद आढळेल. पाश्चात्य

ज्ञानरूपीं सूर्याचीं किरणें या क्षेत्रांत नुकतींच चमकूं लागलीं आहेत; व कालांतरानें हेंही क्षेत्र अन्य शहरांप्रमाणें सुधारणेंत पुढारीपण घेईल अशी पूर्ण आशा आहे.





# भाग २ रा.

## क्षेत्राची रचना.

प्रथम भागांत हें क्षेत्र फार पुरातन कालापासून अस्तित्वांत आहे हें सिद्ध करून दाखविलें. आतां ह्या भागांत सांप्रतची क्षेत्ररचना, विभाग व सीमा वगैरे गोष्टींचें निरूपण करूं.

या क्षेत्राची वर्तुलाकृति सीमा ह्मटली ह्मणजे **पंचक्रोशी** होय. या पलीकडील प्रदेशास '**काशी**' किंवा '**बनारस**' हें नांव देतां येत नाहीं. आतां **पंचक्रोशी**चा रस्ता ह्मटला ह्मणजे सुमारें २५ कोस असल्यामुळें या क्षेत्राचा परीघ २५ कोसच ह्मटला पाहिजे. परंतु ही देखील क्षेत्राची दूरची हद्द झाली. **पंचक्रोशी**पर्यंतचा सर्व प्रदेश '**काशी**' या संज्ञेंत जरी मोडतो तथापि वस्तुतः तसें समजावयाचें नाहीं. कारण **पंचक्रोशी**ला लागून आसपास जीं लहान लहान खेडीं आहेत त्यांस निरनिराळीं नांवें आहेत; व तीं त्याच नांवानें मोडतात.

या क्षेत्राची दक्षिणोत्तर सीमा म्हटली म्हणजे '**गंगा**' होय. दक्षिणभागीं **असी**नाला असून उत्तरेस **वरुणा-संगम** झाला आहे, व या दोन नद्यांच्या मधील प्रदेशास काशी ह्मणतात. **वरुणासंगमा**पासून **असीसंगमा**पर्यंत मार्गक्रमण केलें असतां चार मैलांहून अधिक होणार नाहीं. ही आपण या क्षेत्राची लांबी समजूं या. रुंदी सुमारें एक मैलापासून तों तीन मैलांपर्यंत येईल. वरुणासंगमापासून **पंचगंगा** घाटापर्यंतचा प्रदेश फार उंच असून पुढें तो **असी**कडे किंचित् मधून सखल व मधून उंच असा होत गेला आहे. हा संपूर्ण प्रदेश २ लक्ष लोकांनीं सदोदित गजबजलेला असतो! इतक्या दाट वस्तीचें शहर दुसरें कोठेंही नसेल. असें सांगतात कीं, **लंडन** शहराची वस्ती फार दाट आहे; परंतु यासंबंधानें तें सुद्धां **काशी**ची बरोबरी करीलसें वाटत नाहीं. हा संपूर्ण देखावा पाहण्या-करितां नौकाविहार केला असतां चित्तास आनंद झाल्या-वांचून रहात नाहीं. नौकेंत बसून वर द्दष्टि फेंकली असतां मोठमोठ्या भव्य व सुंदर इमारती, प्रेक्षणीय मंदिरें, व तसेच विशाल व रमणीय घाट अवलोकन केले असतां चित्तवृत्ति क्षणभर आनंदाचे लहरींत गुंग होऊन जाते. खरोखरीच '**सृष्टिसौंदर्य** विलासी जनास **काशी** क्षेत्रा-प्रमाणें आनंदप्रद स्थल क्वचितूच आढळेल. येथें जे अप्र-तिम देखावे द्दष्टीस पडतात ते अन्यत्र दुर्लभ होत. **काशी**

नगरची रचना **गंगे**च्या पश्चिम तीरावर असल्यामुळें सुमारें तीन मैलपर्यंत सर्व सरित्प्रदेश, उंच उंच घरें, राजवाडे, देवालयें व घाट यांनीं गजबजून गेलेला असतो.' वरुणेपासून **असी**पर्यंत ही घाटसंख्या सुमारें ४० पर्यंत होईल. हे सर्व घाट अर्वाचीन असून पेशव्यांचे कारकिर्दींत बांधलेले आहेत. या ४० घाटांपैकीं कांहीं घाटांचें काम फारच चांगलें असून शें पन्नास स्त्रीपुरुषवर्ग एक समयावच्छेदें-करून प्रशस्तपणें स्नान करूं शकेल अशा सोयीचे आहेत. 'घाटांवरील सुरम्य देखावा अवलोकन करून प्रेक्षकांचें चित्त अगदीं वेधून जातें. जागोजाग स्त्रीपुरुषांचे समूह स्नान करीत आहेत; त्यांच्या सभोंवतीं गंगापुत्रांची गडबड सुरू आहे; कोठें वृद्ध स्त्रिया भक्तिभावानें स्नान करून गंगास्तोत्रें म्हणत आहेत; कोठें संसारतापापासून मुक्त होऊन संन्यासव्रत धारण केलेले **यतिवृंद गंगोदका**चे कमंडलु पुढें घेऊन व अंगास भस्मपुंड्र चर्चून घांटावरील ओ-ऱ्यांत परमेश्वराचें पूजन करीत आहेत; व भगवद्गीतादि ग्रंथाचें पठण करीत आहेत; कोठें संत, महंत, साधुजन, '**जयगंगाजी**' '**जयगंगाजी**' अशी गुरुगर्जना करीत आहेत; कोठें पूजाद्रव्यें घेऊन कित्येक लोक उभे आहेत कोठें पौरांगनांचे थवे गंगास्नान करून मंजुळ गाणीं ह्मणत आहेत; कोठें मस्तकीं जटाजूट व कंठांत रुद्राक्षमाला धारण केलेले वैराग्यशाली तपोनिधि सच्चिदपदीं दृष्टी लावून

बसले आहेत; कोठें राजवंशीय स्त्रिया कनाती लावून गोषांमध्यें स्नानें करीत आहेत; कोठें दातृत्वनिपुण धनिक लोक गंगातीरावर दक्षिणा वाटीत आहेत व तेथें याचकजनांची एकच गर्दी उडून राहिली आहे; कोठें भद्रकर मंगलद्रव्यांनीं गंगातटाकीं रंगून गेले आहेत; कोठें प्रकीर्ण पुष्पभार **गंगातरंगा**बरोबर वाहत आहेत; कोठें घंटारव ऐकूं येत आहेत; कोठें वाद्यघोषांमध्यें प्रियकर दंपत्याचें गंगापूजनविधि चालू आहेत; कोठें वेदघोष सुरू आहेत; कोठें बहुरूपीजन द्रव्यहरणार्थ नानाविध लीला दाखवीत आहेत; खरोखर या मनोहर देखाव्याचें वर्णन जितकें करावें तितकें थोडेंच आहे.' श्रीमंत **कुरुंदवाडकरां**नीं ह्मटलें आहे:—

'गंगातीरीं शोभति घाटांच्या सतत ह्मरिच्या ह्मरि ॥
करिति स्वकर्म त्यावरि बैसुनि विप्रादि वर्ण हे चारी ॥
दिसतें प्रातःकाळीं श्रीगंगेचें सुतीर विप्रमय ॥
कलियुग इतरत्र परी येथें अद्यापि होय कृतसमय' ॥

सुप्रसिद्ध लेखनपटु व इतिहासकार **लॉर्ड मेकाले** यानें **काशी**क्षेत्राचें वर्णन एके ठिकाणीं उत्कृष्ट केलें आहे. तो लिहितो कीं '**काशी**क्षेत्र हें आशियाखंडांत संपत्तीचे मानानें व लोकवस्तीनें जितके अग्रगण्य आहे तितकेंच तें पवित्र आहे. अशी कल्पना आहे कीं, या क्षेत्राच्या नागमोड्या गल्लया ज्यांस प्रचंड राजवाड्यांनीं व प्रेक्षणीय शिवालयांनीं विशेष शोभा आली आहे व ज्यांवर असंख्य मर्कटवृंद इतस्ततः संचार करीत आहे अशा या नगरीची लोकवस्ती सुमारें पांच लक्ष

असावी. बैरागी, भिक्षुक व सांड यांच्या गर्दीमुळें प्रवासी जनास गल्लींतून मार्गक्रमण करणें असल्यास फार अडचण पडते. या क्षेत्रांत असंख्य यात्रेकरू जमत असल्यामुळें गंगेवरील घाटांच्या पायऱ्या सुद्धां स्नानार्थि लोकांच्या वरदळीनें झिजून त्यांत खळगे पडले आहेत. तसेंच या क्षेत्रांत हिंदुस्थानांतील प्रत्येक भागांतील मनुष्यें अध्ययनार्थ पुष्कळ येतात, व शेकडों लोक **काशींत** मुक्ति मिळावी ह्मणजे मरण यावें या हेतूनें येतात. कारण यांचा असा समज आहे कीं **काशीं**त मृत्यु प्राप्त झाला असतां स्वर्गप्राप्ति होते. इतका अनावर जनसमूह येथें जमण्याचें कारण केवळ धर्मभोळेपणाच नव्हे; परंतु येथील व्यापारही पुष्कळांशीं कारण होय. **गंगे**च्या किनारीं माल घेऊन येणारीं व जाणारीं हजारों जहाजें व होड्या नेहमीं अवलोकनांत येतात. **काशीं**तील कोष्ट्यांनीं विणलेलें रेशमी कापड विलायतेंतील **सेंट जेम्स** व पॅरिस मधील **व्हरसेल्स्** नांवाच्या राजवाड्यांत नाच प्रसंगीं उच्च वर्गांतील स्त्रीवर्ग वापरतो.'¶

गंगेचें पात्र सुमारें पाऊण मैल रुंदीचें असून उष्णकाळीं अगदीं स्थिर असतें. परंतु पर्जन्यकाळीं पात्र फारच दूरवर फैलावतें तें इतकें कीं कधीं कधीं बंगाल प्रांतांत पुष्कळ गांवें पुरानें वाहून जातात. गंगोदकाविषयीं सर्वत्र ख्याति आहे. तथापि काशींतील गंगोदक

¶ See Macaulay's Essay on *Warren Hastings*.

दूषीत आहे असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. याचें कारण असें आहे कीं, या नगरांतील मलमूत्रादि सर्व घाण नलद्वारें गंगेंत सोडली आहे ह्मणून गंगोदकास कधीं कधीं व मुख्यतः उष्णकालीं फारच दुर्गंधी येते. आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं, या क्षेत्राच्या जुन्या वस्तींत मलवाहक मुळींच नाहींत ! !*

वर सांगण्यांत आलें आहे कीं हें क्षेत्र गंगेच्या पृष्ठभागापासून बरेंच उंच आहे; ह्मणजे कांहीं ठिकाणीं ही उंची शंभर किंवा सव्वाशें फूटपर्यंत आहे. या उंचीमुळें मलादि नळ गंगेंत सोडणें फार सोपें झालें आहे. हे सर्व नाले पुष्कळ खोल असून त्यांत घरोघरचे नळ सोडले आहेत; व अखेरीस हे सर्व नहर गंगेंत सोडले आहेत. एकंदरींत ही सर्व व्यवस्था आरोग्यशास्त्राविरुद्ध आहे इतकें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. अस्तु. गंगेंत नौकेंत बसून राजघाटाकडे दृष्टि फेंकली असतां **औंध, रोहिलखंड रेल्वे** कंपनीचा प्रचंड लोखंडी पूल अवलोकनांत येतो, व त्यावरून आगगाडी चालली असतां लांबून पाहणारास जणूं काय एक प्रचंड सर्पच जात आहे कीं काय असा भास होतो.

---

* सुमारें पांच सहा वर्षांपूर्वी आंग्ल देशांतील डा. हँकीन् नामें एका प्रसिद्ध शास्त्रवेत्त्यानें हिंदुस्थानांतील सर्व नद्यांच्या उदकाचें परीक्षण करून असा अभिप्राय दिला आहे कीं गंगोदकासारखें हलकें व पाचक पाणी जगांत कोणत्याही नदीचें नाहीं. ही गोष्ट पुष्कळांनीं वर्तमानपत्रांत वाचली असेल.

या पुलाचे कामास इ. स. १८८२ त सुरुवात झाली व १८८७ त काम तयार झालें. पुलाची लांबी ३५१८ फूट आहे. पैकीं ७ कमानी ३५६ फूट लांबीच्या व ९ कमानी ११४ फूट लांबीच्या असून खर्च सुमारें ७५, २७,५२६ रुपये झाला. कामाला सुरुवात होण्यापूर्वीं एकंदर खर्चाचा अंदाज ४२,५२,८२४ रुपये केला होता. परंतु दीडपट खर्च जास्ती झाला, हा पूल **हिंदुस्थान**चे माजी व्हाईसरॉय **लार्ड डफरिन्** यांचे कारकिर्दींत झाला व हा सर्व समारंभ त्यांचेच हस्तें इ. स. १८८७ त दिसेंबरचे १६ तारखेस झाला, व ह्मणून याला **डफरिन् ब्रिज्** असें ह्मणतात. एकंदरींत पुलाचें काम फारच मजबूत असून अत्युत्कृष्ट आहे.

ह्या पुलाचे कामाला सुरुवात होतेवेळीं **काशीं**तील लोकांनीं अनेक तर्क केले होते कीं, पुलाचें काम शेवटास जाणार नाहीं कारण त्यांच्या मतें हा गंगाबाईचा अपमान करणें होय अशी कल्पना होती. आजपर्यंत हिंदुस्थानांत अनेक महान महान कौरव, पांडव, रामचंद्र, भोज, विक्रम यांसारखे राजे होऊन गेले त्यांना गंगेवर पूल बांधणें शक्य होतें परंतु धार्मिकदृष्ट्या त्यांचा तितका हिय्या झाला नाहीं वगैरे कुतर्क भाकित केले होते. काम चालूं असतां मध्यंतरीं एक मोठा अपघातही झाला व त्यांत अनेक मनुष्यांचे बळी पडले; या व अशाच अनेक कारणांमुळें

लोकांना पुलाचें काम शेवटास जाईल अशी आशा नव्हती; पण हा त्यांचा भ्रम दूर होऊन आज जवळ जवळ १२ वर्षें होत आलीं पूल पूर्ववत कायम आहे व या पुलामुळें यात्रिक लोकांची फारच उत्तम सोय झाली आहे, हें येथें निराळें सांगण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. खरोखरच गंगेसारख्या प्रचंड नदीला पूल बांधणें व त्यांत **काशींत**—जेथें सर्व वालुकामय पात्र आहे अशा ठिकाणीं—पूल बांधण्याचा यत्न करणें मोठें धाडसाचें काम होतें. कारण पुलाला मजबुतीकरितां खडकाची अवश्यकता असते व याचा काशींत मुळीं अभाव आहे. काशींतच काय परंतु १४०० मैल गंगेची लांबी आहे इतक्या हद्दींत कोठें तीळभरसुद्धां खडक औषधाला मिळायचा नाहीं. ह्मणून हें काम फार कठिण होतें. इतक्याही अडचणी सोसून मोठमोठ्या पाश्चात्य शिल्पकला विशारदवेत्त्यांनीं कंबर बांधून हें काम तडीस नेलें व ह्मणून हिंदुस्थानांत तें अद्वितीय आहे असें सांगतात.

या नगराची अंतर्बाह्य रचना फार दाट आहे हें वर सांगण्यांत आलेंच आहे. बहुतेक घरें पांच पासून सात मजली असून पाषाणमय आहेत. त्याचप्रमाणें अरुंद व संकुचित नागमोड्या रथ्या(गल्ल्या)अतिशय आहेत. ह्यांतून गाडीघोडा जाण्याचें नांवच नको. या सर्व रथ्या दगडांनीं बांधलेल्या आहेत. घरांची बांधणी कांहीं भिन्न आहे. येथील

घरांच्या मागेंपुढें अंगण क्वचितच आढळेल. बहुतेक घरांस एक किंवा दोन चौक असून त्याच्या एका कोपऱ्यांत लहान विहिर असते. विहिरीचा उपयोग फार थोडाच करतात. कारण त्यांचें पाणी सामान्यतः खारें असून प्राशनीय नसतें. बहुतेक घरांस गच्या आहेत. उन्हाळ्यांत उष्मा अत्यंत होतो यामुळें रात्रीचे वेळीं घरांत निजण्याची बिलकुल सोय नसते सबब प्रायः लोक उघड्या हवेंत गच्यावरच निजतात. घरें फार उंच असल्याकारणानें पर्जन्यकाळीं कधीं कधीं कोसळतात व पुष्कळ लोक प्राणास मुकतात.

घरें फार दाट असलीं ह्मणजे स्वच्छ हवा चांगल्या रीतीनें खेळत नाहीं आणि मोकळ्या हवेचा उपभोग मिळत नाहीं. याच कारणांमुळें काशीस बारा महिने कांहींना कांहीं तरी अजार असतोच. महामारीचें ठाणें तर नेहमींच असतें, व प्रतिवर्षीं शेकडों लोक व विशेषतः यात्रिकजन या भयंकर रोगास बळी पडतात.

या क्षेत्राचे स्थूलदृष्ट्या तीन विभाग केले असतां चालेल. हे तीन विभाग '**बनारस**' '**काशी**' व '**केदार**' हे होत. या शिवाय प्रदेश तो चौथा होय. आतां '**बनारस**' हें नांव या क्षेत्रास कधीं व कसें प्राप्त झालें याविषयीं बराच मतभेद आहे. कित्येक विद्वानांचें मतें बनारस शब्द हा वाराणशीचा अपभ्रंश आहे आणि कित्येकांचें मत असें असे कीं सुमारें हजार वर्षांपूर्वीं या क्षेत्रांत

कोणी **बानर**नामें राजा होऊन गेला ह्मणून या नगरास **बनारस** असें ह्मणण्याचा प्रघात पडला. काशींतील सामान्य लोकांचें मत ही असेंच आहे. औरंगजेबनेंसुद्धां क्षेत्राचें नांव '**महंमदाबाद**' असें ठेवलें होतें. परंतु हें नांव फारसें प्रचारांत आलें नाहीं. अस्तु. या नांवाविषयीं बराच मतभेद आहे. पुराणांतरीं **वाराणसी** नांवाचा पुष्कळ उल्लेख आढळतो; आणि त्याचा अर्थ वरुणा व असी यांमधील प्रदेश होय.

सांप्रत **बनारस** व **काशी** हे शब्द जरी एकार्थीच आहेत तरी त्यांत एक सूक्ष्म भेद आहे. तो असा कीं या क्षेत्राचे उत्तर दिशेचे भागास जेथें यवनांची वस्ती फार आहे त्यास बनारस ह्मणतात व वरुणा व असीमधील प्रदेशास काशी ह्मणतात. तसेंच दशाश्वमेघ घाटापासून तों केदार व असी घाटपर्यंतचा प्रदेश **केदार** याच नांवानें मोडतो. बाकी **केदार** हा काशीचा एक पोटविभाग आहे.

पूर्वकालीं ह्मणजे सुमारें दीड हजार वर्षांपूर्वी या क्षेत्राची मुख्य वस्ती ईशान्येस सुमारें तीन मैलांवर '**सारनाथ**' नामें स्थान आहे त्या ठिकाणीं होती. नंतर कालांतरानें बौद्धांचा ऱ्हास झाल्यावर ह्मणजे सुमारें एक हजार वर्षांपूर्वी वरुणासंगम व राजघाट यांमध्यें होती; व सांप्रत असी व केदार घाटांकडे वस्ती झुकत आहे. हल्लीं जेथें **विश्वेश्वराचें** मंदिर आहे तो भाग व दशाश्वमेध वगैरे ठिकाणीं

सुमारें ९०० वर्षांपूर्वी फारच विरळ वस्ती होती. परंतु कालगती विचित्र आहे ! ! ज्या स्थानीं पूर्वकाळीं दाट वस्ती असे तें स्थान आतां निर्जन व भयाण झालें आहे. सारांश लोकवस्ती उत्तरोत्तर तें स्थान सोडून **असीकडे** वाढत चालली आहे. तसेंच दशाश्वमेध, बंगालीटोला व केदार या भागांतील वस्ती अगदीं अलीकडची ह्मणजे सुमारें शें दीडशें वर्षांतली आहे. असें सांगतात कीं पूर्वी **विश्वेश्वर** व **काळभैरव** यांचें दर्शन करण्याकरितां वरुणेकडील लोक दिवसां येत असत. त्यांना रात्रीं येणें भयप्रद वाटे.

फार पुरातनकाळीं या क्षेत्राचे पश्चिमोत्तर प्रदेशांत ज्यास हल्लीं ‘ बकरियाकुंड ’ ‘ अलीपूर मोहला ’ व त्याच-प्रमाणें वरुणेच्या कांठचा प्रदेश ह्मणतात यांत बौद्धांचें प्राबल्य फार असावें. त्यांचे मठ, त्यांचे विहार, त्यांच्या गुंफा व त्यांच्या प्राचीन इमारतीचा अवशिष्ट भाग व त्यांवरील अत्युत्तम कोरीव काम वगैरे सर्व अद्याप दृष्टोत्पत्तीस येतें, व ह्मणून वरील सिद्धांतास अधीक जोर येतो.

या क्षेत्रांत प्राचीन घरें व मंदिरें क्वचित् आढळतात. बहुतेक सर्व मंदिरें अर्वाचीन असून अलीकडील दोन ती-नशें वर्षांतलीं आहेत. औरंगजेबचे कारकिर्दीत तर पुष्कळ मंदिरांचा चुराडा झाला ही गोष्ट तर इतिहासप्रसिद्ध आहे. मोठमोठ्या शिला व प्राचीन मूर्ति शहरांत पुष्कळ स्थानीं छिन्नविछिन्न झालेल्या अद्याप अवलोकनांत येतात. परंतु त्यांचा काळनिर्णय करणें फार कठीण आहे.

काशीक्षेत्राचे आसपास पुष्कळ उद्यानभूमिका व उपवनें असून त्यांपैकीं कांहीं तर फारच सुंदर व रमणीय आहेत. हीं सर्व उपवनें तेथील शेटसावकार व अमीर उमराव वगैरे लोकांची असून वसंतऋतूंत सायंकाळीं ते तेथें हवा खाण्यास जातात. बगीच्यांत अनेक फळझाडें असून क्वचित्स्थळीं जलोद्गार यंत्राची योजना केलेली असल्यामुळें उपवनास अधीकच शोभा येते. या बगीच्यांत अभ्यागत जनास बसण्याच्या सोयी आहेत; यामुळें उष्णकाळीं सायंकालचे समयीं अशा एखाद्या उपवनांत स्वच्छ व मोकळी हवा खाण्यास पुष्कळ लोक जातात.

काशी, प्रयाग, मथुरा, आग्रा, दिल्ली, ग्वालिअर, कानपूर, लखनौ, झांशी, वगैरे ठिकाणीं बुटी उर्फ भांग घेण्याचा प्रघात फार आहे. ह्या प्रांतांत भांग पिणें हें व्यसन मानीत नाहींत. काशींत तर लहान मुलांपासून तो जख्खड म्हाताऱ्यापर्यंत आणि क्वचित् बायकाही भांग पितात; आणि एखाद्या उपवनांत ‘ थंडाई ’ तयार करून घेणें त्यांस फार आनंददायक वाटतें. ही भांग तयार करतांना तिच्या प्रशंसनेचीं आणि महात्म्याचीं पद्यें तद्व्यसनी निपूण लोक ह्मणतांना कोणी ऐकलें तर त्यांस त्यापासून एक प्रकारची क्षणभर कर्मणुक होते. ही भांग घेण्यांत कांहीं लोक इतके आसक्त आहेत कीं त्यांस एखादेवेळीं जेवावयास न मिळालें तरी चालेल परंतु ‘बुटी ’ ही पाहिजेच, व ती ही थोडी-

थोडकी घेऊन त्यांचें समाधान होत नाहीं. कमींतकमी मोठाले दोन कटोऱ्यापासून च्यार च्यार तांबे पिणारे प्राणी आढळतात; आणि त्या मानानें ते आपआपसांत 'कटोरागुरू' 'लोटागुरू' 'घंगाळगुरू' इत्यादि विनोदपर पदव्याही देतात. असो. पंचक्रोशी मार्गावर कांहीं उपवनें फार रमणीय आहेत. यात्रेकरूंनां त्यांचा उपयोग घेतां येत नाहीं ही गोष्ट निराळी परंतु साधेल तर त्यांनीं तीं अवश्य अवलोकन करावीं.

हें क्षेत्र २३° ५२' १५" अक्षांश व २७° ३०' रेखांशावर असून समुद्राचे पृष्ट भागापासून २९३ उंचीवर आहे, व क्षेत्रफळ ३४४८ एकर आहे. लोकवस्तीच्या मानानें पाहिलें असतां इ. स. १८९१ चे खानेसुमारीवरून कळतें कीं लोकवस्ती २,१९,४६७ आहे. पैकीं १,१५,०६७ पुरुष व १,०४,४०५ स्त्रिया आहेत. हिंदूची संख्या १,६८,६९१ आहे पैकीं ८८,४६८ पुरुष व ८०,२२३ स्त्रिया आहेत. मुसलमान वस्ती ४९,४०५ आहे पैकीं २५,७२२ पुरुष व २३,६८३ स्त्रिया आहेत. जैनवस्ती फार थोडी ह्मणजे १०९ आहेत पैकीं ६७ पुरुष व ४२ स्त्रिया आहेत. ख्रिस्ती १,२०६ पैकीं ७६९ पुरुष व ४३७ स्त्रिया. सीख ५२ पैकीं ३३ पुरुष व १९ स्त्रिया.

इ. स. १८८१ चे खानेसुमारीचा आंकडा यापेक्षां कमी होता. ह्मणजे क्षेत्राची लोकवस्ती १,९३,०२९ होती. यावरून गेल्या दहा वर्षांत वस्ती पुष्कळ वाढली असें ह्मणावें लागतें.

दाट वस्तीचे मानानें पाहिलें असतां काशीक्षेत्र हें पश्चिमोत्तर देशांत पहिलें येतें. प्रत्येक औरस चौरस मैला-वर ९१३·७ लोकवस्ती आहे. एकंदर जिल्ह्याची मनुष्य गणती ९,२१,९४३ आहे. पैकीं पुरुष ४,६७,४५३ व बायका ४५,४९०. हिंदूंची संख्या ८,३१,७३० असून पुरुष ४,२१,०३५ व बायका ४,१०,६९५ आहेत. मुसलमान ८८,४०१ पुरुष ४५,१९० व बायका ४३,२११ आहेत, व बाकी इतर जाती आहेत.

वरील आंकडा हा स्थाईक वस्तीचा आहे. याशिवाय प्रतीवर्षीं यात्रेकरू लोक एक लक्षावर येऊन जातात. येथें सर्व वर्णांचें आणि सर्व धर्मांचे लोक आढळतात, पैकीं दाक्षिणात्यांची वस्ती ८००० पर्यंत येईल. याशिवाय बंगाली, गुजराथी, मैथील, कान्यकुब्ज, द्रावीड, पंजाबी, सीख वगैरे अठरापगड जातीचे लोक येथें आढळतात.

अलिकडे नेपाळी लोकांची वस्ती या क्षेत्रांत फार वाढत चालली आहे. पंचगंगा घाट व बालाजी घाट वगैरे स्थानीं यांचीं घरें आहेत. नेपाळी लोकांत लक्षांत ठेवण्या-

सारखी गोष्ट अशी कीं तद्देशीय रिवाजानुसार त्यांच्यांत 'पडदा' मुळींच नाहीं. स्त्री पुरुषांचे पोशाख व पेहराव फारच चमत्कारिक असतात. नेपाळांत अद्याप सतीचा प्रचार आहे, व तसेंच तिकडील कायदे कानु हीं फार कडक आहेत असें सांगतात. जातीभेद त्यांच्यांत इकडच्या सारखाच आहे. परंतु भक्ष्याभक्ष्याविषयीं कांहीं विधिनिषेध नाहीं. ब्राह्मणवर्ग मत्स्याहारी आहे. नेपाळी भाषा फार-शी कठीण नाहीं. मराठी भाषेप्रमाणें तिच्यांत पुष्कळ संस्कृत शब्द येतात. सुधारणेसंबंधानें लोक बरेच मागें आहेत. विवाहादि कार्यें आमच्या सारखींच असून बाल-विवाह केशवपन वगैरे चालीही त्यांच्यांत पूर्णपणें वसत आहेत.



## भाग ३ रा.

### शिवालयांची शोचनीय स्थिति.

हिंदुस्थानांत सुमारें गेल्या १२ शतकांपासून ह्मणजे बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यापासून सनातन वैदिक धर्माचें साम्राज्य कमी झालें व पौराणिक धर्म वृद्धिंगत होत जाऊन मूर्ति पूजा वाढत चालली; आमच्या पूर्वजांनीं ह्मणजे ऋषींनीं वेदांत सांगितलेला धर्म व सांप्रत रूढ असलेला धर्म यांत महदंतर दिसून येईल. आजकाल पाश्चात्य ज्ञान रूपीं किरणांच्या प्रभावानें म्हणा किंवा अन्य कोणत्याही कारणानें ह्मणा आमच्यांतील पुष्कळ सुशिक्षित लोकांची मूर्तिपुजेवरील धर्मश्रद्धा कमी होत चालली आहे व पुष्कळांनीं ती सोडूनही दिली आहे. याचीं कारणें शोधूं पहात बसणें ह्मणजे एक मोठा लांबलचक इतिहास लिहिणेंच होईल.

मूर्तिपूजा ही प्राचीन आणि अर्वाचीन सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत एक कालीं अस्तित्वांत होती असें इतिहासावरून

आढळतें; व अद्यापही सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या राष्ट्रांतूनही मूर्तिपूजेचे उपासक पुष्कळ आढळतात. या सृष्टींत जें जें ह्मणून मोठें भव्य व आश्चर्यकारक आहे अथवा ज्यांनीं मोठमोठीं महान कृत्यें केलीं, किंवा जे साधुसंत किंवा महान तपस्वी किंवा शोधक बुद्धीचे अथवा ज्ञाते होऊन गेले ते या सर्वांचे उपासक होते व अद्यापही आहेत. **चीन, जपान** वगैरे देशांत बुद्धास मानतात, मुसलमान लोक महंमदास पैगंबर मानतात; ख्रिस्ती लोक येशु ख्रिस्तास मानतात व आम्ही लोक रामकृष्णादि पराक्रमी पुरुषांस मानतों इतकेंच नव्हे परंतु त्यांस अवतारी पुरुष समजतों आणि त्यांच्या मूर्तींची पूजा करतों. या सर्व लोकांतील मूर्ति पूजेचा प्रकार कमीजास्त प्रमाणानें सारखाच आहे. मूर्तिपूजा करावी किंवा नाहीं, ती सशास्त्र आहे किंवा अशास्त्र आहे हा विचार या पुस्तकांत कर्तव्य नाहीं; परंतु ओघानुसार एवढें मात्र म्हटलें पाहिजे कीं जर ती करण्यापासून आमच्या प्रगतीस धक्का बसल्याचे अथवा जे ती करीत नाहींत त्यांस कांहीं निराळा फायदा झाल्याचे ऐकिवांत येत नाहीं तर फार पुरातन कालापासून चालत आलेल्या ह्या उपासना मार्गाचे संबंधानें रिकामा वाद कांहीं कांहीं ठिकाणीं विशेष निषेधानें कां ऐकू यावा हें कळत नाहीं.

**काशी** क्षेत्रांत तर मूर्तिपूजेचें प्राबल्य फारच आहे. घरोघरीं देवपुजा आहेच; परंतु आमच्या लोकांस घरचे देव पुरत नसून बाहेरचे देवही लागतात! या क्षेत्रांत अशी एक रथ्या सांपडणार नाहीं कीं, ज्यांत दहावीस शिवालयें नाहींत. तसेंच लहान लहान कोनाड्यांत किंवा घाटांवरील मठींत तर अगणित शिवलिंगें आहेत!! असें सांगतात कीं, जयपुरचा राजा **मानसिंग** यानें एका दिवसांत १ लक्ष शिवलिंगांच्या पाषाणावर कोरलेल्या प्रतिमांची स्थापना केली! पैकीं कांहीं प्रतिमा अद्याप दृष्टोत्पत्तीस येतात.

या मंदिरांपैकीं कांहींचीच फक्त पूजा यथासांग होते व कांहींचा अगदीं त्याग केलेला दिसतो!! बरें ही शिवलिंगें अगणित असल्याकारणानें त्यांची पूजा यथासांग होत नसेल हें ह्मणणें कांहीं सयुक्तिक दिसतें. परंतु पुष्कळ रुपयांचा व्यय करून बांधिलेल्या कांहीं मोठ्या शिवालयांतूनही हा असाच प्रकार अनुभवास येतो! ह्मणजे पुष्कळ शिवालयें अशीं आहेत कीं, वर्षानुवर्षें त्यांतील शिवलिंगाची पूजा सुद्धां कोणी करीत नाहीं, व बांधणारांनीं तीं काय उद्देशानें बांधिलीं असावीत अशी शंका आंतील भयाण जागेकडे पाहिलें ह्मणजे उत्पन्न होते. कांहीं वरील कोरींव काम अत्युत्कृष्ट असून प्रेक्षणीय आहे; व कांहींवरील इतकें विद्रूप आहे कीं, त्यावर नजर सुद्धां फेकवत

नाहीं. ह्या मंदिरांतून बाहेर पडेपर्यंत बहुतकरून नाक तोंड दाबून घेण्याची पाळी येते, कारण सभा मंडपांत अथवा देवाचे गाभाऱ्यांत जातांच कोळ्यांचे विष्टेची घाण येऊं लागते; आणि वर जिकडे पहावे तिकडे पाकोळ्यांची व इतर पक्ष्यांचीं शेंकडों घरटीं लागलेलीं अवलोकनांत येतात. पूर्णपणें अनास्था व हेळसांड केलीलीं हीं शिवालयें पाहून जगन्नियंत्या परमेश्वरानें सुख दुःखादि भोक्तृत्व फक्त आह्मांसच लाविलें नसून तें स्वतःसही लावून घेतलें कीं काय असें वाटूं लागतें. असो.

काशींतील मुख्य देवता ह्मटल्या ह्मणजे **छपन्नविनायक, अष्टभैरव, द्वादशसूर्य** वगैरे अनेक आहेत. त्यांची नामावली शेवटीं पुस्तकांत दिलीच आहे. एखादा भाविक गृहस्थ सहज रस्त्यांतून '**बं बं महादेव**' गुरु गर्जना करीत जात असतां निदान पांच पंचवीस ठिकाणीं सहजरीत्या वंदन करतांना दृष्टीस पडतो; अशी दृढ भक्ति अन्य लोकांत क्वचित् आढळेल.

यवनांचे कारकिर्दींत हिंदूवर पुष्कळ जुलूम व जांच झाला; त्यांनीं सर्व प्रकारें आमचा छळ केला, आमच्या पवित्र मानलेल्या मूर्ति तर त्यांनीं भ्रष्ट केल्या; स्त्रियांवर जुलूम करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं; व अनेक प्रकारें हिंदुधर्म नष्ट करण्याचे उपाय केले. परंतु ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट नव्हे काय कीं, आमचा धर्म अद्याप

कायम आहे. या मुसलमानांनीं हिंदूंवर छल केल्याविषयीं शेरिंगनें आपल्या जातभाईस पुढील उपदेश केला आहे:—'युरोपियन लोकांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं मुसलमानांचा स्वधर्माभिमान इतका आहे कीं तो त्यांच्या अंगांत खिळत आहे व कालांतरानें जर हिंदुस्थानदेश पुन्हां मुसलमानांचे ताब्यांत गेला तर हिंदुस्थानांतील सर्व मिशनगृहें, व संस्था आणि प्रार्थनामंदिरांचा मागमूस सुद्धां राहणार नाहीं.' असो. गेल्या शतकापर्यंत यवनांचा अंमल जारीनें असल्या कारणानें आमच्या धर्मास उतरती कळा लागली होती; व यदा कदाचित् आणखी जर दोन चार औरंगजेब झाले असते तर त्यांच्या तडाक्यांतून हा धर्म वांचता किंवा नाहीं याची शंकाच आहे. परंतु गेल्या शतकाचे आरंभापासून तों शेवटपर्यंत मराठ्यांनीं मोठ्या बहादुरीनें स्वराज्य स्थापन केल्यामुळें हिंदुधर्मास टवटवी आली व त्यानें आपलें नष्टवैभव मोठ्या शिताफीनें मिळविलें! परंतु कालगती विचित्र असल्यामुळें आह्मीं पुन्हा विपन्नावस्थेप्रत येऊन पोहोंचलों आहों!! असो. गेल्या शेंपन्नास वर्षांत जिकडे तिकडे नवीन मंदिरेंच मंदिरें झालीं आहेत. उत्तर हिंदुस्थानांतही मंदिरांची संख्या गणित श्रेढीप्रमाणें वाढत गेली; आणि काशींत तर विचारायलाच नको!! ह्या अवधींत पुष्कळ जुन्या मंदिरांचाही

जीर्णोद्धार झाला; आणि हल्लीं प्रतिवर्षीं श्रद्धाळुलोक शेंपन्नास नवीन मंदिरें बांधतात. परंतु शेंकडों जुन्या आणि ओसाड मंदिरांकडे कोणी ढुंकून सुद्धां पहात नाहीं. ह्यापासून दोन तोटे होतात. एकतर पैशापरी पैशाचा चुराडा होतो; व दुसरें ज्या हेतूनें मंदिरें बांधिलीं जातात तो हेतुही सफल होत नाहीं. प्रतिवर्षीं पुष्कळ संस्थानिकांचें या क्षेत्रीं आगमन होतें, व ते आल्यानंतर त्यांनीं एखाद्या मंदिराची स्थापना न करणें ह्मणजे त्यांच्या मोठेपणास बट्टा आणणें आहे; अशी त्यांची समजूत असल्या कारणानें एखाद्या शिवालयाची स्थापना करतात. नंतर एक पुजारी व पांचदहा पानांचें छत्र वगैरे तजवीज करतात. पुढें असें होतें कीं, तो ब्राह्मण पुजेपुरताच मंदिराशीं संबंध ठेवतो; व अन्नसत्रही नीटपणें चालत नाहीं. एकंदरींत कांहीं दिवस लोटल्यावर सर्व अव्यवस्था होते. सारांश कीं शिवालयांची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे. सुमारें ६० वर्षांपूर्वीं **जेम्स् प्रिन्सेप** नांवाच्या साहेबांनीं या शहरांतील मंदिरांची मोजणी केली होती. त्यावरून त्यावेळीं या क्षेत्रांत १००० मोठीं शिवालयें व ३३३ मशीदी होत्या असें दिसतें. त्यानंतर सुमारें ३० वर्षांनंतरच्या मोजणीचा तपशील येणेंप्रमाणें:—

| मोहोल्ले. | मंदिरांची संख्या. | मशीदींची संख्या. |
|---|---|---|
| १ कोतवाली.... ... ... | २६१ | १९ |
| २ काळभैरव.... ... ... | २१६ | २० |
| ३ अधमपुरा.... ... ... | ४८ | ५४ |
| ४ जैतपुरा. ... ... ... | ३० | ९७ |
| ५ चेतगंज. ... ... ... | ५३ | ३२ |
| ६ भैलपूर. ... ... ... | १५४ | १६ |
| ७ दशाश्वमेध.... ... ... | ६९२ | ३४ |
| बेरीज. ... | १४५४ | २७२ |

ही वरील संख्या सुमारें ३० वर्षांपूर्वीची आहे. आज तागाईत पुष्कळ नवीन मंदिरें अस्तित्वांत आलीं आहेत. यावरून इतकें अनुमान निघतें कीं, हल्लींच्या शांततेच्या काळांत दिवसेंदिवस मंदिरांची वाढ होत चालली आहे.


आतां देवालयांची संख्या वाढणें ह्मणजे अर्थात् पुजाऱ्यांस उदर निर्वाहाचें एक चांगलेंच साधन होतें. व त्यांना ही गोष्ट इष्टच असते हें निराळें सांगणें नकोच. प्रत्येक देवालयांत एक पुजारी असतो. हा यद्देशीय असतो किंवा क्वचित् महाराष्ट्र ब्राह्मणही असतो, व यांस इकडे 'पांडे' अथवा 'पंडे' असें ह्मणतात. हे पंडे शरीरानें चांगले धष्टपुष्ट असून यात्रेकरूंस फार छळतात.

याचा अनुभव **काशी**यात्रा करून आलेल्या लोकांस थोडा बहुत तरी असेलच. विश्वेश्वराच्या पंड्यास जितकें उत्पन्न आहे तितकें उत्पन्न आणखी कोणाही पंड्यास नसेल. हा पंड्या एखाद्या सरदाराप्रमाणें घरीं हत्ती बाळगून राहतो. इतका धनवान आहे तरी त्याची धनतृष्णा कमी नाहीं!! परंतु सगळ्यांचीच अशी स्थिति नाहीं. यांपैकीं पुष्कळांस पोटभर खाण्याची देखील पंचाईत आहे. मोठमोठाले पंडयांकडूनही यात्रिकजनांस पीडा सहन करावी लागते; मग जे गरीब आहेत, व ज्यांना कुटुंबभार सहन होत नाहीं अशांकडून त्यांना पराकाष्टेचा त्रास भोगावा लागतो यांत नवल तें कोणतें? एखाद्या सभ्य व श्रीमान मनुष्यास यांनीं पाहिलें कीं त्या बिचाऱ्यांची काय धांदल होते ती त्यांसच विचारावी. त्यास असें होतें कीं, मी मंदिरांतून केव्हां एकदां बाहेर पडेन. मंदिरांतून बाहेर पडेपर्यंत 'दक्षिणा रखो' हें रहाटगाडगें याच्या पाठीस लागलें असतेंच. कर्मधर्मसंयोगानें तो जर गरीब असला व त्याच्या एक दोन पैशानें जर पंडयांचें समाधान न झालें तर गांठचा पैसा देऊन वर आणखी 'दखनका कंगाल' अशा प्रकारें गालीप्रदान करण्यासही ते मागें पुढें पहात नाहींत!! ही पंडयांची जात अशिक्षित असल्याकारणानें त्यांच्यांत दया, क्षमा, शांति किंवा तृप्ति इत्यादि गुणांचें वारेंही नसतें. कधीं कधीं असा प्रसंग येतो कीं, यात्रिकजनांवर ते हात देखील टाकतात. **चक्रपुष्करणीं**चे

तीर्थावरील पंड्या तर ठराविक पैसे घेतल्याशिवाय आंत स्नान करूं देत नाहीं. या तीर्थावर वारंवार तंटे होतात. परंतु सत्तेपुढें शहाणपण नाहीं ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे.

पंड्यांप्रमाणें येथें एक दुसरी क्रूर व आडदांड जात आहे. त्यांस 'गंगापुत्र' अथवा 'घांटे' ह्मणतात. गंगापुत्र नांव पडण्याचें कारण ते असें सांगतात कीं, आमची गंगेपासून उत्पत्ती झाली आहे. हे लोक दिवसभर घाटांवर बसून श्राद्ध संकल्प सांगून जी कांहीं प्राप्ति होईल त्यावर आपली उपजीविका करतात. यांच्या उत्पत्तीविषयीं फारसा विचार न करितां त्यांच्या नैतिक वर्तनाविषयीं पाहूं गेलें असतां त्यांच्याहून हलकट जात दुसरी कोणतीही नसेल असें ह्मणणें धाडसाचें होणार नाहीं. यांपैकीं पुष्कळांना अक्षर ओळख सुद्धां नसते. श्राद्धसंकल्प वगैरे नीटपणें सांगतां येत नाहीं. वाणी फार अशुद्ध असते. सहज बोलणें देखील अभिमानाचें व उद्धटपणाचें असतें. ज्यांस ह्मणून ह्या लोकांचा अनुभव असेल त्यांस हें वर्णन बहुतकरून सौम्यच वाटेल. आतां सगळेच एका वर्गांतले असतील असें नाहीं. त्यांतही कांहीं संभावित व सूज्ञ आढळतील परंतु अशांची संख्या फार थोडी. मारामारी करण्यांत यांचा पहिला नंबर!! शरीरानें गलेलठ्ठ आणि मल्लविद्येंत निपुण असून व्यायाम व कसरतीचा यांना फार शोक असतो. यांचें नित्य

कर्म ह्मटलें ह्मणजे प्रातःकाळीं सूर्योदयापासून तों दोन प्रहरपर्यंत आपापल्या घांटावर बसून गप्पाष्टकें झोंकून कालक्षेप करावयाचा. इतक्या अवधींत त्यांस आपल्या पोटापुरती प्राप्ति सहज होते. गंगेवर स्नान करण्याकरितां नित्य गर्दी असतेच. तेथें हे लोकांस भस्म, गंध, आसन वगैरे देतात यामुळें महिन्याचे कांठीं घांट्यांस कांहीं तरी द्यावे अशी प्रत्येकास साहजिकच बुद्धि होते. ग्रहण अथवा इतर एखादा मोठा पर्वकाळ आला ह्मणजे तर यांची चंगळच उडते. अस्तु. यात्रेकरूंनीं यांशीं फार तोंड न लावितां व विशेष प्रसंग न ठेवतां आपल्या कामाकडे लक्ष ठेवावें.



# भाग ४ था.

## काशींतील प्रसिद्ध देवालयें.

१ विश्वेश्वरः–काशी क्षेत्रांतील आदिदैवत ह्मटलें ह्मणजे **विश्वेश्वर** होय. ह्मणून प्रथमतः त्याचें वर्णन केलें पाहिजे. हें मंदिर शहराचे मध्यभागीं असून फार सुप्रसिद्ध आहे. दर्शनाभिलाषी लोकांच्या झुंडीच्या झुंडी नित्य अवलोकनांत येतात. एकादशीचे दिवशीं व कधीं मोठा पर्वकाळ असला ह्मणजे तर देवळांत मनस्वीच गर्दी होते. अशा संधीस बदमाश व लफंगे लोकांस चांगलेंच फावतें! कधीं कधीं बिच्याऱ्या यात्रिकजनांस तर पोलिसचा मार खाण्याचाही प्रसंग येतो!!

मंदिरांत प्रवेश करण्यास मुख्य द्वार दक्षिण दिशेस असून फारच संकुचित आहे. हें द्वार पितळेच्या पत्र्यानें मढविलें असून, त्यावर अनेक देवतांच्या प्रतिमा कोरल्या आहेत. शिरोभागीं एक लहान गणपतीची मूर्ति आहे. प्रवेश केल्यावर अंतर्भागीं अनेक शिवलिंगें अवलोकनांत येतात. अभ्यंतर भागांतील चौक फार संकुचित असून

त्यांत बिल्वपत्रांचा एक ढीग सडत असलेला दृष्टीस पडतो. यामुळें आंतील हवा नेहमीं दूषित असून घाण येते. मंदिरांत प्रवेश केल्यावर उजव्या हातास **अविमुक्तेश्वराचें** लिंग आहे, व डावे हाताकडे भगवान् **विष्णूची** मूर्ति आहे. दुसऱ्या दोन कोनांत **पार्वती** व **अन्नपूर्णा** देवता आहेत. चौकाचे मध्यभागीं तीन फूट उंचीचा एक चवथरा लागतो. तो चढून वर गेल्यावर मध्यभागीं **वैकुंठेश्वराची** पिंडी आहे व त्याचे उजवेकडील खोलींत **विश्वेश्वर** आणि डावेकडील खोलींत **दंडपाणि** आहेत. **विश्वेश्वराचे** खोलींतील पृष्ठभाग संगमरवरी पाषाणानें आच्छादलेला आहे. ही खोली फार संकुचित ह्मणजे फक्त पांचसात मनुष्यांचाच आंत समावेश होण्यासारखी आहे. खोलींत औरसचौरस दोन हात लांबीरुंदीचे, व एक हात खोल असें कुंड आहे; यांतच विश्वेश्वराची पिंडी आहे. उष्णकाळीं महादेवास उष्णतेचा ताप न व्हावा ह्मणून हें कुंड गंगोदकानें अहोरात्र भरलेलें असतें. कुंडासन्निध एक दोन पंडे बसलेले असतात, ते कुंडांत टाकिलेला नैवेद्य किंवा दक्षिणा उचलण्यांत केवळ नदी किनाऱ्यावरील बकासारखे तत्पर व आतुर झालेले असतात. अनेक श्रीमान् लोकांनीं हें कुंड भरून दक्षणा दिली आहे असें सांगतात. **रणजितसिंगानें** तर एकवेळ कुंडभर मोहोरा **विश्वेश्वरास** अर्पण केल्याविषयीं ख्याती आहे. येथील पंड्यांचा साधारण असा कायदा आहे कीं जो कोणी दक्षिणा देतो त्यासच ते प्रसाद देतात. बाकीच्यांस देत नाहींत!

विश्वेश्वर जितका पूज्य आहे तितका **दंडपाणी** नाहींसें वाटते. कारण त्यास अंधकार वास करावा लागतो, **दंडपाणी**-चे खोलींत एक संगमरवरी पाषाणाची **गणपती**ची सुरेख मूर्ति असून ती प्रेक्षणीय आहे. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें चतुःष्कोनांत ज्या चार मूर्ति आहेत त्या प्रत्येकावरील गाभारा तीसपसतीस फूट उंचीचा आहे. तसेंच **वैकुंठेश्वरा**वरील गोलाकृति घुमटही विस्तीर्ण असून तो व **विश्वेश्वरा**वरील घुमट हे सुवर्ण पत्र्यांनीं मढविलेले असल्यामुळें प्रातःकाळीं उदय झालेल्या सहस्ररश्मीचीं किरणें त्यांजवर पडलीं असतां तो देखावा पाहून नेत्रांस फारच आनंद होतो. हा सर्व खर्च **रणजितसिंगा**नें दिला असें सांगतात. **विश्वेश्वरा**चा घुमट जमिनीपासून सुमारें ९० फूट उंच असून बाह्यभागीं अनेक देवता आहेत. या मंदिरांत अनेक घंटा आहेत. पैकीं एक अद्वितीय आहे. ही नेपाळच्या राजानें दिली असें सांगतात. याशिवाय या देवळांत अनेक शिवलिंगें आहेत. या सर्वांचें वर्णन करणें कंटाळवाणें होईल तथापि **विश्वेश्वरा**चे 'दरबारा' विषयीं मात्र चार शब्द लिहिणें अवश्य आहे.

हा **दरबार** मंदिराचे पिछाडीस असून त्यांत भिन्न भिन्न तांब्यांचीं अनेक शिवलिंगें आहेत. यांचेंही दर्शन भाविक जन घेतात. ही सर्व व्यवस्था ऑंग्लदेशांतील पार्लेमेंटाप्रमाणें आहे. ह्मणजे काशिक्षेत्राचा कोतवाल अथवा ज्यानें ग्रामसंरक्षकत्व पतकरिलें आहे तो **काळभैरव** होय. अन्न पुरविणारी देवी **अन्नपूर्णा** होय. खजिनदार कुबेर

अष्टप्रधानमंडळ व खास दरबार हा तर मंदिराचे सन्निधच आहे. हा सर्व प्रकार परकीयांस फार हास्यास्पद वाटतो.

हें सांप्रतचें मंदीर काशीखंड पुराणांत वर्णिलेलें नसून हें अगदीं अर्वाचीन असलें पाहिजे हें पाहतांक्षणींच लक्षांत येण्यासारखें आहे. मंदिराची रचनाही अर्वाचीन शिल्पकलेस अनुसरून आहे. हें मंदिर अहिल्याबाईचे कारकीर्दींत बांधलेलें असून त्याचा सर्व खर्च तिनेंच दिला असें सांगतात. मंदिर मोठें प्रेक्षणीय किंवा त्यावरील काम मोठ्या कुशलतेचें आहे असें मुळींच नाहीं. घुमटावर थोडें-बहूत कोंरीव काम आहे, परंतु तेंही इतकें प्रेक्षणीय नाहीं. वस्तुतः या मंदिराचे कामांत मनोवेधकत्व असें कांहींच नाहीं.

ज्या ठिकाणीं विश्वेश्वराचें प्राचीन मंदिर होतें त्या ठिकाणीं सांप्रत एक मशीद आहे. हिंदुधर्मद्वेष्टा औरंगजेब ह्यानें तें देवालय मोडून त्या स्थानीं ही मशीद बांधिली. यावरून मुसलमानांची सत्ता येथें कशी होती याची कल्पना वाचक करतीलच.

विश्वेश्वराचें देवालय व ही मशीद यांत सुमारें २० यार्डांचें अंतर आहे. मशीदीचें काम अगदीं साधें असून दर शुक्रवारीं अल्लोपासकांची गर्दी असते. मशीदीचा घुमट विस्तीर्ण असून चोहों बाजूंस चार मनोरे आहेत. अल्लोपासनेचें दालन प्रशस्त असून पांच हजार मनुष्यांचा समावेश होईल इतकें विस्तीर्ण आहे. ही सर्व मशीद

पाषाणमय असून जमिनीचे पृष्ठभागापासून सुमारें ८ फूट उंचवट्यावर आहे व तिच्या अधोभागीं एक भुयार आहे आणि पिछाडीस एक कबरस्थान आहे. पिछाडीचा भाग हा विश्वेश्वराच्या प्राचीन मंदिराचा अवशिष्ट भाग असून त्याच्या आधारावर मशीदीचा घुमट आहे. हा अवशिष्ट भाग अवलोकन केल्यानें प्राचीन मंदिराची थोडी कल्पना करितां येते, व त्यावरून असा सिद्धांत ठरतो कीं प्राचीन मंदीर हें फार मोठें असलें पाहिजे व कोरींव कामही प्रेक्षणीय असावें. भुयार हें बरेंच खोल असून आंत धोबी वगैरे लोक राहतात. ही मशीद पूर्वाभिमुखी असून प्रवेशद्वार उत्तरेकडे आहे. दोहोंचा रस्ता एकच असल्यामुळें दोन्ही जातीस ही गैरसोय वाटते. थोड्या वर्षांपूर्वी हें पूर्वाभिमुखीं द्वार बंद करण्याविषयीं त्यांनीं बराच उद्योग केला होता, परंतु ती गोष्ट हिंदूंस सहन झाली नाहीं. कारण, या मशीदीच्या संबंधानें दोन्ही जातींत पूर्वीपासून तंटे आहेत. मुसलमानांनीं पूर्वाभिमुखी द्वार केलें होतें तें मॅजिस्ट्रेटच्या हुकुमावरून बंद करण्यांत आलें. हें द्वार अद्याप दृष्टीस पडतें.

ही **मशीद** व **विश्वेश्वर** यांमध्यें '**ज्ञानवापी**' नामें एक कूप आहे. त्यांतील उदक फार पवित्र मानतात. कूपाभोंवतीं सुमारें चार फूट उंचीचा एक अष्टपैलु कठडा आहे. जलाशय फार खोल असून हा कूप लोखंडाचे जाळीनें आच्छादित असल्यामुळें तो दृग्गोचर होत नाहीं. उदक काढण्यापुरतेंच द्वार उघडें असतें या कूपांत फळें, फुलें

वगैरे जिन्नस लोक टाकतात. यामुळें उदक अप्राशनीय असतें; इतकेंच नव्हे तर तें इतकें खारट असतें कीं, तें प्राशन केलें असतां वांती सुद्धां होण्याचा संभव आहे. परंतु श्रद्धा ही बलवत्तर असल्यामुळें भाविक लोक हेंच उदक मोठ्या हौशीनें--कडू औषध पितांना जसें वेडेवांकडे तोंड होतें तसें तोंड करून--प्राशन करितात. अस्तु. या कूपाविषयीं एक चमत्कारिक कथा येथील लोक सांगतात. ती अशी कीं, एके समयीं या क्षेत्रांत पाण्याचा दुष्काळ पडल्यामुळें लोक चिंताग्रस्त झाले होते. अशा समयीं एक तपस्वी ऋषीनें महादेवाच्या त्रिशंकूनें या स्थानीं खणून पुष्कळ पाणी काढिलें. ही गोष्ट महादेवास कळल्यावर त्यास फार हर्ष झाला, व त्या दिवसापासून महादेवानें या कूपांत वास्तव्य केलें. दुसरी एक कथा येथील लोक सांगतात कीं, औरंगजेब बादशाहा जेव्हां मंदिराचा उच्छेद करण्यास्तव आला तेव्हां विश्वेश्वरांनीं या कूपांत उडी घातली. नंतर एका ब्राह्मणाचे स्वप्नीं त्यांनीं येऊन सांगितलें कीं, मी **मणिकर्णि**का घाटीं मिळेन, तेथून काढून माझी स्थापना अन्य ठिकाणीं कर. तात्पर्य, कोणत्याही स्थळाचें महात्म्य वाढविण्यासाठीं अशा प्रकारच्या गोष्टी पुष्कळ ठिकाणीं लोक सांगतात.

**ज्ञानवापी**सन्निध एक दालन आहे. हें एकमजली असून चार चार पाषाणस्तंभांनीं एक एक पंक्ति, अशा

बारा पंक्ति ह्मणजे ४८ नकशीदार स्तंभांनीं विभूषित केलेलें आहे. दक्षिण दिशेस एक संगमरवरी पाषाणाचें लहानच पण टुमदार मंदिर आहे. हें दालन सुविख्यात श्री. **दौलतराव शिंदे** अलिजाबहादूर यांची राणी श्रीमती **बायजाबाई** यांनीं इ. स. १८२८ सालीं बांधलें.

जवळच पटांगणांत एक अजस्र नंदी आहे. याची उंची पांच किंवा सहा फूट असून पोटाचा घेर अजमासें १२ फूट आहे. हें प्रकरण पाहून लहान लहान मुलें कदाचित् घाबरून जाण्याचाही संभव आहे. हा नंदी नेपाळचे राजानें विश्वेश्वरास अर्पण केला असें सांगतात. जवळच एक शंकर पार्वतीची मूर्ति आहे. ही मूर्ति हैद्राबादचे राणीनें स्थापिली अशी ख्याति आहे.

आपण ज्या रस्त्यानें गेलों त्याच रस्त्यानें बाहेर आलों तर बाहेर आल्यावर चार यार्डांचे अंतरावर **शनैश्वराची** मूर्ति आहे. ही मूर्ति सर्वांग नसून फक्त रौप्यालंकृत चेहरा अवलोकनांत येतो. अवशिष्ट भाग वस्त्राच्छादित दाखविला असतो.

शनैश्वराचें दर्शन घेऊन आपण अंमळ दहा पावलें पुढें गेलें ह्मणजे आपणांस सुप्रसिद्ध **अन्नपूर्णेचें** मंदीर लागेल. अन्नपूर्णा ह्मणजे अन्न पुरविणारी अशी ही देवी आहे. येथें नित्य गोर गरीबांस अन्नदान करण्यांत येतें. हें देवालय विस्तीर्ण असून अभ्यं-

तर भागांत अनेक गाई व बैल तसेच दोनचार मयूर इतस्ततः संचार करीत असलेले दृष्टीस पडतात. ह्या ठिकाणीं यात्रिकजनांनीं देवास समर्पण करण्याकरितां आणिलेले पदार्थ फार जपून न्यावे लागतात. कारण येथील गाई इतक्या सोकावलेल्या आहेत कीं, एखादा पदार्थ पाहतांच त्यावर झडप घालतात. हें देवालय अर्वाचीन असून दुसऱ्या बाजीरावानें बांधिलें असें सांगतात. मंदिराचा डौल ह्मणण्यासारखा भव्य नाहीं. परंतु बाह्यभागीं रंगीत वेलबुट्टी वगैरे नकशीचें काम प्रस्तुत मलीन व पुसट असें दृष्टीस पडतें. या मंदिराची डागडुजी अलीकडे बऱ्याच वर्षांत झाली नाहींसें दिसतें. मंदिराची उंची जमिनीपासून सुमारें ६० फूट आहे. घुमटाचा बाह्यभाग चित्रविचित्र रंगानें सुशोभित केला आहे. परंतु रंग उडत चालल्यामुळें उत्तरोत्तर त्याची शोभा कमी होत चालली आहे. आंतील सभामंडप संगमरवरी पाषाणानें विभूषित असल्यामुळें अभ्यंतर भागास विशेष शोभा आली आहे. अन्नपूर्णेची मूर्ति लहान असून सणावारीं मात्र अलंकारांनीं विभूषित करितात. चौकाचे चतुष्कोनांत चार मूर्ति आहेत. एकांत सूर्यनारायण सप्तमुखी घोड्याच्या रथांत आरूढ झालं आहेत. एकांत कुबेराची मूर्ति आहे, एकांत गणपतीची व एकांत मारूतीची. विश्वेश्वराप्रमाणेंच याहि देवालयांत स्वच्छतेचा अभाव आहे.

अन्नपूर्णा व शनैश्वर या देवालयांच्यामध्यें एक अरुंद गल्ली आहे. त्यांत **शुक्रेश्वराचें** देवालय आहे. ज्या कोणास संतती होत नसेल त्यानें याची आराधना केली असतां संतान प्राप्त होतें असें ह्या देवाचें महात्म्य आहे असें सांगतात.

अन्नपूर्णेचें देवालय सोडून आपण आणखी कांहीं पावलें पुढें गेल्यावर **धुंडिराज** गणपतीची ओबडधोबड मूर्ति गल्लीचे कोंपऱ्यावरच लागते. ही मूर्ति त्रिलोचनी असून कांहीं अवयव रौप्यालंकृत आहेत.

**धुंडिराजाचें** दर्शन घेऊन सुमारें चाळीस यार्डांवर **साक्षी विनायकाचें** देवालय आहे. ही मूर्ति पहातांक्षणीं हंसूं कोसळतें. देवालय लहानच असून सुमारें १२५ वर्षांपूर्वीं कोणी मराठ्यानें बांधिलें आहे. साक्षीविनायक नांव पडण्याचें कारण इतकेंच कीं, पंचक्रोशी यात्रा करून आल्यावर याचें दर्शन घ्यावें लागतें. ह्मणजे हा आपल्या रोजनिशींत नोंद करून ठेवतो. याचें दर्शन न घेतलें तर पंचक्रोशी यात्रा निष्फळ होते.

वर वर्णन केलेल्या मंदिरांशिवाय याच मोहोल्यांत आणखी एक स्थळ आहे. तें **काशीकर्वतकूप** या नांवानें प्रसिद्ध आहे. पुष्कळ यात्रिक जन या कूपाचें दर्शन घेतात. या कूपाविषयीं **काशी**खंडांत आधार मुळींच नाहीं, व हा कोणी पोटार्थी ब्राह्मणानें बांधिला असावा. या कूपाची घटना जरा चमत्कारिक आहे. यांत उदक मुळींच नाहीं.

कूपाचें तळाशीं एक महादेवाची पिंडि आहे. परंतु कूप फार खोल असल्याकारणानें पिंडीचें दर्शन वरूनच जर कोणी करूं म्हणेल तर होणार नाहीं. कारण आंत अंधार आहे. खालीं जाण्यास एक सोपान मार्ग आहे. परंतु हा सरकारी हुकुमानें बंद ठेवण्यांत आला आहे. फक्त पुजाऱ्यास त्या मार्गानें जाण्याची परवानगी आहे. याचें कारण असें सांगतात कीं, कांहीं वर्षांपूर्वी या ठिकाणीं फारच ठकबाजीचा प्रकार होत असे. तो असा कीं, येथील पंडे लोक यात्रिकजनांस वर सांगितलेल्या सोपान मार्गानें मात्र खालीं घेऊन जाऊन त्यांजजवळील असेल नसेल तेवढें बलात्कारानें घेऊन त्यांस बाहेर काढून देत. ही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांचे नजरेस आणल्यावरून तो रस्ता मुळींच बंद करण्यांत आला. दर्शन घेणें असल्यास बरोबर एक पैशाचा कापूर घेऊन तो पेटवून कूपांत टाकला असतां साहजिक दर्शन होतें. अशीं घोर व भयंकर स्थानें या क्षेत्रांत पुष्कळ आहेत. यात्रिकजनांनीं याविषयीं खबरदारी घ्यावी हें बरें.




# भाग ५ वा.

## प्रसिद्ध देवालयें.

### ( घाट वर्णन ).

**मणिकर्णिका घाटः**—काशींतील दुसरें अति पवित्रस्थान म्हटलें ह्मणजे **मणिकर्णिका** तीर्थ होय. हें तीर्थ सर्व तीर्थांचा राजा आहे. येथें स्नान केलें असतां सर्व पापांचें क्षालन होतें अशी भाविक लोकांची समजूत आहे. **मणिकर्णिका** घाटावर उभें राहिलें असतां आसपास अनेक शिवालयें दृष्टीस पडतात; व क्षेत्राचा अर्धचंद्राकृति भाग नेत्रांस फारच आनंददायक होतो. आपण जणूं काय क्षेत्राचे मध्यभागीं तटस्थ आहोंत असा भास होतो. वास्तविक गोष्ट अशीच आहे. कारण **मणिकर्णिका** तीर्थ हें **गंगा**किनाऱ्याचे मध्यभागीं आहे. या तीर्थाचें महात्म्य **काशीखंडां**त पुष्कळ वर्णिलें आहे. या तीर्थाविषयीं एक मनोरंजक कथा आहे ती अशीः— एके समयीं **विष्णूंनीं** आपल्या चक्रानें या स्थानीं खण-



अर्धचंद्राकृति देखावा [ पृष्ठ ५० ].

ण्यास प्रारंभ करून पुष्कळ खोल खणिलें. परंतु पाणी लागेना. परिश्रमामुळें त्यांस इतका घाम आला कीं, त्या घर्मानें हें तीर्थ भरून गेलें; ह्मणून यास '**चक्रपुष्कर्णी**' असें नांव प्राप्त झालें. पुढें **महादेव** तेथें प्राप्त झाल्यावर त्यांनीं कुंडांत पाहिलें तों त्यांस कोटि तीर्थांचें तेज त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या दिव्य तेजाच्या दर्शनानें ते फार आनंद-भरित होऊन **भगवान विष्णूस** म्हणाले कीं, जो वर हवा असेल तो माग. **विष्णूंनीं** इतकाच वर मागितला कीं, आपण नेहमीं माझे सन्निध असावें. हें ऐकून महादेव अधिक प्रसन्न झाले व त्यांनीं होय असें सांगितलें. या आनंदलहरींत त्यांचें एक कर्णकुंडल खालीं पडलें ह्मणून **महादेवानीं** या तीर्थास '**मणिकर्णिका**' असें नांव दिलें. एकंदरींत लोक हें तीर्थ फार परम पूज्य समजतात.

**चक्रपुष्कर्णी** तीर्थांत उदक थोडें असतें व पुष्कळ स्त्री पुरुष त्यांत नित्य स्नान करतात. यामुळें तें अगदीं अप्राशनीय असतें. या कुंडांत स्नान करण्याचा दर कमींत कमी चार आणे आहे. त्याशिवाय कुंडावरील पंडा आंत उतरूं देत नाहीं.

**मणिकर्णिका** तीर्थाच्या खालच्या बाजूस **तारके-श्वराचें** एक लहान देवालय आहे. यांतील **शिवपिंडिका** सदैव पाण्यांत बुडलेली असते. ह्मणून तिचें दर्शन होत नाहीं. या **मणिकर्णिका** घाटाविषयीं एक चमत्कारिक

गोष्ट सांगतात कीं, तेथें बिल्वपत्र टाकलें ह्मणजे बुडतें. हा एक साक्षात्कारच आहे असें पंडे भासवितात परंतु या ठिकाणीं गंगेचें पात्र सरळ रेषेंत नसल्यामुळें व गंगेला बांक येऊन वळल्यामुळें ही गोष्ट संभवनीय वाटते. शिवाय या ठिकाणीं भोंवरे असल्यामुळें कोणताही पदार्थ त्यांत सांपडला कीं, त्यास खालीं ओढ बसते.

**हरिश्चंद्राची मढीः-काशक्षेत्रास** 'महास्मशान' अशी संज्ञा आहे. **तारकेश्वरा**चेसन्निध एक लहानशी जागा आहे, तेथें **काशीं**तील प्रेतांचा दहनविधि होतो. या जागेंत ज्याचें प्रेत दहन होईल त्यास परलोकीं उत्तम गती प्राप्त होईल असें पुराणांत सांगितलें आहे. दहनविधीची जागा फारच संकुचित असल्यामुळें सर्व प्रेतें पूर्ण जळण्यास अवकाश नसतो. ह्मणून सर्व शरीर दहन होण्याची वाट न पाहतां कांहीं भाग दग्ध होतांच गंगेंत '**रुद्रभाग**' म्हणून प्रेत टाकतात. या संबंधानें येथें एक चमत्कारिक प्रघात आहे तो असाः—प्रेत दहनविधीस लागणारा अग्नि हा जवळील मढीवर असलेल्या '**डोंबार**' (महारा)पासून घ्यावा लागतो. याचें कारण असें सांगतात कीं, ही मढी **हरिश्चंद्र** राजाची आहे. या विषयीं अशी कथा आहे कीं, **विश्वामित्र ऋषीनें** कांहीं कारणावरून **हरिश्चंद्र राजा**चा छळ केला, व शेवटीं त्या राजाकडून **काशीक्षेत्रां**त आपला पुत्र **रोहिदास** व स्त्री **तारामती** यांस विकण्याचा प्रसंग आणवून तसें करविलें. पुढें हा राजा आपलें स्वतःचें

शरीरही विकण्यास सिद्ध झाला. तेव्हां तेथील डोंबारानें त्यास विकत घेतलें; व जीं प्रेतें महास्मशान जागीं जाळण्यास येतील त्यांचीं वस्त्रें घेण्याचें व त्यांपासून कर घेण्याचें काम राजास सांगितलें. हें काम जरी अत्यंत नीच होतें तरी राजा सात्विक असल्यामुळें त्यानें तें पत्करिलें, व तसें त्यानें चालविलेंही !! एके दिवशीं राजाचा पुत्र **रोहिदास** यास सर्पदंश होऊन तो मरण पावला; त्यास दहन करण्याकरितां त्याची माता, **हरिश्चंद्रा**ची स्त्री **तारामती**, ही मध्यरात्रीं या स्थळीं घेऊन आली. असा जरी भयंकर प्रसंग **हरिश्चंद्रावर** आला होता तथापि ठराविक कर घेतल्यावांचून स्वपुत्राचें प्रेतही त्यानें दहन करूं दिलें नाहीं. **हरिश्चंद्रानें** आपल्या **स्त्रीस** व **पुत्रास** ओळखिलें; परंतु स्त्रीनें **हरिश्चंद्रास** ओळखिलें नाहीं. आधींच पुत्रशोक; आणि त्यांत दारिद्र्यामुळें कर देण्यास सामर्थ्य नव्हतें ह्मणून ती फार व्याकूळ होऊन 'अहो **हरिश्चंद्र** तुम्ही तरी कोठें आहां?' असें म्हणून विलाप करूं लागली. परंतु राजानें सत्व सोडिलें नाहीं. ही त्याची विलक्षण सत्वधीरता पाहून **विश्वामित्र** व सर्व देव तेथें येऊन अत्यंत आश्चर्यानें **हरिश्चंद्रास** म्हणाले तुझें अद्भुत सत्व पाहून आम्ही संतुष्ट झालों तर तूं इच्छित वर माग. हें ऐकून राजा बोलला कीं, तुह्मी माझें इच्छित देणार तर **वशिष्ठा**सारखा गुरु, **विश्वामित्रा**सारखा छलकर्ता, **रोहिदासा**सारखा पुत्र व **तारामती**सारखी स्त्री जन्मोजन्मीं मला

प्राप्त व्हावी हेंच माझें इच्छित आहे. हें राजाचें मागणें ऐकून **इंद्रादिदेव** फार संतुष्ट झाले व त्यांनीं राजाचा पुत्र जो **रोहिदास** यास जिवंत केलें. तदनंतर राजानें येथें **हरिश्चंद्रेश्वर** नामें लिंग स्थापून तो आपल्या स्त्रीपुत्रांसहित आपले राजधानीस गेला. हा प्रकार येथें घडून आला म्हणून या स्थलास **हरिश्चंद्राची** मढी असें म्हणतात.

या **मणिकर्णिका** घाटीं येणेंप्रमाणें प्रेतदहनविधि करण्यांत येतो हें वर सांगितलेंच आहे. याच ठिकाणीं सन्याशांना जलसमाधि दिली जाते; ह्या **क्षेत्रांत** सन्याशांचा बराच सुळसुळाट आहे. यांत खरोखर चतुर्थाश्रम पाळणारे आणि दर्शनीय असे कांहीं आढळतील. परंतु बहुतेक मारून मुटकून केलेले नामधारी स्वामी फार; ज्यांना गृहस्थाश्रमांत रोजगार धंदा करण्याचें ज्ञान नाहीं, अथवा कष्ट करण्याचें सामर्थ्य नाहीं किंवा ज्यांना संसार तापत्रयामुळें उद्विग्नता प्राप्त झाली आहे असे लोक प्रथमतः या क्षेत्रीं येतात, आणि कांहीं काळानें संन्यासदीक्षा घेतात. त्यांचे मनाची कोणत्याही प्रकारची शांती झालेली नसते आणि बरें वाईट समजण्याचे ज्ञानाभावामुळें जन्मापासून जडलेल्या कित्येक वाईट गोष्टी जशाच्या तशा असतात. ह्यामुळें ह्या फक्त भगव्या वस्त्रांच्या स्थितींत त्यांस सुख होत नाहीं. कित्येकांना संन्यास घेतल्याबद्दल मागाहून पश्चात्ताप होतो.




मणिकर्णिका घाट [ पृष्ठ ५४ ].

ह्यांत कांहीं कांहीं तर अगदीं तरणे बांड आढळतात. अष्टौप्रहरांत बिचाऱ्यांच्या तोंडांतून एखादे वेळेस "नारायण चुकूनही येईल तर शपथ! पानसुपारी तंबाखु हें त्यांचें सामान्य व्यसन. कित्येक त्याचे वरील वर्गांत ह्मणजे भांग, गांजा अफू ह्यांचें सेवन करणारे आढळतात. कित्येक दारू घेतात; कित्येक व्याजबट्टा करितात; कित्येक चोरून मारून विषयोपभोग घेतात! ह्यांना त्याज्य असें कांहींच नाहीं. अशा प्रकारच्या बोके संन्याशांना त्यांच्यासारख्या संन्याशिणीही मिळतात. भाविक यात्रेकरूंच्या मेजवान्या खाऊन आणि अन्नछत्रीं जेवून माजलेले असे हे गलेलठ्ठ संन्यासी आपल्या साध्या व रेशिमकांठी भगव्या छाट्या फडकवीत चोहोंकडे फिरत असलेले या क्षेत्रांत आढळतात. अस्तु. ह्या वर्गाचा येणेंप्रमाणें साधारण आयुष्यक्रम झाला. पुढें मरणसमयीं त्यांचे हाल फार होतात. मठांत जे संन्यासी राहतात त्यांजकडून संन्यासदीक्षा मठाधिकारी जवळ असेल नसेल तें घेऊन नंतर मठांत राहण्यास जागा देतात. व मग अन्नछत्रीं भोजन व मठीं निद्रा येणेंप्रमाणें हे कालक्षेप करतात. मृत्यूनंतर इतर ठिकाणचे रिवाजाप्रमाणें त्यांस जमिनींत पुरीत नसून गंगेंत जलसमाधी देतात. तो विधि असा कीं त्यांचे पाठीवर व छातीवर एक दगड ठेवून एका मोठ्या दोरीनें बांधून मणिकर्णिका घाटीं खोल पाण्यांत तें गाठोडे सोडून देतात. तें खालीं जातांच तेथील वहिवाटदार जलचर प्राण्यांना तें एक चांगलेंच भक्ष्य होतें. असो.

या **मणिकर्णिका** घाटावर **अमेठीवाल्या** राजाचें अर्वाचीन पद्धतीचें अत्युत्तम मंदीर आहे. त्यावरील कोरींव काम प्रेक्षणीय आहे. या धाटणीचीं देवालयें **काशींत** फारच थोडीं आहेत.

या घाटाचे उत्तरेस **शिंद्या**चा व नागपूरचे **भोंसल्या**-चा असे दोन भव्य घाट आहेत. पैकीं **शिंद्या**चा ह्मणजे **बायजाबाई**चा घाट. हा अर्धवट तयार झाल्यावर धरणी-कंपामुळें एका बाजूस झुकलेला अवलोकनांत येतो. हा घाट जर पूर्ण तयार झाला असता तर याचें काम अद्वितीय झालें असतें. **भोंसल्या**चा घाटही मनोवेधक आहे. या घाटाचें काम मजबूत असून त्यास खर्च फार लागला आहे असें ह्मणतात. **काशींत** अनेक घाट आहेत परंतु त्याचे तोडीचा दुसरा घाट मुळींच नाहीं. जवळच **शिंद्या**चा दुसरा घाट आहे. त्यास '**गंगामहाल**' ह्मणतात. मंदीर प्रेक्षणीय असून तेथें एक अन्नसत्रही आहे, व चातुर्मासांत येथें कथा, पुराण वगैरे होतें.



अमेठीच्या राजाचें शिवालय [ पृष्ठ ९६ ].



# भाग ६ वा.

## प्रसिद्ध देवालयें.

( पुढें चालू. )

**दशाश्वमेध घांटः**—काशीक्षेत्रांत जीं सुप्रसिद्ध पंचतीर्थें आहेत, त्यांपैकीं **मणिकर्णीका** तीर्थाचें वर्णन गेल्या भागांत आलेंच आहे. आतां आपण **दशाश्वमेध** घाटाकडे वळूं. हा घाट **मणिकर्णिका** घाटापासून पाव मैलाचे अंतरावर असून मोठा भव्य आहे. प्रातःकाळीं व सायंकाळीं स्त्रीपुरुषसमूह घाटावर स्नानसंध्या, पूजार्चा, करीत असलेला अवलोकनांत येतो. **दशाश्वमेधाविषयीं काशीखंड** पुराणांत एक मोठी मनोरंजक कथा आहे, त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—एके समयीं मंदराचल पर्वतावर **शंकरपार्वती** वास करीत असतां **काशीक्षेत्राची** खबर पुष्कळ दिवसांत न आल्यामुळें **महादेव** फार चिंताग्रस्त झाले होते. त्या समयीं **काशींत दिवोदास** राजा राज्य करीत होता. तो आपल्या तपोबलाचे सामर्थ्यानें इतका प्रबल झाला होता कीं, त्यानें **काशींतील** सर्व देवादिकांस

काशीबाहेर हाकून दिलें होतें. प्रत्यक्ष विश्वेश्वरासमुद्धां त्यानें काशींतून हद्दपार केलें होतें व यामुळें विश्वेश्वर मंदराचल पर्वतावर जाऊन राहिले होते; व मधूनमधून ते आपल्या गणांस निरनिराळ्या रूपानें दिवोदासाकडून पाप करवून त्यास राज्यपदभ्रष्ट करविण्याचे हेतूनें व क्षेत्रांतील वर्तमान आणविण्याकरितां पाठवीत असत. त्याप्रमाणें त्यांनीं अनेक देवादिकांस पाठविलें. परंतु जो ह्मणून या क्षेत्रीं येई त्यास पुन्हां परत जाण्याची इच्छाच होत नसे. अखेरीस महादेवांनीं ब्रह्मदेवाकडून काशींतील खबर आणविण्याचा विचार करून त्यास रवाना केलें. आतां दिवोदास राजा हा मोठा नीतिमान आणि पापभीरु असा होता. सबब त्याजकडून एखादें पापकर्म करविलें ह्मणजे तो सहजच राज्यपदभ्रष्ट होईल असें ब्रह्मदेवांनीं मनांत आणलें. ब्रह्मदेव काशीक्षेत्रीं आल्यावर त्यांनीं प्रथमतः अनेक प्रेक्षणीय स्थलें अवलोकन करून नंतर ते इष्टकार्याचे तजविजीस लागले. एके दिवशीं ब्राह्मणाचा वेष धारण करून दिवोदास राजाचे भेटीस ते गेले. त्यांच्या वाक्पटुत्वानें राजा इतका खुष झाला कीं ब्रह्मदेव जें सांगेल तें तो करण्यास प्रवृत्त झाला. ब्रह्मदेवांनीं सांगितलें कीं मी कांहीं मागण्यास्तव आलों नाहीं; परंतु तप करण्याकरितां आलों आहें. इतक्यांत ब्रह्मदेवास विचार सुचला कीं दिवोदासाकडून अश्वमेध करवावा. ह्मणजे यज्ञांत कोठें चूक झाली असतां सहजच तो पदभ्रष्ट होईल.

हा यज्ञाचा विचार त्यानें राजास कळविला. राजानें एक सोडून दहा यज्ञांचें सामान पुरविण्याचें अभिवचन दिलें. नंतर लौकर तो यज्ञसमारंभ या स्थानीं झाला परंतु त्यांत कांहीं न्यून पडलें नाहीं; सारांश **ब्रह्मदेवा**चा हेतु सिद्धीस गेला नाहीं इतकेंच नव्हे परंतु राजानें त्याचा योग्य सत्कार केल्यामुळें त्यांनाही **काशी** सोडून जावें असें वाटलें नाहीं व **काशीं**तच त्यांनीं आपला मुक्काम केला; आणि यज्ञाचे जागीं '**ब्रह्मेश्वर**' व '**दशाश्वमेधेश्वर**' अशा दोन **लिंगां**ची स्थापना केली. येणेंप्रमाणें ही कथा आहे.

अस्तु. **ब्रह्मेश्वरा**ची पिंडी तांब्यानें मढविलेली असून आसपास अनेक छिन्नविछिन्न सांबाच्या पिंड्या अवलोकनांत येतात. यांपैकीं कांहीं फार प्राचीन असाव्या असा तर्क होतो. ही पिंडी सुमारें हातभर उंच असून तिचा घेर चार फूट येईल. **दशाश्वमेधेश्वरा**ची पिंडी तर फारच मोठी येईल. ह्मणजे उंची सुमारें सहा फूट व परिघही तितकाच आहे. हीं दोन्हीं **शिवालयें गंगातटीं** असल्यामुळें पर्जन्यकाळीं पाण्यांतच असतात.

**दिवोदास** राजाविषयीं पुष्कळ मतभेद आहे. या नांवें **काशीं**त एक राजा होऊन गेला यांत मुळींच शंका नाहीं. परंतु हा **ब्राह्मणधर्मी** होता किंवा **बौद्धधर्मी** होता एवढाच वादाचा प्रश्न आहे **बौद्धधर्मी** असावा हें संभवनीय वाटतें. कारण **काशीक्षेत्रां**त असा एक समय होता कीं, त्यावेळीं **ब्राह्मणधर्मा**चा लोप होऊन **बौद्ध**मताचें प्राबल्य

विशेष होतें. पुराणांतरींही **दिवोदास** राजानें वर्णनांत देवतांस **काशींतून** काढून दिलें होतें असें जें वर ह्मटलें आहे तें सर्व याच राजाचे कारकिर्दींत झालें आहे. **काशी-खंडांत** तर दहा अध्याय या राजाचें चरित्रवर्णन आहे. परंतु अशी शंका मात्र येते कीं हा जर बौद्धधर्मी होता तर यानें यज्ञ कसा केला! बौद्धधर्मांत यज्ञयागादि कर्में हें थोथांड समजतात. असो, हा वादग्रस्त विषय आहे सबब त्यांत अधिक न शिरणें हेंच बरें.

**दशाश्वमेध** घाटाला लागूनच परोपकारी जगप्रसिद्ध साध्वी **अहल्याबाई होळकरीण** इचा एक घाट आहे. या घाटाचें काम फारच मजबूत व प्रेक्षणीय आहे. घाटा-वर एक **शिवालय** असून एक अन्नसत्रही नेहमीं चालू आहे.

या घाटाला लागूनच **अहल्याबाई**च्या दिवाणाचा घाट आहे या घाटाचें काम **अहल्याबाई**चे घाटावर ताण आहे सांप्रत हा घाट विकला असून **महाराजा दरभंगा**चे ताब्यांत आहे.

**अहल्याबाई**चा घाट वर चढून गेलें असतां आपल्यास **चौसष्टी देवी**चें मंदीर लागतें. हें देवालय विशेष प्रेक्षणीय नाहीं परंतु ही **देवी** मोठी जाज्वल्य आहे असें सांगतात. या चौसष्टीदेवीविषयीं कथा **दशाश्वमेधेश्वरा**प्रमाणेंच आहे या **चौसष्ट देवी पार्वतीनें दिवोदासा**ला **काशींतून** काढून लावण्याकरितां पाठविल्या होत्या परंतु **काशीचें**

वैभव पाहून त्या **काशींत** ज्या आल्या त्या पुन्हां परत गेल्याच नाहींत.

**चौसष्टी देवीचें** दर्शन घेऊन आपण आपल्या पूर्व स्थानीं ह्मणजे घांटावर येऊं, आणि उत्तरेकडे दृष्टि फेकूं ह्मणजे आपणास **मानमंदिर** घाट अवलोकनांत येईल. हा घाट चढून वर गेलें असतां एक मोठा पिंपळाचा वृक्ष लागतो त्याचे मुळाशीं पांच पंचवीस मोडक्या प्राचीन मूर्ति आहेत, व जवळच **दालभ्येश्वर** नांवें एक **शिवालय** आहे. हें **शिवालय** लहान आहे. ह्याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, जो कोणी याची उपासना मनोभावा-पासून करतो त्याची दारिद्र्यावस्था दूर होऊन तो **श्रीमान** होतो. हा गरिबांचा फार कनवाळु आहे; तसेंच कधीं-काळीं पर्जन्यवृष्टि न झाली तर याजवर अष्टौप्रहर उद-काची संतत धार ठेवल्यानें पुष्कळ वृष्टि होते!! खरोखरींच असें असेल तर आमचें सरकार पर्जन्याभावीं दुष्काळ-निवारणार्थ अनेक उपाय योजण्यांत आणि मेघमंडळांत 'डायनामाइट' उडवून प्रयोग करण्याचे खटपटींत उगीच पडतें!!

अमळ चार पावलें पुढें गेलें असतां **सोमेश्वरचें** एक लहानसें देऊळ लागतें. **सोमेश्वराचा** असा गुण सांग-तात कीं, कोणताही मनुष्य कशाही व्याधीनें ग्रस्त झालेला असो तथापि त्याची व्याधि याचे दर्शनापासून दूर होते! परंतु **काशींत** अनेक लोक रोगग्रस्त आढळतात, व ही

स्थिति कां असावी याचें कारण समजत नाहीं. असो. आणखी चार पावलें पुढें गेलें असतां **वरदान** देवीचें देवालय लागतें. हें प्रातःकाळीं उघडें असतें. या देवतेची आराधना केली असतां वातादि रोग ह्मणजे हातपाय फुगणें वगैरे बरे होतात, असा भाविकजनांचा समज आहे.

अस्तु. आपण आतां **मानमंदिर** येथें पुन्हां परत येऊं. **मानमंदिर** हें नांव जयपूरचा राजा जो मानसिंग त्यानें दिलेलें आहे. या स्थळास मंदिर ह्मणावें तर त्या ठिकाणीं देवालय वगैरे कांहीं नाहीं. मग कदाचित् पूर्वकाळीं असलें तर न जाणो. राजा **मानसिंहास** ज्योतिष शास्त्राचा फार छंद होता. त्यानें पुष्कळ ठिकाणीं वेधशाळा बांधल्या आहेत. परंतु त्याच्या पुत्रानें बांधलेली काशींतील वेधशाळा अपूर्व आहे. दूरदूरचे लोक ती पाहण्याकरितां येतात. हा घाट राजा **मानसिंह** यानें बांधिला आहे व घाटावरील भव्य इमारत व वेधशाळा हीं त्याचा पुत्र राजा **जयसिंह** यानें इ. स. १६९३ व संवत १७५० त बांधिलीं. या इमारतीचें काम सुबक असून दिवाणखाना प्रेक्षणीय आहे. जयसिंहासही गणित शास्त्राचा फारच नाद होता आणि त्या विद्येंत तो इतका प्रवीण होता कीं तत्कालिन् दिल्लीपति जो **महंमदशाहा** यानें त्यास दिल्लीस बोलावून मागील पंचांगांतील कांहीं चुका दुरुस्त करण्यास सांगितलें. हें काम जयसिंहानें उत्कृष्टरीतीनें केलें; व पुष्कळ ठिकाणीं फेरफार करून बादशाहाचे सन्मानार्थ एक नवीन

पंचांग तयार केलें. अजूनपर्यंत त्याच पंचांगाला अनुसरून दिल्लींत पंचांगें तयार करतात. जयसिहानें पुढें ग्रहांचे वेध घेण्याचे हेतूनें दिल्ली, मथुरा, उज्जनी, काशी व जयपूर या ठिकाणीं पुष्कळ द्रव्य खर्चून एकेक वेधशाळा स्थापन केली. त्याचा उद्देश व वेधशाळेपासून होणारे फायदे याविषयीं सविस्तर वर्णन **एशियाटिक् रिसर्चिस**चे पांचवे भागांत दिलें आहे. तें वाचून वाचकांनीं आपली जिज्ञासा तृप्त करून घ्यावी.

प्रवेश मार्गानें आंत गेल्यावर एक विस्तीर्ण चौक लागतो. चौकांतून सोपानमार्ग चढून वर गेलों ह्मणजे प्रेक्षकांस यंत्रशाळा दृष्टीस पडते. तीं पाषाण यंत्रें व तें अद्भुत काम पाहून मन थक्क होऊन जातें. यंत्रांची रचना गोलाकृति, अर्धगोलाकृति, असून त्यांवरील अंश, पळें, विपळें इतक्या चतुराईनें कोरलीं आहेत कीं, त्यांचें वर्णन प्रत्यक्ष अवलोकन केल्याशिवाय होणार नाहीं. आज २०० वर्षें झालीं परंतु ही यंत्ररचना जशी कांहीं नवी आहे असें भासतें. सांप्रत या यंत्रांचा कोणी फारसा उपयोग करून घेत नाहींत ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. ही यंत्रशाला व तिचा उपयोग वगैरे सर्व माहिती **कै. महामहोपाध्याय बापूदेव शास्त्री** सी. आय्.ई. यांनीं 'मान मंदिरस्थ मंत्र वर्णन' नामें छोट्याशा पुस्तकांत दिली आहे. हें पुस्तक सांप्रत दुर्लभ आहे. तथापि ज्या कोणास तें मागविण्याची इच्छा असेल त्यानें काशींतून मागवावें.


या वेधशाळेचें थोडेंसें वर्णन कै. रा. रा. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं केलेल्या ' भारतीय ज्योतिष शास्त्राचा इतिहास ' नांवाचे पुस्तकांत पुढें लिहिल्याप्रमाणें दिलें आहे:—'ही वेधशाला मानमंदिर घांटावर गंगेच्या काठीं आहे. तिला मानमंदिर ह्मणतात. सांप्रत ही इमारत चांगली मजबूत आहे. बाहेरच्या पायऱ्या चढून गेल्यावर आंत एक आंगण लागतें. त्यांतून जाऊन एका जिन्यानें चढून गेल्यावर वेधशाळेचा मुख्य भाग लागतो. वेधशाळेंतील कांहीं यंत्रें फार मोठालीं आहेत, व त्यांचें बांधकाम आज हजारों वर्षें सहज टिकण्यासारखें आहे. असें असून तें इतकें नाजुक आहे कीं, त्यानें तीं यंत्रें करणाऱ्याच्या मूळ हेतूप्रमाणें सूक्ष्म काम व्हावें. याजवर देखरेखीकरितां एक ब्राह्मण आहे. परंतु त्याजकडून नीट दुरुस्ती राहत नाहीं. ऊन्ह पाऊस यांमुळें यंत्रांची खराबी होत आहे. व त्यांचे भाग प्रभाग झिजून दिसत नाहींतसे होत चालले आहेत. वेधशाळेंत गेल्यावर प्रथम **भित्तियंत्र** दृष्टीस पडतें. ती ११ एक फूट उंच आणि ९ फूट १। इंच रुंद अशी याम्योत्तर दिशेंत बांधिलेली भिंत आहे. याच्या योगानें मध्यान्हीं सूर्याचे उन्नतांश आणि नतांश तसेंच सूर्याची परमक्रांति आणि स्थूलाचे अक्षांश काढिता येतील. जवळच एक दगडाचें व एक चुन्याचें अशीं दोन मोठीं वर्तुळें आहेत; व एक दगडाचे चौरस आहे. **शंकुछाया** व **दिगंश** काढण्याकडे याचा उपयोग होत असावा परंतु हल्लीं त्यांवरील सर्व

खुणा पुसून गेल्या आहेत. जवळच **यंत्रसम्राट्** ह्मणून एक मोठें यंत्र आहे. ही याम्योत्तर वृत्तांत बांधिलेली ३६ फूट लांब व ४॥ फूट रुंद अशी भिंत आहे. भिंतीचें एक शेवट ६ फूट ४। इंच उंच, व दुसरें २२ फूट ३॥ इंच आहे. व ही भिंत थोडथोडी उत्तरेस उंच होत गेली आहे; अशी कीं तीवरून **ध्रुव** दिसावा. या यंत्राच्या योगानें खस्थांचे याम्योत्तरेपासून अंतर, क्रांति, विषुवांशही काढितां येतील. येथेंच एक दुहेरी भित्तियंत्र आहे. याच्या पूर्वेस दगडाचें **नाडीवलय** आहे व तसाच दुसरा एक अंमळ लहान **यंत्रसम्राट्** आहे. जवळच दोन भिंतींमध्यें **चक्रयंत्र** आहे. तारांची क्रांति पाहण्याकडे याचा उपयोग करीत असत, परंतु तें हल्लीं दुरुस्त नाहीं. त्याज जवळ एक भव्य, दुसरें **दिगंश यंत्र** आहे. तारांचे दिगंश काढण्याकडे याचा उपयोग करीत असत. तो एक ४ फूट २ इंच उंच आणि ३ फूट ७॥ इंच जाड असा खांब आहे. त्याच्या भोंवतीं ७ फूट ३। इंच अंतरावर दुप्पट उंचीची दुसरी भिंत आहे. दोन्ही भिंतींच्या शिखर पृष्ठांचे ३६० अंश पाडलेले आहेत, व त्यावर दिशा लिहिल्या आहेत. ह्याच्या दक्षिणेस दुसरें एक **नाडीवलय** आहे; परंतु त्यावरील खुणा पुसल्या आहेत. ' येणेंप्रमाणें या वेधशाळेचा वृत्तांत आहे.

हा घांट व **मणिकर्णिका** घांट यांचे दरम्यान आणखी दोन तीन घाट आहेत. पैकीं **मीरघाट** ह्मणून जो आहे, तो फारसा अवलोकनीय नाहीं; परंतु याळाच लागून नेपाळी लोकांचा

एक घांट लागतो. या घाटावरील शिवालय लांकडी असून कोरींव काम चांगलें आहे. शिवालयाची धाटणी कांहींशीं चिनी लोकांच्या देवळाप्रमाणें असून कळसावर सोनेरी मुलामा दिल्यामुळें तें दुरून तेव्हांच ओळखतां येतें. मंदिर प्राचीन असल्यामुळें सांप्रतचा बाह्यभाग अगदीं मलीन दिसतो व हें प्रथमदर्शनीं हिंदूचें देवालय असावें असें वाटत नाहीं. या मंदिराला लागून नेपाळी जोगिणींचा एक मठ आहे. एकंदरींत हेंही मंदिर प्रेक्षणीय आहे.

याच मोहोल्यांत **दिवोदासेश्वर** नामें शिवालय आहे, **दिवोदासा**विषयीं या पुस्तकांत अनेक प्रसंगीं उल्लेख आलाच आहे तेव्हां येथें अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. हें मंदीर साधारण आहे परंतु पुराणप्रसिद्ध असल्यामुळें **काशीं**तील इतर मंदिरांप्रमाणें हेंही पूजनीय आहे.



## भाग ७ वा.

### प्रसिद्ध देवालयें.

(पुढें चालू).

**पंचगंगाघाटः–'पंचगंगा' व 'बिंदुमाधव'** हे दोन्ही घाट एकमेकाला लागून असून हीं दोन्हीं स्थानें अत्यंत पवित्र आहेत. यांपैकीं कोणत्याही घाटावर उभें राहिलें असतां **औरंगजेब** बादशहाची सुप्रसिद्ध भव्य मशिद व तिचे अति उंच दोन मनोरे अवलोकनांत येतात. '**पंचगंगा**' हें नांव पडण्याचें कारण या स्थानीं पांच नद्यांचा संगम झाला आहे. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:–

**किरणा धूतपापा च पुण्यतोया सरस्वती ।**
**गंगाच यमुना चैव पञ्च नद्योऽत्र कीर्तिताः ॥**

या पांच नद्यांपैकीं यमुनेचा संगम तर प्रयागास झाला आहे. बाकी राहिल्या तीन ह्मणजे किरणा धूतपापा व सरस्वती यांचा गंगेशीं संगम येथें जमिनीचे गर्भांतून झाला आहे असें सांगतात.

**पंचगंगाघाट** हा मोठा असून त्यावर पूर्वाभिमुखी लहान लहान मढ्या आहेत व त्या प्रत्येकींत सांबाच्या पिंड्या आहेत. **पंचगंगे**ला लागून **बालाजी**चा घाट आहे. हा घाट व वरील इमारत प्रेक्षणीय आहे. हा घाट दुसऱ्या

**बाजीराव** साहेबांनीं बांधिला असून सांप्रत तो **शिंदे**सरकारचे स्वाधीन आहे; वर एक बालाजीचें मंदिर आहे. इमारतीचें काम लांकडी असून तें **पेशवाई** थाटाचें आहे. याच ठिकाणीं एक **शिंदे**सरकारांनीं मोठें अन्नसत्र ठेवलें असून तेथें दररोज दोन तीनशें ब्राम्हणांस भोजन मिळतें. मंदिरांत प्रवेश केला ह्मणजे एक मोठा सभा मंडप लागतो. आंत एक बालाजीची मूर्ति असून एका बाजूस चंद्र व दुसऱ्या बाजूस सूर्य अशा दोन प्रतिमा आहेत. सभामंडप हा हंड्या झुंबरें यांनीं सुशोभित केला असून भिंतीवर अनेक देवतांचीं चित्रें काढलीं आहेत. मंदिरात चातुर्मास्यांत हरिदासांचीं कीर्तनें होतात. अन्नसत्र व देवालय यांचा खर्च **शिंदे** सरकाराकडून मिळतो. मंदिरांतून बाहेर पडलें ह्मणजे '**गभस्तेश्वराचें**' देवालय लागतें. गभस्तेश्वराचें दर्शन करून बाहेर पडतांच दोन उंच मनोरे दृष्टीस पडतात तिकडे आतां आपण वळूं या.

हीच ती औरंगजेब बादशाहाची मशिद व हेंच तें प्राचीन **बिंदुमाधवाचें** स्थान!! ज्या कोणास **काशीचा** देखावा एकदम घेणें असेल त्यास हेंच ठिकाण योग्य आहे. मनोऱ्यावर गेलें असतां आयतेंच विमानारोहण केल्याप्रमाणें सर्व शहराचा देखावा अवलोकनांत येतो.

ही मशीद फार भव्य असून मनोरे प्रेक्षणीय आहेत. मशीद बांधून जवळ जवळ आज दोनशें वर्षें होत आलीं; तथापि अद्याप नवीनच दिसते. इतक्या चांगल्या स्थितींत ती आहे

यावरून तिचा पाया व बांधकाम फारच मजबूत असलें पाहिजे. मशीदीचे जागीं पूर्वी बिंदुमाधवाचें स्थान होतें त्याचा औरंगजेबानें उच्छेद करून मूर्ति गंगेंत फेंकून दिली व जणुंकाय सर्व मंदिरांवर ताण करण्याचे हेतूनेंच कीं काय हें उंच मनोरे बांधिले. सकृद्दर्शनीं भव्यपणावरून ही मशीद सुंदर असेल असें वाटतें; परंतु तिचा अंतर्भाग पहातांच तो बाहेरील भव्यपणास लाजवितो. या मनोऱ्यावर जाण्याकरितां माणशीं एक पैसा द्यावा लागतो. ह्या मनोऱ्याची उंची हल्लीं सुमारें १४७ फूट आहे. पूर्वी अजमासें २०० फूट होती असें सांगतात; परंतु पुढें मागें ते खालीं कोसळून येतील या भीतीनें इंग्रज सरकारानें ती कमी केली असें म्हणतात कीं या मशीदीची जितकी उंची आहे तितकाच खोल तिचा पाया आहे परंतु ह्यांत कांहीं अतिशयोक्ति असेल कदाचित्. तथापि पुष्कळ खोल असला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. गंगेच्या पृष्ठभागापासून उंची मोजिली असतां सुमारें ३०० फूट येईल असा अदमास आहे. या मनोऱ्याविषयीं एक विशेष लक्षांत ठेवण्या सारखी गोष्ट अशी आहे कीं तळाशीं त्यांचा व्यास ८। फूट असून तो शिखरावर अवघा ७॥ फूट झाला आहे ह्मणजे १९० फूट उंचीच्या मानानें पाहिलें असतां फक्त ९ इंच कमी झाला आहे.


मनोऱ्याच्या पायऱ्या १३० असून वर जाईपर्यंत थकवा तर येतो खराच; परंतु शिखरावर गेलें ह्मणजे श्रम

परिहार झालासें वाटतें. 'शिखरावरून काशी नगरच देखावा, उंच उंच मजल्याच्या पांढऱ्या शुभ्र गृहपंक्ति मध्यंतरीं चमकणारे पवित्र मंदिरांचे सहस्रावधी सुवर्ण कळस, व वायूच्या लहरीबरोबर फडकणाऱ्या अति उच्च ध्वजा वगैरे दृष्टीस पडून मनास फार संतोष वाटतो. एकीकडे अर्धचंद्राकृति झालेला गंगाप्रवाह व त्याचा रजतमय वालुकातट, दूरवर दिसणारी हिरवी गार झाडी व शेतें, आणि सरित्प्रवाहामधून वाहणाऱ्या नौका यांची शोभा पाहून नेत्रांचें रंजन होतें.' अस्तु. ह्याविषयीं प्रसिद्ध **केन** साहेब एम्. पी लिहितात.* 'या मनोऱ्याचे शिखरावर बसलें असतां अधोभागीं अवलोकनांत येत असलेला गंगेचा व संपूर्ण क्षेत्राचा देखावा व आसपास होत असलेला पक्ष्यांच्या मधुर शब्दांचा किलकिलाट ह्यापासून जो कांहीं मनास संतोष झाला त्याचें मला कधींही विस्मरण होणार नाहीं !'

जवळच बिंदुमाधवाचें देवालय आहे. हें देवालय सरदार **श्रीमंत पंतप्रतिनिधी** यांच्या पूर्वजांनीं सुमारें १००–१२५ वर्षांपूर्वी बांधिलें असून नवीन स्थापना केलेलें आहे. देवालयाचा खर्च हजार रुपये सालिना असून एक पांचसहा पानांचें अन्नसत्रही ठेवलें आहे.

आपण आतां पुन्हा गभस्तेश्वराजवळ येऊं. येथून सुमारें पाव मैलाचे अंतरावर **काळभैरवाचें** देऊळ आहे.

* See Pictureque India p. 306.



औरंगजेबचे मनोरे [ पृष्ठ ७१ ].

तिकडे मार्गक्रमण केलें तर मध्येंच **'बायकांचा विठोबा'** नांवाचें एक मंदिर लागतें. हें मंदिर अर्वाचीन असून यांत बायकांचा समुदाय फार असतो व ह्मणूनच यास हें नांव प्राप्त झालें आहे. या मंदिराची मालकीण **द्वारकाबाई** नामें एक विधवा स्त्री आहे. ही स्त्री भाविक असून परोपकारी आहे. येथील शेटसावकार वगैरे लोकांच्या मदतीनें हिनें मंदीर स्थापन केलें आहे. बहुतेक काळ ही ईश्वरभजनांतच घालविते. काशींत तीन स्त्रिया **'जनी' 'मनी'** आणि **'द्वारका'** नांवें प्रसिद्ध आहेत. पैकीं पहिल्या दोन निवर्तल्या व तिसरी **द्वारकाबाई** ही अद्याप हयात आहे.

बायकांचा **विठोबा** सोडून सुमारें ५० कदम पुढें गेलें ह्मणजे **'काटची हवेली'** लागते. हीच एक काय ती लांकडी इमारत या क्षेत्रांत पहाण्यांत येते. ही इमारत पाहिली असतां पुण्यांतील **बुधवार**च्या वाड्याची आठवण होते. या अशा धाटणीची इमारत संपूर्ण **क्षेत्रांत** दुसरी आढळेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. ही इमारत सात मजली असून दुसऱ्या **बाजीराव** साहेबांनीं बांधिली. हल्लीं ती **शिंदे** सरकारच्या स्वाधीन आहे.

ही हवेली सोडून सुमारें ४० यार्डांवर काळभैरवाचें देवालय आहे. प्राचीन मंदिर अगदीं लहान होतें त्याचा जीर्णोद्धार शेवटच्या **बाजीराव** साहेबांनीं केला. **काळभैरव** हें **काशीं**तील ग्रामरक्षक दैवत होय. ह्मणजे संपूर्ण

क्षेत्राचा हा 'कोतवाल' आहे. **काळभैरवा**विषयीं **काशीखंड** पुराणांत पुष्कळ महात्म्य वर्णिलें आहे. यात्रिकजनांना याचें दर्शन अवश्य घेतलें पाहिजे. नाहीं तर यात्रा सफल होत नाहीं असें सांगतात. प्रतिदिनीं पुष्कळ भाविक लोक याचें दर्शन नित्यनेमानें घेतात. **काळभैरवाचे** ठिकाणीं **काशीस्थ** लोकांची पूज्यबुद्धि असून त्यांची अशी समजूत आहे कीं, कोणताही भयंकर रोग किंवा सांथ शहरांत उद्भवली तर ती शमन करण्याची शक्ति या देवाशिवाय अन्य कोणाजवळही नाहीं. या **काळभैरवा**विषयीं लौकिककथा अशी आहे कीं, **औरंगजेब** बादशहा **काळभैरवाचा** उच्छेद करण्याकरितां जेव्हां पुष्कळ सैन्यासह आला त्यावेळीं येथें एक अपूर्व चमत्कार घडला. **औरंगजेबाच्या** सैन्यानें मंदिरांत प्रवेश करतां क्षणींच जिकडे तिकडे भ्रमर उत्पन्न झाले; व त्यामुळें सैन्याची गाळण होऊन अखेरीस फौज मागें हटून तिनें घरचा रस्ता धरला. या गोष्टींत कितपत सत्यांश आहे याचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे, परंतु अशाच तऱ्हेच्या अनेक गोष्टी **काशींत** पुष्कळ ऐकण्यांत येतात. अस्तु.

**काळभैरवाची** मूर्ति काळ्या दगडाची असून चेहेरा रौप्यालंकृत आहे. सभामंडप हा लहानच आहे व त्यांत मयूरपिच्छें लाविलेला सोटा हातांत घेऊन बसलेले पुष्कळ बैरागी व गोसावी आढळतात. त्यांजपासून काळेदोरे (ज्यांस **भैरवाचे गंडे** असें ह्मणतात ते) यात्रिकजन विकत

घेतात. या मयूरपिच्छांच्या सोट्याचा असा प्रताप सांगतात कीं कोणास कांहीं भूतबाधा असली किंवा कोणी रोगग्रस्त असला तर याच्या स्पर्शानें तो मुक्त होतो! या मंदिरांतच फक्त कुत्र्यांना जाण्याची परवानगी आहे. कारण श्वान हें **भैरवाचें** वाहन आहे असें सांगतात. याशिवाय चौकांत अनेक देवता आहेत; परंतु त्या कांहीं वर्णनीय नाहींत. मंदिराचे पिछाडीस शर्करायुक्त चित्रांची व पुष्पांचीं दुकानें आहेत. भाविक लोक हीं चित्रें व पुष्पमाळा **भैरवास** अर्पण करितात.

जवळच एका गल्लींत **'दंडपाणी'**—म्हणजे महादेवाचा दंड—नामें एक मंदिर आहे. व तेथेंच **काळकूप** नामें एक विहीर आहे. या कूपाविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं ज्या कोणास कूपोदकाचें दर्शन होणार नाहीं त्यास सहा महिन्यांचे आंतच मृत्यु येतो. हा कूप फार खोल असल्यामुळें वाटेल त्यावेळीं दर्शन होत नाहीं. दर्शनाची वेळ म्हणजे मध्यान्ह होय. कारण त्यावेळीं सूर्याचें किरण आंत पोहोंचल्यानें साहजिकच उदकाचें दर्शन होतें. याच मंदिरांत **महांकाळ** नामें एक देवता आहे. याविषयींही अनेक आख्यायिका सांगतात.

**काळभैरवा**पासून सुमारें ३०० यार्डांवर उत्तरेस **'वृद्धकाल'** म्हणून एक प्राचीन व पवित्र स्थान आहे. याविषयीं अशी आख्यायिका सांगतात कीं, **सत्ययुगांत** एक राजा वृद्धावस्थेंत रोगग्रस्त होऊन या क्षेत्रीं तप

करण्याकरितां आला. पुष्कळ तप केल्यावर **महादेव** प्रसन्न झाले व त्यास रोगमुक्त करून त्यास पुन्हां तारुण्यावस्था दिली. शेवटीं राजास फार आनंद झाला व त्यानें या ठिकाणीं एक शिवालय बांधिलें. असो. सांप्रत हें स्थान अगदीं जीर्णावस्थेंत असून आंतील भाग मोडकळीस आलेला आहे. मंदिरांत प्रवेश केल्यावर समोरच एक मारुतीची मूर्ति अवलोकनांत येते; व जवळील पिंपळाचे वृक्षाचे तळीं फार प्राचीन मूर्ति आढळतात. असें सांगतात कीं पुरातनकाळीं आंत बारा चौक होते; सांप्रत फक्त सात चौक अवलोकनांत येतात. पैकीं एकांत **दक्षेश्वराची** पिंडी आहे. याविषयीं **काशीखंडांत** अशी कथा आहे:—पूर्वीं दक्ष प्रजापतीनें पुत्रप्राप्तीकरतां एके समयीं यज्ञ करण्याचें मनांत आणिलें व त्याप्रमाणें त्यानें सर्व तयारी केली. सर्व देवादिकांस त्यानें निमंत्रण केलें परंतु त्यानें **महादेवास** व **पार्वतीस** मात्र बोलावलें नाहीं. तथापि **पार्वती** आपण होऊनच पित्याचे घरीं यज्ञास गेली. तिनें यज्ञांत **दक्षराजाची** फार निर्भत्सना करून आपला अपमान केला म्हणून तिनें यज्ञांत आपली आहुती दिली. हें वर्तमान **महादेवास** कळतांच तो अत्यंत कोपायमान झाला, व त्यानें **वीरभद्र** नामें दैत्य उत्पन्न करून त्यास दक्षाचे नाशास पाठविला. **वीरभद्रानें** पुढें यज्ञांत येऊन **दक्षाचें** शिर तोडलें; व यज्ञाचा विध्वंस केला. पुढें सर्व देवता व ऋषी यांनीं त्याची फार स्तुति केली. म्हणून

**वीरभद्र** प्रसन्न होऊन त्यानें बोकडाचें मुख दक्षाचे धडास लावून त्यास जिवंत केलें व त्याच्या नांवानें एक **लिंग** स्थापिलें. म्हणून त्यास **दक्षेश्वर** असें म्हणतात. येणेंप्रमाणें कथा आहे.

या मोहोल्याचे आसपास अनेक मंदिरें आहेत. पैकीं **अमृतेश्वर** हें फार प्रसिद्ध आहे. या मोहोल्यांत प्रति रविवारीं एक लहानसा मेळा भरतो.

**काळभैरवा**पासून वृद्धकाळस्थानाकडे येत असतां मार्गांत रस्त्यावर एक **रत्नेश्वराचें** शिवालय आहे. याविषयीं स्मरणीय गोष्ट सांगतात कीं सुमारें साठ वर्षांपूर्वी **काशीं**तील एका अधिकाऱ्याचे मनांत हें मंदिर रस्त्यावर असल्यामुळें पाडून टाकावें असा विचार केला. पुढें एके दिवशीं रात्रीं महादेवांनीं त्याच्या स्वप्नांत सांगितलें कीं असें करणें फार घातक आहे. म्हणून दुसरे दिवशीं साहेबानें हा बेत रहित केला व मंदिर कायम ठेवलें.

या काळभैरव मोहोल्यांत **गोपालमंदिर** नामें एक देवालय प्रसिद्ध आहे. हें देवालय अर्वाचीन असून त्यांत **श्रीकृष्णाच्या** दोन सुवर्णमूर्ति आहेत. मंदिर उंचवट्यावर असून चौक मोठा विस्तीर्ण आहे, इतकेंच नव्हे परंतु स्वच्छतेच्या मानानें पाहिलें असतां चांगलें असून प्रेक्षणीय आहे.

## भाग ८ वा.

### प्रसिद्ध देवालयें.

(पुढें चालू.)

त्रिलोचन घाटः—बिंदुमाधवाच्या घाटासन्निध ब्रम्हाघाट व दुर्गाघाट आहेत. आणखी पुढें दोन तीन घाट सोडून गेलें असतां त्रिलोचन नामें घाट लागतो. ह्या घाटावर एक सुप्रसिद्ध शिवालय आहे व तें त्रिलोचन नामें प्रख्यात आहे. या त्रिलोचनाविषयीं अशी कथा आहे कीं, श्रीशंकर ध्यानस्त असतां भगवान विष्णु नित्य त्यांचे पूजेस जात असत; व जातांना सहस्र पुष्पें घेऊन जात. हीं पुष्पें शंकरास नित्य अर्पण करण्याचा त्यांचा नियम असे. नित्यक्रमाप्रमाणें एके समयीं ते सहस्र पुष्पें घेऊन गेले असतां क्षणभर त्यांचें चित्त अन्य ठिकाणीं गेलेलें पाहून भगवान विष्णूस फार आश्चर्य वाटलें. शेवटीं त्या पुष्पाचे ऐवजीं त्यांनीं त्यास एक नेत्र अर्पण केला. त्या दिवसापासून महादेवास त्या नेत्रापासून दिसूं लागलें. म्हणून त्रिलोचन नांव त्यास प्राप्त झालें.

त्रिलोचन शिवालय फार प्राचीन असून, पुण्यांतील नथुबाळ नांवाच्या एका गृहस्थानें त्याचा जीर्णोद्धार केला. त्यांत प्रवेश करतांना आंत दुतर्फा अनेक मूर्ति अवलोकनांत

येतात. पैकीं उजवे हाताकडील पाषाण मूर्ति फार पुरातन असावी असें वाटतें. मंदिरांत चार फूट उंचीचा एक शिलास्तंभ आहे त्यास '**कोटीलिंगेश्वर**' असें म्हणतात. या शिळेचे तळीं कोण्या गृहस्थानें **कोटी लिंगा**ची स्थापना केली ह्मणून तिला हें नांव प्राप्त झालें आहे. परंतु सांप्रत शेंपन्नास मात्र अवलोकनांत येतात. याशिवाय अनेक मूर्ति या मंदिरांत अवलोकनांत येतात.

**शिवालया**चे गाभाऱ्यांत प्रवेश केला म्हणजे दोन मोठ्या घंटा दृष्टीस पडतात; व भिंतीवर एका बाजूस **गणपती**ची व दुसऱ्या बाजूस **विष्णु** व **लक्ष्मी** यांच्या मूर्ति आहेत. शीख लोकांचा धर्मस्थापक गुरू **बाबा नानक** याचेंही चित्र भिंतीवर आहे. **विष्णू**चे मूर्तीजवळ **यमयातने**चें चित्र काढलें आहे. हें अवलोकन केलें असतां प्रेक्षकांस हंसूं आल्याशिवाय रहात नाहीं. भिंतीवर एक **नदी**चें चित्र असून त्यांत अनेक स्त्रीपुरुष जलक्रीडा करीत असून गटंगळ्या खात जात आहेत असें दर्शविलें आहे. याचा अर्थ इतकाच कीं, जे पुण्यवान आहेत ते नदीपार निर्भयपणें जात आहेत व ज्यांचे हातून पाप झालें आहे ते बुडत आहेत. याशिवाय भिंतीवर न्यायाधीश यमाचें व त्याच्या हाताखालचे शिपाई पाहरेकरी वगैरे चित्रें असून एकीकडे लोखंडाच्या कढाया अग्नीवर कढत असलेल्या दाखविल्या आहेत. हीं व अशाच प्रकारचीं

पुष्कळ बिभत्स चित्रें मंदिरांत पाहण्यांत येतात. आणखी एक चित्र या भिंतीवर प्रेक्षणीय आहे तें असें कीं, एक लोखंडाची तापवून लाल झालेली पहार दाखविली आहे; व त्यावर अनेक माणसें होरपळकेलीं दाखविलीं आहेत!! सारांश, हीं चित्रें अवलोकन केल्यानें बरीच करमणूक होते.

हें मंदिर पाहून आपण घाटाकडे जावयास निघालों असतां मार्गांत दोन शिवालयें लागतात. पैकीं एकावरील कोरींव काम अत्युत्कृष्ट असून फारच मनोहर आहे; व घाटही मोठा विस्तीर्ण असून मजबूत आहे.

**त्रिलोचन** मंदिराचे उत्तरेस **कामेश्वराचें** एक शिवालय आहे. हें फार पुरातन काळापासून अस्तित्वांत असल्याविषयीं येथील लोक सांगतात. मंदिरांत प्रवेश केल्यावर एक विस्तीर्ण चौक लागतो. हा चौक ओलांडून आंत गेलें ह्मणजे दुसरा एक चौक लागतो त्यांत अनेक लहान लहान **शिवालयें** असून **सांबाच्या** पिंड्या आहेत. पैकीं **कामेश्वराची** पिंडी ही मोठी असून गाभारा अगदीं सखल आहे. **कामेश्वरास** प्रसन्न केलें असतां आपले सर्व मनोरथ पूर्ण होतात हें त्याच्या नांवावरूनच व्यक्त होतें.

**कामेश्वराच्या शिवालयापासून** थोडक्याच अंतरावर एक राजमार्ग लागतो. त्या राजमार्गावर एक **मच्छोदरी** नामें तीर्थ आहे. या तीर्थाचें महात्म्य **काशीखंडांत**

पुष्कळ वर्णिलें आहे. सुमारें २९ वर्षांपूर्वी या तळयांत पुष्कळ पाणी होतें. परंतु शहरसुधारणेसंबंधीं गेल्या पांच पंचवीस वर्षांत जे काय फेरफार झाले त्यांत हें तळें बुजवून टाकलें. हल्लीं त्या स्थानीं एक लहान बाग आहे.

**बडागणेश:**—औसानगंज मोहोल्यात '**बडागणेश**' अथवा मोठ्या गणपतीचें देवालय आहे. देवालय अर्वाचीन आहे; परंतु मूर्ति प्राचीन आहे असें लोक सांगतात. आंतील चौक मोठा असून मूर्तीचे कांहीं अवयव रौप्यालंकृत आहेत. हें मंदीर नागरीक जन परमपूज्य समजतात. येथें प्रतिमासीं संकष्टी चतुर्थीचे दिवशीं एक मेळा भरतो. मंदिराचे बाहेर कांहीं सती गेलेल्या बायकांच्या पाषाणप्रतिमा आहेत; व जवळच एक जगन्नाथाचें मंदिर आहे. एकंदरींत हेंही स्थान प्रेक्षणीय आहे.

याच मोहोल्यांत **जागेश्वर** अथवा **यज्ञेश्वराचें** एक देवालय आहे. हें देवालय **काशींतील** इतर देवालयांप्रमाणें संकुचित नसून प्रशस्त व स्वच्छ आहे. मूर्ति ६ फूट उंचीची असून तिचा व्यास सुमारें १२ फुटीचा आहे. या मूर्तीविषयीं अशी कथा सांगतात कीं, एके समयीं सर्व देव एक यज्ञ करण्याकरितां एकत्र झाले. व यज्ञ होत असतां एका ज्वालेंतून ही मूर्ति उत्पन्न झाली व म्हणून यास **यज्ञेश्वर** असें म्हणतात.

या मोहोल्यासन्निध '**काशीपुरा**' नांवाचा एक मोहोल्ला आहे. तेथें **काशीदेवी** नांवाच्या **ग्रामदेवीचे** एक

देऊळ आहे. यात्रिक लोकांना सर्व तीर्थांचें दर्शन केल्यावर या देवीचें दर्शन घ्यावें लागतें. **काशींतील** लोक असें सांगतात कीं, हें देवालय क्षेत्राचा मध्यबिंदु आहे. थोड्या अंतरावर **कर्णघंटा** तलाव लागतो. **कर्णघंटा** म्हणजे कानांत घंटा बांधलेला कोणी एक पिशाच्च होता. त्यावरून हें नांव पडलें आहे. हा तलाव मोठा असून चोहोंकडून घाट बांधलेला असा आहे. जलाशय घाणेरडा आहे हें निराळें सांगणें नकोच. घाटावर एक **व्यासेश्वर** नांवाचें देऊळ आहे. श्रावणमासीं येथें मोठा मेळा भरतो.

**काशीदेवीचे** उत्तरेस थोड्या अंतरावर **भूतभैरवाचें** पवित्र स्थान आहे. मूर्तीचा डामडौल मोठा भव्य असून चेहरा फक्त अवलोकनांत येतो. या मंदिराचे आसपास अनेक प्राचीन शिला अवलोकनांत येतात.

**पिशाच्चमोचन तीर्थः**—कर्णघंटा तलावापासून सुमारें अर्ध्या मैलावर **पिशाच्चमोचन** नांवाचें पुण्यांतील पर्वतीचे तळ्याएवढें तीर्थ आहे. यात्रिक जनांना या तीर्थाचें अवश्य दर्शन घ्यावें लागतें. या तळ्यांत आंघोळ केली असतां पिशाच्चयोनीस जे वडील गेले असतील ते मुक्तीस जातात ह्मणून सांगतात. या तीर्थाविषयीं **काशीखंडांत** अशी कथा आहे कीं, एके समयीं एक पिशाच्च **काशींत** येण्याकरितां निघालें. तें **पंचक्रोशीचे** हद्दीपर्यंत आल्यावर त्यास तेथील देवादिकांनीं **क्षेत्रांत** जाऊं दिलें

नाहीं. परंतु पिशाच्च हें जबरदस्त असल्याकारणानें त्यानें देवादिकाचा पराभव करून या तीर्थापर्यंत प्रवेश केला. या ठिकाणीं काशीचा ग्रामरक्षक **भैरवनाथ** व याची लढाई झाली व अखेरीस भैरवानें त्याचा शिरच्छेद करून तें शिर **विश्वेश्वरा**पाशीं नेऊन दिलें. आतां पिशाच्चाचा जरी शिरच्छेद झाला होता तथापि तें सजीव होतें; व त्यानें **विश्वेश्वरा**ची प्रार्थना केली कीं, मला क्षेत्रांत जेथें शिरच्छेद झाला तेथें तरी रहाण्याची परवानगी असावी; व जे कोणी **काशी**यात्रा करून माझ्या दर्शनाशिवाय **गयेस** जातील त्यांची यात्रा सफल होणार नाहीं. या दोन्ही गोष्टी **विश्वेश्वरांनीं** कबूल केल्या व त्यास क्षेत्रवास करण्याची परवानगी दिली आणि पिशाच्चरक्षत्वाचें काम त्याजकडे दिलें. असो. यात्रेकरी याचें दर्शन घेतात, व जे कोणी अज्ञानामुळें याचें दर्शन न घेतां गयेस जातात त्यांना निदान तेथील पिशाच्चमोचनाचें दर्शन घ्यावें लागतें.

या तीर्थाला चोहोंकडून पडिक घाट आहेत; व मधून मधून कोणी भाविक त्या घाटांचा जीर्णोद्धार करतात. घाटावर आणखी अनेक **शिवालयें** आहेत, पण तीं अर्वाचीन असून फारशी वर्णनीय नाहींत.

जवळच **सूर्यकुंड** नांवाचें एक तीर्थ आहे. या तीर्थांत पूर्वकालीं १२ विहिरी होत्या असें सांगतात. पैकीं दोन सांप्रत दृश्य आहेत. जवळच एक **सूर्यनारायण** नांवाचें

एक देऊळ आहे. देवळांत **सूर्या**ची प्रतिमा आहे व प्रत्येक रविवारीं भाविकजन याची पूजा करतात.


**सूर्यकुंडा**जवळच **अष्टांगभैरवा**चीं छिन्नविच्छिन्न मूर्ति आहे. या मूर्तीचा उच्छेद **औरंगजेबा**नें केला असें सांगतात.

याच मोहोल्यांत **ध्रुवेश्वर** नांवाचें एक देऊळ आहे, परंतु आजकाल त्याचा त्याग केलेला दिसतो, व फारसे दर्शनाभिलाषी लोक अवलोकनांत येत नाहींत.

औसानगंज मोहोल्यास लागून दुसरा एक मोहोल्ला आहे त्या ठिकाणीं **नागकुवा** नांवाचें एक तीर्थ आहे. या तीर्थावरूनच मोहोल्याचें नांव हेंच पडलें आहे. या कुव्याची रचना फारच चमत्कारिक आहे. हा कुवा चौकोनी असून चारी बाजूंस मजबूत घांट आहेत. **काशी-खंडां**त या कूपाविषयीं थोडा उल्लेख आहे. श्रावणमासीं **नागपंचमी**चे दिवशीं येथें एक मोठा मेळा होतो. कूपोदकाचा उपयोग होत नसल्यामुळें ते प्राशनीय नाहीं.

नागकुव्यापासून थोड्या अंतरावर **वाघेश्वरी** देवीचें एक देऊळ आहे. ही देवी फार जाज्वल्य आहे असें येथील लोक सांगतात. मूर्ति अष्टधातूमिश्रित असून फार उग्र आणि सिंहावर आरूढ झालेली आहे. या मोहोल्यांत वस्ती तुरळक असल्यामुळें जागेला उदासीनता प्राप्त झाली आहे. जवळच **ज्वरहारेश्वर** व **सिद्धेश्वर** नांवाचीं दोन **शिवालयें** आहेत. **ज्वरहारेश्वरा**ची आराधना केली

असतां कसाही ज्वर असो, त्यापासून मनुष्य मुक्त होतो व सिद्धेश्वरापासून सर्व कामना पूर्ण होतात अशा आख्यायिका येथील लोक सांगतात.



# भाग ९ वा.

## महाराष्ट्र वस्ती.

पंचगंगाघाट, दुर्गाघाट, ब्रह्मघाट, व दशाश्वमेधघाट या घाटांवर दाक्षिणात्यांची वस्ती पुष्कळ आणि ह्मणजे जवळ जवळ ८ हजारांपर्यंत येईल असा अदमास आहे. यांपैकीं खाऊन पिऊन सुखी असे लोक फार थोडे आढळतात, बाकी भिक्षुकवर्गाचा भरणा फार आहे. हा महाराष्ट्रीयांचा समाज जरी थोडा आहे तथापि त्यांचे आपापसांत नेहमीं धर्मसंबंधीं कलह लागले असतात; व ग्रामण्याशिवाय एक आठवडाही सूना जात नाहीं. खरोखर कांहीं भिक्षुक अशिक्षित व अक्षरशत्रु लोक तर आपला उदरनिर्वाह ग्रामण्यावरच करितात!! आज अमक्यानें अमकें काम केलें, 'टाका त्याला जातीबाहेर!' पुन्हां चार दिवसांनीं 'अमुक रुपये दे ह्मणजे प्रायश्चित्त देऊन घेऊं!' वगैरे निंद्य व हलकट प्रकार येथें नित्य ऐकण्यांत येतात. जातीबाह्य करणें जितकें सोपें आहे, तितकेंच किंवा त्याहूनही अधिक सोपें जातींत घेणें झालें आहे. येथील तडवाले लोक ह्मणजे भिन्न भिन्न जातींतील मुख्य धर्माधिकारी यांचे हात गरम केले ह्मणजे मग कसेही दोष असोत त्यास ते शुद्ध करून घेतात!

या भिक्षुकवर्गाप्रमाणें स्वार्थी व मतलबी लोक फारच थोडे आढळतील! पुष्कळ यात्रेकरूंना यांच्या ठगविद्येचा अनुभव आलाच असेल, ह्मणून येथें अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं. '**काशीकर**' ह्मणजे '**लुच्चा**' हें सुप्रसिद्धच आहे. पुष्कळांना असें वाटत असेल कीं हे लोक क्षेत्रांत राहतात तेव्हां यांचें आचरणही शुद्धच असलें पाहिजे. परंतु हा केवळ भ्रम आहे. यांचीं कृष्णकारस्थानें जर आज जगापुढें आणलीं तर यांचें आचरण एखाद्या टाकाऊ धर्मलंडापेक्षांही अधिक तिरस्करणीय व निंद्य ठरेल. आतां सर्वच भिक्षुक असें असतील असें नाहीं; परंतु चांगल्यांची संख्या फार थोडी. या भिक्षुकांपैकीं कांहीं लोक चांगले सधन व घरंदाज असे आहेत. परंतु पुष्कळांची स्थिति शोचनीय आहे. या लोकांस भिक्षुकीशिवाय अन्य रोजगार नसल्याकारणानें येऊन जाऊन त्यांची भिस्त काय ती यात्रेकरूंवर असते. यामुळें एखाद्या वर्षी यात्रा कमी आली ह्मणजे त्यांना पंचाईत पडते. शिवाय उत्तरोत्तर धर्मश्रद्धा कमी होत चालल्याकारणानें व पूर्वीप्रमाणें लोकांत आतां त्राण उरलें नाहीं यांमुळें दानधर्म करण्याची कोणास फारशी इच्छा होत नाहीं. आजकाल कित्येक लोक तीर्थविधि न करतां फक्त क्षेत्रावलोकन करूनच परत जातात.

महाराष्ट्र वर्गांत सन्माननीय लोक म्हटले ह्मणजे **वैदिक** व **शास्त्री** जन होत. पाश्चात्त्य ज्ञानापुढें यांचें तेज

जरी झळकत नाहीं तरी हे लोक मोठ्या बाण्यानें राहतात. पुष्कळांना राजाश्रय आहे. सांप्रत वेद विद्येचा जरी लोप होत चालला आहे तथापि **काशींत** अद्याप ती कायम आहे, इतकेंच नव्हे परंतु चारी वेद मुखोद्गत असे अद्याप वैदिक येथें आढळतात. वेद मुखोद्गत असलेले लोक अन्य ब्रह्मवृंदांत आढळत नाहींत याचें काय कारण असेल तें असो. परंतु दाक्षिणात्यांत वेदाध्ययन फार आहे; यामुळें त्यांना सर्व लोक बहुमान देतात; व मोठमोठ्या सभांतून त्यांची योग्य प्रकारें संभावना होते हें त्यांना फार भूषणास्पद आहे. वसंतपूजा, सभा वगैरे नित्यशः येथें चालू असतात व त्यांवर यांचा चरितार्थ चालतो.

**काशी** क्षेत्र हें गीर्वाण भाषेच्या अध्ययनाचें एक आदिपीठच आहे—ह्मणजे हिंदुस्थानांतील हें **ऑक्सफर्ड** ह्मटलें तरी चालेल; व ह्मणून संस्कृत भाषेचा प्रचार येथें पुष्कळ आहे यांत कांहीं नवल नाहीं. या पुण्यक्षेत्रांत आजपर्यंत जितके पंडित होऊन गेले त्यांची नामावली जर येथें दिली तर ती फारच लांबलचक होईल. सुमारें १८ वर्षांपूर्वी **बाळशास्त्री** दिक्षीत ऊर्फ **बालसरस्वती** नांवाचे एक महापंडित **काशींत** होऊन गेले. त्यांचा लौकिक सर्वत्र देशभर आहे; व त्यांचें नांव ऐकलें नाहीं असा मनुष्य क्वचित् आढळेल. यांच्या तोडीचा विद्वान् अलिकडच्या काळांत कोणी झाला नाहीं असें सांगतात. त्याचप्रमाणें **कै. महामहोपाध्याय बापूदेव शास्त्री, सी. आय. ई.**

हेही एक अद्वितीय गणितवेत्ते होऊन गेले. यांचें नांव हिंदुस्थानांतच काय परंतु पाश्चात्त्य राष्ट्रांतही प्रसिद्ध आहे. सारांश, महाराष्ट्रीयांत मोठमोठे विद्वान् होऊन गेले व अद्यापही आहेत; यामुळें या क्षेत्रांत दाक्षिणात्यांस मोठा मान आहे.

काशींतील बहुतेक पंडितांचे घरीं संस्कृत पाठशाला व वेदशाला आहेत, व अध्ययन कांहीं गुरुदक्षणा न देतां अगदीं फुकट दिलें जातें. ही गोष्ट स्तुत्य आहे. कांहीं पंडित गरीब परंतु बुद्धिवान् व होतकरू अशा विद्यार्थ्यांचें अध्ययन व पालनही करतात. अशांची संख्या अर्थात् थोडीच आहे. कारण देशकालवर्तमानानुसार असें करणें सर्वत्रांस साध्य नाहीं. परंतु ही पूर्वापार वेदकालापासून चालत आलेली शिक्षणपद्धति अद्याप दृष्टोत्पत्तीस येते. विद्या विक्रय करणें म्हणजे मोठें पाप आहे असा आमच्या लोकांचा पूर्वापार समज आहे; व धर्मशास्त्रालाही ही गोष्ट संमत नाहीं. परंतु हल्लींचें मन्वंतर सर्व बदलल्यामुळें सर्व गोष्टी आजकाल विपरीत चालू आहेत. असो. हे शास्त्री प्रातःकाळीं आपल्या शिष्यवर्गास घेऊन त्यांस निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें देतात. कोणी काव्य शिकतो आहे; कोणी व्याकरण अध्ययन करीत आहे; कोणी धर्मशास्त्राचें अध्ययन करीत आहे; कोणी वेदपाठ करीत आहे; वगैरे देखावा एखाद्या पंडिताचे घरीं पाहिला असतां मनाला मोठा संतोष होतो. आतां ही शिक्षणपद्धति

सर्वांशीं निर्दोष आहे असें मुळींच नाहीं. परंतु त्यांतल्या त्यांत घेण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, गुरू व शिष्य यांमध्यें जें एक प्रकारचें प्रेम आढळतें तें पाश्चात्य शिक्षण पद्धतींत सांपडत नाहीं.

येथील विधवांची स्थिति फार खेदकारक आहे; व यांची संख्या संन्याशाप्रमाणें येथें पुष्कळ आहे पति मरणोत्तर, ज्या कोणास त्राता नाहीं अशा विधवा काशी-वास करण्याकरितां येतात. यांत तरुणही असतात; व वृद्धही असतात. येथें आल्या अथवा कोठेंही गेल्या तरी आयुष्ययात्रा ही विधवांना कष्टकारक असते. कांहीं लोकांचे घरीं किंवा अन्नसत्रांत कामकाज करून आपला उदरनिर्वाह करितात; व ज्यांना कामाचा कंटाळा असतो, अथवा ज्या वृद्ध असतात; किंवा कष्ट करण्याचें सामर्थ्य नसतें; अशा विधवा भिक्षा मागतात किंवा अन्नसत्रांत जेवून कालक्षेप करितात. ही गोष्ट आपल्या समाजास मोठी लाजिरवाणी आहे. सुमारें तीन वर्षांपूर्वी पंडिता रमाबाईनीं काशींतील संन्यासी व विधवा यांच्या स्थितीवर पुण्यांतील एका सुप्रसिद्ध वर्तमानपत्रांत* एक प्रसिद्ध केलेला लेख पुष्कळांचे स्मरणांत असेल. त्या लेखांत त्यांनीं काशींतील एकंदर विधवा व संन्यासी¶ वर्गावर भयंकर दोष लादले

* सुधारक ता. ८ जून १८९६ चा अंक पहा.

¶ रांड सांड सिढी संन्यासी। इतनो मे से बचे सो सेवे काशी॥ दोहा.

आहेत. संन्याशांचें वर्णन करून त्यांनीं पुढील उद्‌गार काढले आहेत. ‘त्यांच्या (संन्याशांच्या) कबजांतून विधवांचीं सुटका होणें कठीण.’ व ‘दर वर्षी या संन्याशांच्या प्रसादानें सहस्रावधीं गर्भपात व बालहत्या होत आहेत.’ वगैरे उद्‌गार जरी अतिशयोक्तीचे आहेत; तथापि त्यांत थोडा सत्यांशही आहे ही गोष्ट कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. आतां काशीक्षेत्रासारख्या ठिकाणीं असा अनाचार होणें ही गोष्ट एकंदर समाजाला मोठी निंद्य आहे हें जरी खरें आहे, तथापि सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या राष्ट्रांतही असा प्रकार अनुभवास येतो. विलायतेंत टेम्स नदींत पुष्कळ गर्भपात पाहण्यांत येतात ही गोष्ट वाचकांनीं विसरतां कामा नये. तेव्हां दिव्याखालीं अंधार असतो असें समजून समाधान करून घेतलें पाहिजे.

या क्षेत्रांत यात्रेकरू नेहमीं येत जात असल्यामुळें सहस्रभोजनें व ब्राह्मणभोजनें नित्य चालू असतात. याचा परिणाम असा झाला आहे कीं, येथें एक आळशी, निरुद्योगी व भोजनभाऊ वर्ग कायमचा झाला आहे. वर्षांतून आठ महिने उन्हाळा असल्यामुळें कपडयालत्यांची फारशी आवश्यकता या देशांत लागत नाहीं. अंगावर एक रुमाल किंवा लहान उपवस्त्र असलें म्हणजे तें अंगावर टाकून स्वेच्छाचारानें इतःस्ततः उघडे बोडके या क्षेत्रांत हिंडलें तरी कोणी नांवें ठेवीत नाहीं. ही स्थिति गरीबलोकांनाच लागू

आहे असें नाहीं. परंतु मोठमोठाले शास्त्री व पंडितसुद्धां अशाच तऱ्हेनें राहतात. **काशीस्थ** लोक जात्या फार मानी व चिकित्सखोर आहेत. भोजनाला कोठें जाणें असलें ह्मणजे तीन बोलावण्याखेरीज सहसा येत नाहींत. जेवणाचा बेत जर १२ वाजतां असला तर सकाळचें आठ वाजल्यापासून बोलावणेंकरी बोलावणें करून जातो. पहिल्या बोलावण्यांत भांगेच्या तयारींत लागण्याचा कांहींचा प्रघात आहे. दुसरें बोलावणें आलें कीं, स्नान करावयाचें; व तिसऱ्या वेळीं मारून मुटकून स्वारी एकदाची बाहेर पडते; व ती अशा थाटानें कीं, हातांत एक लहान तांब्या व फुलपात्र घेतलेलें आहे; पांबरी किंवा कद नेसली आहे, अंगावर एक रेशमी उपवस्त्र घेतलेलें आहे; कपाळाला भस्म फासलें आहे किंवा गंधाचा टिळा लाविला आहे; कित्येकांना फार घाईचा बेत असला तर स्नान न करितां धोंडभट्टी सुद्धां चालते—अशा थाटानें भांगेच्या तारेंत व आपला कोणी साथी असला तर त्याशीं घोगऱ्या आवाजांत गप्पागोष्टी करीत, **काशी**च्या गलिच्छ गल्यांतून **सोंवळ्यानें** दूरपर्यंत जातात! आतां भोजनाचे प्रसंगीं आपल्या चालीप्रमाणें त्यांना आग्रह विशेष लागतो हें जरी खरें आहे तथापि इतक्यानें ते तृप्त होत नाहींत. बुंदीच्या लाडवांचें भोजन असलें तर त्या पक्वान्नास **घोड्याचा दाणा** असें टोपण नांव त्यांनीं दिलें आहे!! **काशीं**तील भिक्षुकांना मोतीचूर फार प्रिय आहे, व हें पक्वान्न **काशींत**

चांगलेंही होतें. परंतु सर्व यजमानांना अशी शक्ति नसते, व ज्याला जशी ऐपत असेल त्याप्रमाणें तो करितो. काशींत भोजनाचा प्रकार ठराविक मक्त्यावर दिलेला जातो. ह्मणजे पात्रीं चार आणे, आठ आणे, रुपाया वगैरे जसें पक्कान्न त्याप्रमाणें ठराव करून घेतात. परंतु त्यांतल्यांत्यांत लबाडी पुष्कळ होते. एखादा यजमान पंक्तींत जाण्यासारखा नसला किंवा शूद्र असला ह्मणजे साहजिक ही सर्व व्यवस्था एखाद्या ब्राह्मणाच्या डोक्यावर तो लादतो, व मग मागेंपुढें असें होतें कीं १०० पानांचा मक्ता असला ह्मणजे ९० किंवा पाऊणशें पात्रें घालतात व बाकी पैसे खिशांत! हा अनुभव पुष्कळांना आलाही असेल. असा प्रकार जरी थोडा आहे तरी तो आहे इतकें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. कित्येक ब्राह्मण तर दिवसांतून दोन तीन श्राद्धें झोडतात. या श्राद्धांत किंवा सहस्रभोजनांत बहुतेक लोक आपल्या ओळखीचे किंवा आपले इष्टमित्र यांना बोलावूनच संख्या पूर्ण करितात. या योगें होतें काय कीं, कधीं कधीं चांगल्या विद्वान् ब्राह्मणावर क्वचित् पाळी येते.

येथपर्यंत काशींतील भिक्षुक—परंतु सभ्य ह्मणविणाऱ्या लोकांच्या गृहस्थितीचा विचार झाला. आतां अगदीं गचाळ लोक ह्मणजे केवळ अन्नसत्रांत बारानबारा, चोवीस वर्षे भोजन करून ‘ मठीं निद्रा व छत्रीं भोजन ’ या ह्मणीप्रमाणें कालक्षेप करितात. त्यांजविषयीं थोडा विचार केला पाहिजे.

हा वर्ग दिवसेंदिवस वाढत चालला आहे. फुकटचें आयतें जेवायला मिळत असल्याकारणानें या लोकांना शारिरिक अथवा मानसिक कोणत्याही प्रकारचे कष्ट करावे लागत नाहींत, व एकंदरींत हे लोक आपलें आयुष्य निरुद्योगांत खरें परंतु मोठ्या सुखावस्थेंत घालवीत आहेत. स्वावलंबनापासून होणाऱ्या सुखाचा त्यांस अनुभव नसल्या कारणानें परावलंबन हें त्यांच्या हाडीं खिळून गेलें आहे. या वर्गांत तरुणापासून तों वृद्धांपर्यंत स्त्री पुरुष वगैरे सर्वांचा समावेश होतो. यां पैकीं फारच थोडे लोक पारमार्थिक असतील. ऐहिक अथवा पारमार्थिक यांचे हातून कांहीं घडत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. पुण्यांतील भांग्यामारुतीप्रमाणें यांच्या येथें कचेऱ्या आहेत. तेथें फुरसतीचेवेळीं ह्मणजे सायंकाळीं यां पैकीं कांहीं ब्राह्मण एकत्र जमून राज्यप्रकरणीं उलाढाली, पेशवाईतल्या गप्पा, आजकालच्या सामाजिक वगैरे मोठमोठ्या गहन विषयांवर वादविवाद करितात. हा प्रकार येथें पुष्कळ ठिकाणीं पाहण्यांत येतो. येथील '**भटकचेरी**' जवळ सायंकाळीं क्षणभर उभें राहिलें असतां ही गोष्ट अनुभवास येण्यासारखी आहे.

दातृत्वांत हिंदुस्थानवासी लोकांची सर्वत्र ख्याती आहे; व यासारखा दुसरा धर्मही नाहीं हें खरें. परंतु आमची दान करण्याची तऱ्हा कांहीं निराळी आहे. कारण तें सत्पात्रीं आहे किंवा नाहीं हा विचार करण्याचे भानगडींत कोणी

फारसे पडत नाहीं. हें या **क्षेत्रांतील** अन्नसत्रें, किंवा सदावर्तें किंवा अशा धर्मसंस्था यांतील व्यवस्थेवरून लक्षांत येईल.

पुण्यांतून शेंवटच्या **रावबाजीचें** पलायन झाल्यापासून ब्राह्मणज्ञातीस दारिद्र्यानें घेरलें आहे; व त्यांपैकीं कांहींची वृत्ति जी भिक्षुकी तिला तेव्हांपासून जी उतरती कळा लागली आहे तिचें वर्णन करतां येत नाहीं. **बाजीरावा-**बरोबर पुण्याहून पुष्कळ ब्रह्मसमुदाय निघाला; व त्यांचें कायमचें ठाणें ब्रह्मावर्तास झाल्यावर त्यांनींही आपला मोर्चा तेथेंच फिरविला. **बाजीराव**साहेबांचे हयातीपर्यंत या ब्राह्मणांची चंगळ होती; परंतु त्यांचे पश्चात् भिक्षुक लोकांची स्थिति इतकी खराब झाली कीं, ब्रह्मावर्तास गेलेल्या लोकांवर तर एक मोठा प्रसंगच पडला होता! पुष्कळांस तर उपाशी मरण्याची पाळी आली होती! परंतु दैववशात् कै. महाराज **जयाजीराव शिंदे** यांची स्वारी यात्रेनिमित्त कांहीं वर्षांपूर्वी तेथें गेली होती. त्यांनीं त्यांची ती शोचनीय स्थिति पाहून प्रत्येक माणसीं हयातीपर्यंत २ रुपये देण्याची व्यवस्था केली. व ती अद्याप चालू आहे. या परोपकाराबद्दल ते व त्यांचीं मुलें महाराजांनां अद्याप दूवा देत आहेत. हे व अशाच करणांनीं आलेले लोक उत्तर हिंदुस्थानांत फार आहेत. पैकीं **काशी** व **प्रयाग** या ठिकाणीं बरीच वस्ती आहे.

वर सांगितल्याप्रमाणें या पुण्यक्षेत्रीं गरिबांना उदर निर्वाहार्थ अनेक सोयी आहेत. म्हणजे अन्नसत्रें होत. या

सत्रांपासून एक प्रकारें निरुद्योगी लोकांस चांगलेच उत्तेजन मिळालें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. **काशी** क्षेत्रांत सुमारें ३६० अन्नसत्रें आहेत असें ह्मणतात. परंतु ही अतिशयोक्ति असावी. तथापि इतकी गोष्ट खरी कीं, निदान शेंपन्नास तरी आहेत. हीं सर्व सत्रें या चालू शतकांतली असून राजाश्रित आहेत. या सत्रांत फक्त ब्राह्मणांनाच भोजन मिळतें. अन्य जातींतही अशीं सत्रें पुष्कळ आहेत. यावरून इतकी गोष्ट सिद्ध होते कीं, या क्षेत्रांत दानधर्म जितका होतो तितका अन्यत्र कोठेंही होत नसेल. परंतु अशी शंका वाटते कीं, या अन्नसत्र स्थापकांचे काय उद्देश असावेत; व ते कितपत सफल होत आहेत. केवळ वर्षोंनवर्ष ब्राह्मणांनीं जेवून क्षेत्रवास करावा इतकाच जर असेल तर तो पुष्कळांशीं सिद्धीस जात आहे. परंतु सांप्रत रूढ असलेली दान धर्माची पद्धत म्हणजे पात्रापात्र विचार न करणें ही मुळींच इष्ट नाहीं, व या पासून अनेक तोटे आहेत.

दुःखितास सुखी करणें, क्षुधिताला अन्न देणें, वस्त्रहीनास वस्त्र पुरविणें वगैरे धर्म फार स्तुत्य आहे ही गोष्ट कोणीही कबूल करील. परंतु दान देतें वेळीं तें सत्पात्रीं आहे किंवा कसें; अथवा त्याचा उपयोग चांगल्या तऱ्हेनें होतो किंवा दुरूपयोग होतो याविषयीं प्रत्येकानें विचार केला पाहिजे. अपात्रीं दान केलेलें निरर्थक आहे असें शास्त्रांतही सांगितलें आहे. हेंच तत्व आपण **काशींतील**

अन्नसत्रांत जेवणाऱ्या ब्राह्मणांस लावून पाहिलें असतां त्यांसंबंधीं आपला ग्रह विपरीत झाल्यावांचून राहणार नाहीं. या क्षेत्रांत प्रतिदिनीं सुमारें आठ हजार वस्तींपैकीं अडीच हजार ब्राम्हण केवळ अन्नसत्रांवर आपली उपजीविका करून आहेत. पैकीं स्त्री वर्गाचा येथें विचार कर्तव्य नाहीं. कारण त्या परतंत्र आहेत. शिवाय कांहीं अंध, अपंग, रोगग्रस्त वगैरे लोक वजा करून सुमारें **दीड हजार** पुरुषसंख्या आढळेल. ही विचारसरणी फक्त दाक्षिणात्यां विषयींच आहेत. अन्य लोकांची यांत गणना नाहीं. हे सर्व लोक नित्यशः यथेच्छ भोजन उडवून काय व्यवसाय करतात असा प्रश्न केला असतां उत्तर असेंच येईल कीं—कांहीं नाहीं. स्नानसंध्या करून कालक्षेप करतात—नाहीं! वेदाध्यन किंवा शास्त्र पठण करतात—नाहीं! यां पैकीं पुष्कळांची दैनिक व्यवस्था म्हटली म्हणजे भोजन; नंतर वामकुक्षी; व सायंकाळीं एखाद्या घाटावर किंवा भटकचेरीवर गप्पा झोंकणें या पलीकडे कांहीं नाहीं. अगर त्यांस कोणी विचारलें कीं, तुह्मीं येथें काय उद्योग करतां? तर त्यांचा जबाब हाच मिळेल कीं "**काशीवास.**" जणूंकाय सत्रांत जेवणें ह्मणजे **काशी**वास करणें कीं काय नकळे. अशा रीतीनें आपल्या अमोल्य आयुष्याचे दिवस हे लोक फुकट घालवितात!!

येथें एक बालाजीचें अन्नसत्र आहे. या सत्रांत नित्य दोन तीनशे ब्राह्मण भोजन करतात. या संस्थानाचा खर्च

शिंदे सरकाराकडून चालला आहे. सुमारें ३०–४० वर्षां-पूर्वी महाराज **जयाजीराव शिंदे** बहादुर यांची स्वारी याक्षेत्रीं आली होती. त्या समयीं त्यांनीं ६ लाख रुपयांवर उदक सोडलें; व त्यांची इच्छा अशी होती कीं, ती रक्कम प्रत्येक ब्राह्मणास १०० रुपये दक्षणेच्या रूपानें द्यावी. ही गोष्ट काशींतील वैदिक व पंडित लोकांस रुचली नाहीं. त्यांचा आग्रह असा पडला कीं, सरसकट सारखी दक्षणा न देतां ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें दिली पाहिजे. त्यावेळीं तारक मठाधिपति गोविंदबुवा हे महाराजांचे गुरु होते. त्यांचे सांगण्यावरून ही सर्व रक्कम सरकारांत जमा केली व तिच्या व्याजावर हें अन्नसत्र चालू आहे. येणेंप्रमाणें या सत्राचा वृत्तांत आहे.

आणखी एक मोठें अन्नसत्र **दशाश्वमेध** घाटीं आहे. या ठिकाणींही सुमारें ३०० ब्राह्मणांना भोजन मिळतें, व वर २ पैसे दक्षणा!! जेवणाचा बेत इतका उत्तम असतो कीं, एखाद्या श्रीमान् गृहस्थाचें घरीं सुद्धां तसा असेल किंवा नाहीं याची शंका आहे. हें अन्नसत्र मद्रास प्रांतांतील कांहीं व्यापारी लोकांनीं चालविलें आहे.

सदरहु दोन अन्नसत्रांना सोडून आणखी लहान मोठीं अन्नसत्रें अनेक आहेत. पैकीं बहुतेक दक्षिणेंतील सरदारांचीं म्हणजे, नागपूरचे **भोंसले, पंतप्रतिनिधी, पंतसचीव;** वगैरे संस्थानिकांचीं आहेत. त्याचप्रमाणें अन्य ठिका-


णीं, ह्मणजे **प्रयाग, गया, अयोध्या, मथुरा** वगैरे सर्व क्षेत्रांत एकदोन लहान मोठीं अन्नसत्रें आहेत.

या अन्नसत्रांवर देखरेखीकरितां व्यवस्थापक कारकून हे ब्राह्मणच आहेत. यांपैकीं कांहीं अन्नसत्रांत चांगली व्यवस्था आहे; परंतु कांहींमधील प्रकार अगदीं उलट आहे. ह्मणजे जेथें १० पात्रांचें अन्नसत्र आहे त्याठिकाणीं पांचच घालतात. कारण कारकुनाला येथें विचारणारा कोणी नसतो. **अन्न-सत्राचा यजमान हा काशींत** नसल्याकारणामुळें वर्षांतून ठरावीक रक्कम संस्थानाप्रीत्यर्थ कारकुनाला पाठवितो. तेव्हां **काशींतले रावसाहेब** हेच बनतात, अशा तऱ्हेनें लबाडीनें पैसा मिळवून कांहीं कारकून चांगले गब्बर श्रीमंत झाले आहेत. अशा गोष्टी स्वतः यजमान दूर असल्यामुळें त्याचे नजरेस येत नाहींत.

वर लिहिलें आहे कीं, अन्नसत्रांपासून निरुद्योगाला उत्तेजन मिळतें. यावरून असें मात्र कोणी अनुमान करूं नये कीं, हीं सर्व अन्नसत्रें व सदावर्तें आज बंद करावीत. या लेखाचा असा उद्देश मुळींच नाहीं. फक्त या संस्थांत थोडीथोडकी नव्हे परंतु पुष्कळ सुधारणा झाली पाहिजे. सद्यःक्रम अप्रशस्त आहे. या विषयावर धार्मिकदृष्ट्या विचार केला तरी कोणत्याही धर्मांत असें सांगितलें नाहीं कीं, धष्टपुष्ट, आळशी व निरुद्योगी मनुष्यांस पोसणें ह्मणजे पुण्यप्राप्ति होतें. अर्थशास्त्रदृष्ट्या पाहिलें असतांही असेंच कबूल करावें लागेल कीं, ही एवढी रक्कम निरर्थक खर्च होऊन

तिचें कांहीं चीज होत नाहीं. हीच रक्कम जर एखाद्या उद्योगवृद्धि संस्थेकडे खर्च झाली असती तर त्यापासून देशाला पुष्कळ फायदा झाला असता.

**काशींत** अशा अनेक धर्मार्थ संस्था आहेत; व त्यांच्या चालकांस अशी सूचना आहे कीं त्यांसंबंधीं त्यांनीं कांहीं नियम केले पाहिजेत, ह्मणजे गरीब विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग करून घेतां येईल अशा कांहीं सोयी केल्या पाहिजेत. अनाथ, अपंग, वृद्ध वगैरे जे असतील त्यांजविषयीं मुळीं प्रश्नच नाहीं. परंतु अगदीं तरुण मंडळींना निरर्थक पोसणें हें देशोन्नतीचें चिन्ह नाहीं. या अन्नसत्रांत फुकट पुख्याची सोय असल्यामुळें इतर ठिकाणचीं मुलें पळून येऊन भटकतांना दृष्टीस पडतात. ह्मणून ज्यांचीं मुलें घरांतून पळालीं असतील त्यांनीं येथें शोध केला असतां पत्ता लागण्याचा संभव आहे.



# भाग १० वा.

## इतर देवालयें.

केदारेश्वर:-हें **शिवालय** असीसंगमाजवळ असून परम पूज्य आहे. **काशी**खंडांत **केदारेश्वराचें** महात्म्य अवर्णनीय सांगितलें आहे. या विषयीं अशी कथा सांगतात कीं, कोणा ब्राह्मणास **केदारेश्वर** प्रसन्न होऊन वर माग असे बोलले; तेव्हां त्यानें परोपकारार्थ असा वर मागितला कीं, **काशी**क्षेत्रीं ज्याचा मृत्यु होतो त्यास त्याच्या पापानुसार **भैरव**यातना भोगून मग मुक्ति प्राप्त होतें असें आहे; परंतु इतःपर **काशी**क्षेत्रांत **केदारेश्वरा**ची जी मर्यादा आहे त्यांत जो कोणी मरण पावेल त्यास **भैरव**-यातना न होता कैलासलोक प्राप्त व्हावा. हें त्या ब्राह्मणाचें मागणें **केदारेश्वरां**नीं मान्य केलें. याकरितां **काशीं**त लोक मरणसमयीं **केदार** घाटीं जाऊन राहतात. आतां आपण या मंदिराकडे वळूं. मंदिरांत प्रवेश करण्याकरितां दोन मार्ग आहेत. एक घाटाकडून आहे तिकडून न जातां आपण पश्चिमेकडील द्वारानें आंत प्रवेश करूं. आंत गेल्यावर दुतर्फा सांबाच्या **पिंड्या, भैरव, गणपती, अन्नपूर्णा** वगैरे देवतांच्या मूर्ती अवलोकनांत येतात. ज्या खोलींत **केदारेश्वरा**ची पिंडी आहे तिचे दरवाजावर चतुर्भुज द्वारपाल उभे आहेत. ही द्वारपाल जोडी जणूं

काय सजीव आहे कीं काय असा भास होतो. त्यांचा शिरोभाग पितळेचा असून लष्करी लोकांप्रमाणें टोपाचा भास होतो. एका हातांत गदा, एकांत त्रिशंकु, व एकांत फूल व एक रिकामा असे आहेत. **केदारेश्वराचे** पिंडीचा घेर पांच फूट असून उंची दीड फूट आहे. घाटावर एक कुंड आहे. तेंही फार पवित्र समजतात. त्यांतील उदकांत उष्णकाळीं कृमि असतात; परंतु तें उदक भाविक लोक भक्तीनें प्राशन करितात. मंदिर प्राचीन असून तेथें एक शिलालेख आहे. त्यावर संस्कृत, द्रवीड, आणि वंडग भाषेंत या तीर्थाचें महात्म्य लिहिलेलें आहे.

याच मोहोल्यांत सुमारें पांव मैलांचे अंतरावर मानससरोवर आहे. त्याचे घाट सांप्रत मोडकळीस आलेले आहेत. हा तलाव कोरडा असून आंत एक वर्तुलाकृति कूप आहे. असें सांगतात कीं, जयपूरचा राजा **मानसिंग** यानें हा घाट बांधिला.

मानस सरोवर सोडून **तिलभांडेश्वराचें** आपण दर्शन घेऊं. हें **शिवालय** अंमळ दूर आहे. **तिलभांडेश्वर** प्रेक्षणीय असून पिंडीचा परिघ सुमारें १९ फूट आहे. उंची पांच फूट आहे. येथें कांहीं प्राचीन शिलालेख दृष्टीस पडतात. प्रदक्षिणेचे मार्गांत एक **शंकराची** ध्यानस्थ मूर्ती पाहण्यासारखी आहे.

**दशाश्वमेध** घाट व **केदारेश्वर** यांचे दरम्यान जो प्रदेश त्यास '**बंगालीटोला**' अशी संज्ञा आहे. या मो-

होल्यांत बंगाली लोकांची वस्ती फार असल्यामुळें हें नांव प्राप्त झालें आहे. या भागांत **शिवालयां**ची रेलचेल आहे. बंगाली लोकांवर अनेकांचे अनेक आक्षेप आहेत. ह्मणून त्यांचा स्वभाव, चालीरीती वगैरे गोष्टीसंबंधीं अल्प माहिती प्रस्तुत भागांत दिली असतां अनुचित् होणार नाहीं.

बंगाली लोकांची वस्ती या क्षेत्रीं सुमारें आठ दहा हजारांवर असावी. इतर अन्य जातीपेक्षां या लोकांत ऐक्य-भाव विशेष आढळतो. बंगालप्रांत शिक्षणांत फार सरसावला असल्याकारणानें त्या लोकांचे धर्मविचारांत, आचारांत, व चालीरीतींत महदंतर पडलें आहे. हेच त्यांचे देशबंधु पश्चिमोत्तर प्रदेशांतील लोक शिक्षणांत मागें असल्याकारणानें त्यांच्यांत इतकी सुधारणा झाली नाहीं.

बंगाली लोकांच्या गृहस्थितीविषयीं विचार करूं लागलें असतां स्त्रीपुरुषांत विपरीत भाव दृष्टीस पडतो. तो असा कीं, त्यांच्यांत पुरुषवर्ग जितका सुधारलेला आहे तितपतच स्त्रीवर्ग धर्मभोळा आहे. उत्तरहिंदुस्थानांत पडद्याची चाल सर्वत्र असल्याकारणानें उच्च जातींतील स्त्रियांची आयुष्ययात्रा दुःखकारक असावी यांत कांहीं संशय नाहीं.उच्च वर्गांतील मुली आठदहा वर्षांच्या होईपर्यंतच त्यांना बाहेर हिंडण्याफिरण्याचें सुख असतें. एकदां विवाह झाला कीं, मग त्यांना जन्मभर कैद!! त्यांना आपल्या आप्तमित्रांना भेटणें सुद्धां फार कठीण असतें. बंगाली लोकांत स्त्रियांची विवाहकाल मर्यादा ह्मटली ह्मणजे दहावर्षेंपर्यंत होय. यापुढें मुली अवि-

वाहित नसतात. हुंड्याचें मान आपल्या लोकांपेक्षांही पुढें गेलें आहे. ही हुंड्याची चाल त्यांच्यांत पूर्वापार आहे असें सांगतात; परंतु आजकाल ती अमर्यादित झाली आहे. एखादा बी. ए. किंवा एम् ए. मुलीच्या बापाकडून ४ किंवा ५ हजार रुपये हुंडा घेतल्याशिवाय लग्न करण्यास तयार होत नाहीं. आपल्या कन्येस चांगला सुशिक्षित वर मिळावा अशी सर्व आईबापांची इच्छा असते. परंतु ही हुंड्याची वाईट चाल त्या इच्छेस आड येते. या चालीपासून असा भयंकर परिणाम झाला आहे कीं, ज्या गृहस्थांस पुत्रसंतती आहे तो या हुंड्याच्या व्यापारानें चांगला सधन होतो; व ज्यास मुली आहेत त्यास भिक्षेची पाळी येते. बंगाल्यांत अशीं अनेक कुटुंबें आढळतील कीं, या भयंकर चालीमुळें गरीब दशेस येऊन पोहोंचलीं आहेत. आपल्या धर्मशास्त्रदृष्ट्या उच्च जातींत कन्येस नेहमीं अविवाहीत ठेवितां येत नसल्यामुळें कसें तरी करून मुलींची धिंड एकदां घरांतून बाहेर काढावी लागते.!! या व अशाच अनेक कारणांमुळें कन्याहत्येची चाल या देशांत—सांप्रत कमी आहे परंतु मुसलमानांचे कारकिर्दींत पुष्कळच होती.

बंगाली लोकांत एक **कुलीन ब्राह्मणांची** जात आहे. त्या लोकांत एका पुरुषास अनेक स्त्रिया असतात. ही जात कलकत्त्याजवळ **डाका** गांव आहे तिकडे फार आहे. हल्लीं कलकत्त्याचे आसपास कुलीन ब्राह्मणांची घराणीं

आहेत; त्यांतील पुरुषास १०० किंवा २०० बायका असलेलीं उदाहरणें दृष्टोत्पत्तीस येतात.

दुसरी एक भयंकर चाल या लोकांत आहे ती अशी—स्त्रियांस रजोदर्शन होण्यापूर्वींच नवराबायको एकत्र राहतात. सोळा संस्कारांपैकीं गर्भाधानविधि त्यांच्यांत होतच नाहीं, ह्मटलें तरी चालेल. नुकत्याच पास झालेल्या संमती कायद्याचे वेळीं पुष्कळांनीं काहूर माजविलें होतें कीं, हा कायदा नको; परंतु ही दुष्ट चाल नाहींशी करण्याविषयीं आजपर्यंत त्या लोकांत कोणीही यत्न केला नाहीं. हा कायदा पास होण्यास मुख्य कारण बंगाली लोकांची दुष्ट चालच नव्हे काय?

बंगाली लोक जरी शैव आहेत तथापि त्यांपैकीं पुष्कळ लोक देवीउपासक असून '**कालीदेवी**' हें त्यांचें मुख्य दैवत होय. येथील बंगालीटोल्यांत **कालीदेवी**चीं पुष्कळ देवळें आहेत. प्रतिवर्षी आश्विनमासीं नवरात्रांत हे लोक **काली**चा एक महोत्सव करितात. हे नवरात्राचे दिवस जवळ येत चालले कीं, जणूं काय बकऱ्यांना स्वप्नच पडतें कीं काय कोणजाणें, तीं दीन स्वरानें आक्रोश करूं लागतात. या उत्सवांत शेंकडोशें बिचाऱ्या निरपराधी बकऱ्यांची अमानुषपणें जी कत्तल होते ती नेत्रानें पाहवत नाहीं. हे लोक मांसभक्षक आहेत हें निराळें सांगणें नकोच. पैकीं उच्च जाती ह्मणजे ब्राह्मण वगैरे मत्स्याहारी आहेत. हें प्रसिद्धच आहे.

**काशीं**तील लोकांचा पूर्वीं असा ग्रह होता व अद्यापि पुष्कळांना शंका आहे कीं हे लोक या उत्सवांत मनुष्यांनांही बळी देतात. सांप्रत सार्वभौम **इंग्रजांचे** राज्यांत अशी गोष्ट होऊं शकत नाहीं; परंतु **काशीं**तील लोकांत अद्याप असा समज आहे, व होता होईल तितके यासमयीं अल्पवयीं मुलांना बंगाली टोल्यांत आईबाप जाऊं देत नाहींत. हा त्यांचा ग्रह उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. पूर्वकाळीं अशा गोष्टी होत असाव्या हें संभवनीय आहे. असो. दसऱ्याचे दिवशीं हे लोक **देवी**ची मोठ्या थाटानें मिरवणूक काढतात. हा **काशीं**तील समारंभ प्रेक्षणीय असतो असें ह्मटल्यावाचून राहवत नाहीं.

हे लोक मांसाहारी असून निशक्त कां हा एक मोठा गूढ प्रश्न आहे. मांसाहार शक्तिवर्धक आहे किंवा नाहीं हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे; व याविषयीं पुष्कळ मतभेद आहे. परंतु जे लोक मांसाहारपक्षीय आहेत त्यांजवर हा एक जबरदस्त आक्षेप आहे व त्याचें निरसन झालें पाहिजे कीं, पुष्कळ लोक मांसाहारी असून त्यांच्यांत शारीरिक गुण ह्मणजे धीटपणा, चपळाई, हिंमत वगैरे गुण मुळींच नसतात; परंतु यांच्या उलट ह्मणजे भित्रेपणा, सुस्त, हिंमतहीन ह्याच गुणांचें जास्ती प्राबल्य दृष्टोत्पत्तीस पडतें. याविषयीं बंगाली लोक हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. कदाचित् उष्ण हवेचा गुण ह्मणावा तर तसेंही ह्मणतां येत नाहीं. कारण कीं, कांहीं उष्णदेशांतील लोक

फार बलवान् आहेत. कसेंही असो, भित्रेपणाचा जो दोष त्यांजवर आहे यांत बराच सत्यांश आहे.

हीच गोष्ट बुद्धिमत्तेशीं लावून पाहिली असतां उलट प्रकार आढळतो. या लोकांत मोठमोठे वक्ते, ग्रंथकार झाले; व होत आहेत; व शिक्षणांत हे लोक इतर लोकांहून फारच पुढें सरसावले आहेत. या लोकांत अनेक गुणही आहेत. स्नेहास चांगले असून दया, क्षमा वगैरे गुण यांचे अंगीं वास करतात. परकीयांचा आदरसत्कार करण्यांतही हे लोक तत्पर असतात. याचा अनुभव पुष्कळांस आलाही असेल. लार्ड **मेकॉले**सारख्या ग्रंथकारानें यांजवर जे दोषारोप ठेवले आहेत ते अतिशयोक्तीचे आहेत इतकेंच नव्हे परंतु ते केवळ मत्सर बुद्धीचे आहेत असें ह्मणणें भाग आहे.

**दुर्गेचें देवालय:—काशीं**तील प्रेक्षणीय देवालयांपैकीं **दुर्गेचें** एक **देवालय** आहे. हें **देवालय** नगराचे बाहेर असून मोठें रमणीय आहे. मंदिराजवळ एक मोठा तलाव आहे त्यास '**दुर्गाकुंड**' असें ह्मणतात. या कुंडावर पुष्कळ वानरांचा समुदाय इतःस्ततः भ्रमण करीत असलेला नित्य अवलोकनांत येतो. आसपास पुष्कळ बागबगीचे असल्याकारणानें हें स्थान रमणीय आहे. यांत कांहीं शंका नाहीं! या मर्कटवृंदाची शहरांत नित्य एक फेरी होत असल्याकारणानें **काशी**वासी जनांस त्यांपा-

सून मोठा त्रास होतो खरा, परंतु वानरांची जात पवित्र मानिली गेल्यामुळें त्यांचा नाश करण्यास कोणी धजावत नाहीं. "त्यांपैकीं एकासही गोळी मारण्याची सरकारानें खटपट केली असतां सर्व लोकांचीं मनें बिघडतील व सर्व जातींचा नाश करण्याचा उद्योग केला तर एक मोठा दंगा होईल." असें **शेरिंग**ानें ह्मटलें आहे तें सत्य आहे.

मंदिराचें वर्णन करण्यापूर्वीं प्रथमतः **दुर्ग**संबंधीं पौराणिक कथा काय आहे याची वाचकांस ओळख करून दिली पाहिजेः—**रूरु**नामें राक्षसाचा **दुर्ग** ह्मणून एक पुत्र होता. त्यानें आपल्या तपोबलानें इंद्रादि देवांसही जिंकलें; व पुढें तो इतका बलवान् झाला कीं, तो पृथ्विपति झाला; व सर्वत्र हळू हळू अनीति, अन्याय वगैरे गोष्टी फैलावल्या. तेव्हां सर्व **देव** एकत्र होऊन त्यांनीं **महादेवा**स ही गोष्ट कळविली. **महादेवा**नीं नंतर आपली पत्नि **गौरी** इजला त्याचा पराभव करण्याविषयीं आज्ञा दिली. **गौरी** ही प्रथम स्वतः न जातां आपली मैत्रीण **महाकाली**बरोबर पुष्कळ सेना देऊन त्याचा पराभव करण्याकरितां रवाना केलें. हें वर्तमान **दुर्ग** राक्षसास कळतांच त्यानेंही आपली राक्षससेना एकत्र करून महाकाळीला धरून आणण्याचा हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें राक्षसांनीं तिला पकडली; यामुळें तिला फार त्वेष आला व सर्व सैन्याचें तिनें भस्म केलें. अशा एक दोन वेळां तिच्या व राक्षसांच्या झटापटी झाल्या व शेवटीं ती स्वर्गांत पळून गेली; व हा सर्व वृत्तांत तिनें

**गौरीस** निवेदन केला. अखेरीस **शिवपत्नि** स्वतः सैन्यासह येऊन तिनें राक्षसांचा पराभव केला. हें वर्तमान सर्व देवादिकांनीं ऐकून त्यांस फार आनंद झाला व त्यांनीं तिची फार स्तुति केली. असो. मंदिरांत प्रवेश करण्याकरितां मुख्य द्वार पश्चिमेकडील होय. दारावर एक नौबतखाना लागतो; व समोर एक स्तंभ सुमारें २॥ फूट उंचीचा आहे. प्रतिवर्षी नवरात्रांत येथें एक मोठा उत्सव होतो. त्यावेळीं पुष्कळ प्राणि या स्तंभास बांधून नंतर त्यांची कत्तल होते. उजवीकडे एक १० फूट उंचीच्या पाषाण स्तंभावर एक अक्राळ विक्राळ सिंहाची मूर्ति आहे. तसेंच प्रवेश केल्यावर दोन्ही बाजूस दोन सिंहमूर्ति आहेत. सभामंडप हा संगमरवरी पाषाणाचा असून गालीच्याकृति आहे. गाभाऱ्यांत एक अजस्त्र घंटा नेपाळचे राजानें दिलेली अवलोकनांत येते. मूर्तीचा डौल लहान असून उग्र आहे. याच चौकांत एक **कालीदेवी**ची मूर्ति असून येथेंही एक मोठी घंटा आहे. ही मिरझापुरच्या कोणी युरोपियन माजिस्त्रेटनें दिली असें ह्मणतात. घुमटावरील काम चांगलें असून त्यावर सोनेरी मुलाम्याचे कळस आहेत. मंदिर जरी नूतन भासतें खरें तथापि त्यास सें दीडशें वर्षे झालीं असून **राणीभवानीनें** बांधलें आहे.

या **दुर्गेच्या देवालया**पासून २०० यार्डावर **'कुरुक्षेत्र'** नामें एक तलाव आहे. यावरील घाट वरील राणीनेंच

बांधला आहे. सूर्यग्रहणाचे दिवशीं या तीर्थावर पुष्कळ लोक स्नान करितात.

याच मोहोल्यांत एक **गऊ**बाईचें स्थान आहे. ही बाई **विश्वेश्वरा**ची बहिण ह्मणून सांगतात. ही फार सोंवळें करूं लागली ह्मणून तिला क्षेत्राबाहेर राहण्यास जागा दिली. यात्रिक लोक जितके दिवस क्षेत्रांत राहतात तितक्या कवड्या तिला वाहतात. असें न केलें तर यात्रेचें पुण्य ती घेतें असें लोक सांगतात!

**दुर्गे**चे मंदिरापासून जवळ एक **'भदेनाई'** नांवाचा मोहोल्ला आहे. या मोहोल्ल्यांत एक **राम**मंदिर आहे. हें पूर्वीं अगदीं अप्रसिद्ध होतें; परंतु थोड्या वर्षांपूर्वीं झालेल्या दंग्यामुळें हें फार प्रसिद्धीस आलेलें आहे. या दंग्याचा वृत्तांत थोडक्यांत दिला असतां अप्रासंगिक होणार नाहीं. हें **राम**मंदिर **असी** संगमाजवळ असून अगदीं लहान आहे. या मंदिराचें अस्तित्व **काशीं**तील लोकांस ठाऊक सुद्धां नव्हतें. परंतु कालगति विचित्र आहे! शहरांत नळाचें पाणी आणण्याचें काम सुरू होण्यास व मंदिर प्रसिद्धीस येण्यास एकच मुहूर्त लागला. शेवटीं एक मोठा दंगा झाला; त्याची हकीकत येणेंप्रमाणें:—

हा दंगा उद्भवण्याचें वास्तविक कारण पाहूं गेलें तर नळाचें काम होय. सन १८८८ पासून तों सन १८९२ पर्यंत पश्चिमोत्तर देशाचे लेफ्टेनेन्ट् गव्हर्नर सर **ऑकलंड्**

**कॉल्विन्** हे होते. यांची कारकीर्द तेथील प्रजेस अप्रिय झाली होती खरी; परंतु त्यांनीं जीं लोकोपयोगी कामें केलीं आहेत त्यांविषयीं प्रजेनें आपली कृतज्ञता प्रगट केली पाहिजे. पश्चिमोत्तर देशांत मोठमोठीं शहरें ह्मणजे अलाहाबाद, लखनौ, आग्रा, कानपूर, मीरत वगैरे आहेत, परंतु या शहरांत पाण्यासंबंधीं हाल फार होते. **गंगा यमुनेसारख्या** प्रचंड नद्या या देशांतून जरी वाहतात, तथापि सर्व शहरवासीजनांस या पाण्याचा उपयोग होत नव्हता. तसेंच या प्रांतांतील विहिरी फार खोल असल्यामुळें पुष्कळ लोकांस पाण्याचे हाल भोगावे लागत असत. ही उणीव दूर करून शहरवासीजनांस विपुल पाणी मिळावें या हेतूनें लाट्साहेबांनीं या सर्व शहरांतील पुढारी लोकांपुढें हा प्रश्न ठेवला. कांहींजणांनीं यास संमती दिली; व कामें जरी सुरू झालीं, तथापि सामान्य लोकांनीं हरकती घेतल्या कीं, हीं कामें फार खर्चाचीं आहेत व प्रजेला अधीक कर देण्याची ऐपत नाहीं. आतां पश्चिमोत्तर प्रांत हा हिंदुस्थानांत शिक्षणांत फार मागें असल्यामुळें पुष्कळांचा असा चुकीचा ग्रह झाला होता कीं, हें पाणी पाजून सरकार आह्मांस बाटविणार आहे. यामुळें तिकडील लोकांचीं मनें सरकाराविषयीं कलुषित् झालीं होतीं. अशा स्थितींत सरकारानें प्रजेस न भितां त्यांच्या इच्छेविरुद्ध हीं कामें अलाहाबाद, कानपूर, आग्रा वगैरे ठिकाणीं केलीं. आजमित्तीस त्या ठिकाणची प्रजा नळाचे पाण्यापासून होणाऱ्या सुखाचा

उपभोग घेत आहे. **काशी**क्षेत्रांतही हे नळ असावेत असा एक बूट निघाला. या क्षेत्रांत गंगोदक जरी विपुल आहे, तथापि तें फार मलिन असल्याकारणानें त्यांपासून अनेक रोग उद्भवतात. शिवाय येथील वस्ती फार दाट असल्या कारणानें पाण्याशिवाय रस्ते सफाई वगैरे गोष्टी नीटपणें होत नव्हत्या.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सर **ऑकलंड् कॉल्विन** यांनीं ही गोष्ट **काशीं**तील म्युनिसिपालिटीपुढें ठेविली, व **काशीं**तील मोऱ्यांची सुधारणा व दुरुस्ती ( drainage ) हा एक प्रश्न त्याबरोबर पुढे ठेविला. पैकीं ड्रेनेजसंबंधीं गोष्ट म्युनिसिपालिटीनें कबूल केली व नळासंबंधीं अनावश्यक काम आहे असा ठराव पास झाला. नंतर सरकारानें मोठमोठ्या अधिकारी वर्गांची मतें मागितलीं. तीं सरकाराला अनुकूळ अशींच मिळालीं. शेवटीं जबरदस्तीनें म्हणा किंवा कसेंही म्हणा सरकारानें नळ करण्याचें ठरविलें; व त्याप्रमाणें ४२ लाख रुपये या कामाप्रीत्यर्थ खर्च करण्याची मंजुरी दिली. पैकीं २६ लाख रुपये हे नळाबद्दल व १६ लाख रुपये ड्रेनेजबद्दल. ही रक्कम कांहीं लहानसहान नव्हे ! सरकारानें यांपैकीं कांहीं रक्कम देऊं केली; व बाकी रक्कम राजेरजवाडे यांजकडून वर्गणीच्या रूपानें जमा करावी, अशाबद्दल बनारसच्या महाराजांच्या अध्यक्षतेखालीं एक सभा झाली, व सभेंत त्यांनीं बरीच मदत करण्याचें आश्वासन दिलें. सारांश, सर्व तजविजी सुरू झाल्या. परंतु हे सर्व विचार **काशीं**-

तील बऱ्याच लोकांना पसंत नव्हते. अखेरीस लाट्साहेबांची स्वारी मुद्दाम या क्षेत्रीं आली. त्यांनीं मोठमोठ्या लोकांची समजूत घातली व नळास लागणाऱ्या खर्चासंबंधीं कर जारी करण्याविषयीं म्युनिसिपालिटीस सुचविलें. पुढें राज्ञीपुत्र **प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर** यांची स्वारी प्रवास करीत येथें आली होती. त्यांचे हस्तें नळाचे कामाचा पाया बसविण्याचा समारंभ सन १८९१ चे जानेवारी महिन्यांत मोठ्या थाटानें झाला.

हें काम सुरू झालें व **असी** संगमाजवळ गंगोदक शुद्ध असल्यामुळें तेथील पाणी यंत्रानें वर चढवून भैलपूर मोहल्यांत तें शुद्ध करून मुख्य खजिन्यांत सोडून नंतर नळमार्गें शहरांत खेळवावें अशी व्यवस्था करण्याचें योजिलें. गंगेंतून पाणी वर चढाविण्यासाठीं जें स्थळ म्युनिसिपालिटीनें पसंत केलें होतें त्या ठिकाणीं एक हौद बांधावयाचा होता; ह्मणून आसपासचीं घरेंहीं विकत घेतलीं. परंतु मध्येंच हें **राम**मंदिर असल्यामुळें कामाला थोडी अडचण झाली. मंदिराचा मालक तें विकण्यास कबूल होईना. कारण त्यास ठाऊक होतें कीं विकल्यावर त्याचा नाश होईल. म्युनिसिपालिटींत राजा **शिवप्रसाद** सी. एस्. आय्. बाबू **रामकाली चौधरी,** बाबू **बिरेश्वर मित्र** यासारखे मोठमोठे व वजनदार लोक मेंबर होते. यांपैकीं कांहींचें मत असें होतें कीं, मंदिर मोडून दुसरे ठिकाणीं स्थापना करावी, व कित्येकांचें मत असें होतें कीं, मंदिरास मुळींच धक्का लावूं नये. येणेंप्रमाणें भवति न भवति चालली होती.

मंदिराचे पिछाडीस हौद खोदण्याचें काम तर सुरू झालेंच, व आसपास चारी बाजूला पुष्कळ खोल खोदिलें. जणूं-काय पर्जन्यकाळीं मंदिराचा पाया कच्चा होऊन आपोआप ढांसळेल या हेतूनें कीं काय कोण जाणें. अखेरीस लोकांना दर्शन करण्याचा मार्ग सुद्धां बंद केला. नंतर बरेच दिवस लोटल्यावर मंदिराचा शेवट कोणत्या तरी प्रकारें करावा ह्मणून तारीख १९ एप्रिल सन १८९१ बुधवार रोजीं प्रातःकाळीं ११ वाजतां **टौनहॉल**मध्यें एक सार्वजनीक सभा भरविण्यांत आली. त्यासमयीं हॉल संपूर्ण भरला होता व बाहेर सुमारें ५ हजार मनुष्यें सभेचा काय निकाल लागतो हें ऐकण्याकरितां जमले होते. १२ वाजण्याचे सुमारास कोणी अशी कंडी पिकविली कीं, मंदिर जमीनदोस्त झालें. ही गोष्ट लोकांचे कानीं पडतांच मग काय विचारतां जिकडे तिकडे लूट सुरू झाली. जवळच तार ऑफिस होतें त्यांतील अधिकाऱ्यास मार देऊन बंडवाल्यांनीं तार तोडून टाकिली.एका टोळीनें स्टेशनवर जाऊन तिनें तेथील पार्सलें लुटलीं. इकडे कांहीं लोकांनीं शहरांतील रस्त्यावरील सर्व कंदील फोडून टाकिले. **काशीं**तील पोलिस जरी हुषार आहे तथापि ह्या प्रसंगीं अगदीं कुचकामाचे ठरले. ही लूट सुमारें ४ वाजेपर्यंत चालली होती. **काशीं**तील मुख्याधिकारी लोक लष्करी लोक बरोबर घेऊन शहरांत आले; परंतु जिकडे तिकडे सामसूम !! दंगेखोर लोकांच्या टोळ्या एकाठिकाणीं नसून सर्व शहरभर फैलावल्या होत्या. कित्येकांनीं पोलिसस्टेशनवर हल्ला केला; कांहीं लोक राजा शिवप्रसादचें घर लुटण्याकरितां गेले. कांहीं लोकांनीं **राम**मंदिराकडे आपला

मोर्चा फिरविला. तेथें गेल्यावर **बाबू सीताराम** नामें एका सधन व अब्रुदार गृहस्थाचे घरास आग लाविली. घरांतील सर्व सामान सुमारें ५० हजाराच्या मालाचें नुकसान केलें. याचें कारण इतकेंच कीं, हा ग्रहस्थ म्युनिसिपालिटीचा मेंबर होता व **मंदिर** पाडिलें असतां कांहीं हरकत नाहीं असें याचें मत होतें. अशी ही लूट भर दोनप्रहरीं चालली असल्यामुळें **काशीं**तील लोकांच्या तोंडचें पाणी पळालें; सर्व लोक भयभीत व हवालदिल झाले होते. पोलिस तर अगदीं मेल्यासारखें स्वस्थ होतें. नंतर एक गोरी पलटण शहरांत आली. पैकीं कांहीं गोरे **ब्यांक ऑफ बेंगालू**चे रक्षणाकरितां पाठविले; व कांहीं राजघाटावरील पुलाचे संरक्षणार्थ पाठविले. सायंकाळीं चुनारगडाहून एक गोरी पलटण शहरांत येऊन तिनें टाऊन हालांत डेरा ठोकला. लष्करी लोक शहरांत आल्यावर मग पोलिसला बराच जोर आला; व रात्रीं पकडापकड सुरू झाली. दंगेखोर लोकांजवळ शस्त्रसामुग्री कांहींच नव्हती; व व्यवस्थाही नव्हती. या दंग्यांत अहीर (गौली), घाटे, पांडे वगैरे आडदांड लोक पुष्कळ असून सुशिक्षित व सभ्य लोक यापासून अलिप्त होते. दुसरे दिवशीं शहरांत बरीच स्वस्थता झाली. तथापि दुकानें उघडलीं नाहींत. आतां लुटारू लोक स्वस्थ बसले परंतु पोलिसचा त्रास फार व्हावयाला लागला. चार दिवस सारखी पकडापकड चालली होती. एकंदर ७०० मनुष्यें पकडलीं, त्यांत पुष्कळ निरपराधीही लोक पोलीसनें पकडले. चौथे दिवशीं अगदीं पूर्वीप्रमाणें व्यापार शहरांत सुरू झाला. यांपैकीं

पुष्कळांनां चौकशीअंतीं सोडण्यांत आलें. कांहींना—ज्यांनीं तार तोडली होती—अशा लोकांना जन्मठेपेची शिक्षा झाली. बाबू गोवर्धनदास नांवाचा एक मोठा सावकार या मंदिराचा मालक होता, त्यास २५००० रुपये दंड व ३ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. तसेंच बाबू गोपालदास नामें सावकाराला १०००० रुपये दंड व ३ वर्ष सक्त मजूरी; वगैरे शिक्षा देण्यांत आल्या. असा या भयंकर दंग्याचा परिणाम झाला.

हा दंगा झाल्यामुळें मंदीर मात्र कायम राहिलें आहे, व सांप्रत तेथें पहारा असतो. फक्त पुजाऱ्यास जाण्याची परवानगी आहे.

या गोष्टीस आज ८ वर्षें झालीं नाहींत तों नळाचें काम तयार झालें आहे, आणि आतां गल्लोगल्लीं नळ अवलोकनांत येतात. प्रथमतः पुष्कळांनीं जें भाकित केलें होतें कीं, नळाचें पाणी कोणी पिणार नाहीं तें अगदीं मिथ्या ठरलें !! हल्लीं पुष्कळ धर्माभिमानी लोक सुद्धां नळाचें पाणी पितात; व आणखी थोड्या वर्षांत जे अद्यापि पीत नाहींत तेही पिऊं लागतील यांत मुळींच संदेह नाहीं.

या **भदेनाई** मोहोल्यांत '**लोलार्क कूप**' नामें एक तीर्थ आहे. या कूपाची रचना व बांधणी चमत्कारिक आहे. जवळच एक **भद्रेश्वर** नामें शिवालय आहे. हें इतकें प्रेक्षणीय नाहीं; परंतु याच ठिकाणीं एका नवीन शिवालयाचें काम चाललें आहे तें मात्र प्रेक्षणीय आहे.

# भाग ११ वा.

## वरुणासंगम.

राजघाट ह्मणजे सांप्रत जेथें रेल्वेस्टेशन आहे तेथून सुमारें एक मैलावर **वरुणा** व **गंगा** यांचा संगम झाला आहे. हें स्थान मोठें रमणीय असून तेथें एक **आदिकेशवाचें** देवालय आहे. आसपासचा प्रदेश निर्जन असल्यामुळें भयाण भासतो. हा एक मैल लांब व अर्ध मैल रुंद प्रदेश **गंगे**च्या पृष्ठभागापासून बराच उंच आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं ५० पासून ६० फूट उंची येईल. **राजघाटा**वर सुमारें ५० वर्षांपूर्वी एक मुसलमानांचे कारकिर्दीतला किल्ला होता तो हल्लीं जमीनदोस्त झाला असून त्या जागीं रेल्वेस्टेशन आहे. सांप्रत हा प्रदेश जरी ओसाड आहे तथापि पूर्वकालीं येथें पुष्कळ वस्ती होती.

**आदिकेशवाचें** देवालय हें **गंगे**पासून बरेंच उंच आहे; व घाटही चांगला आहे. घाटावर आणखी दोन चार **शिवालयें** आहेत. **वरुणेचें** पात्र अरुंद असून बरसातींत लांबवर फैलावतें. **मंदिरांत** प्रवेश करितांना एक शिलालेख दृष्टीस पडतो, त्यांतील सारांश असा आहे कीं, सन १८५७चे बंडानंतर हें मंदीर सरकारानें आपले हस्तगत केलें होतें तें पुन्हां १८६७ च्या एप्रिल महिन्याचे २१ वे तारखेस पुन्हां हिंदूंचे स्वाधीन केलें. पुढें १८६९त घाटाची दुरुस्ती केली. मंदिर हिंदूकडून जबरदस्तीनें घेण्याचें

कारण बंडाचे धामधुमींत तेथील पुजारी लोकांचें अंग होतें असा सरकारास वहीम आला होता. परंतु कांहीं कालानें त्याची निवृत्ती झाल्यावरून पुन्हां तें हिंदूंचें स्वाधीन केलें. मंदिरांत प्रवेश केला ह्मणजे उजवे हातास **संगमेश्वराचें** देऊळ आहे; व जवळच **ब्रह्मेश्वरा**ची चतुर्भुज मूर्ती आहे. चौकांत **आदिकेशव** अथवा **भगवान श्री विष्णू**ची मूर्ति आहे. मूर्तीची उंची सुमारें ३ फूट असून कृष्ण-वर्णाची आहे. शिरोभागीं मुकूट असून हातांत गदा धारण केली आहे. सभामंडपही टुमदार आहे. सुमारें १२५ वर्षांपूर्वी **शिंद्यांच्या** एका दिवाणानें हीं मंदिरें बांधिलीं असें सांगतात. घाटावर चार पांच सती गेलेल्या स्त्रियांच्या प्रतिमा आहेत. ह्यावरून **सती**ची चाल या क्षेत्रांत फार असावी असें अनुमान होतें; कारण अशा प्रतिमा या क्षेत्रांत अनेक अवलोकनांत येतात.

सन १८९२ चे मार्च महिन्याचे २६ वे तारखेस **महामहावारुणीपर्वा**चा योग आला होता. त्यावेळीं **वरुणा**संगमीं स्नान करण्याकरितां ९ लक्ष लोक **काशींत** आले होते अशा पर्वकाळीं **वरुणा**संगमीं स्नान केलें असतां मोठें पुण्य आहे असें स्कंद*पुराणांत सांगितलें आहे. परंतु घांट

---

* वारुणेन समायुक्ता मधौ कृष्ण त्रयोदश
गङ्गायां यदि लभ्येत सूर्यग्रह शतैः सम ॥
शनिवार समायुक्ता सा महावारुणी स्मृता
गंगायां यदि लभ्येत कोटीसूर्य ग्रहे समा ॥
शुभयोग समायुक्ता शनौशत भिषा यदि ॥
महा महति विख्याता त्रिकोटी कुलमुद्धरेत ॥

लहान असल्यामुळें धक्काबुक्कींत पुष्कळांस जलसमाध मिळते! संवत् १९२१ त असाच पर्वकाळ आला होता, त्यावेळीं सुमारें ४०० लोक गंगेंत बुडाले!!

**लाटभैरव:**—राजघाट स्टेशनापासून कॅन्टोन्मेंट (छावणी) कडे जाण्याकरितां जो राजमार्ग लागतो त्या मार्गावर सुमारें १ मैलावर लाटभैरवाचें स्थान आहे, व जवळच एक **कपालमोचन** नामें तीर्थ आहे. '**लाट**' अथवा **महादेवाचा** वर्तुलाकृति **पाषाणदंड** हा सुमारें ९ फूट उंचीचा असून त्याचा व्यास तीन फूट आहे. ही लाट जमिनींत खोल पुरली असल्यामुळें लांबी बरोबर सांगणें कठीण आहे. **काशींत** जे **अष्टभैरव** आहेत त्यांपैकीं हें एक **भैरवाचें** स्थान आहे. ही संपूर्ण लाट तांब्यानें मढविलेली असून शिखरास करांगुली एवढें एक छिद्र आहे. या छिद्राचें कारण असें सांगतात कीं, **औरंगजेब** बादशहानें लाटेचा उच्छेद करण्याकरितां गोळी मारली होती; तिची ती खूण आहे. जवळच एक मशिद आहे, व हेंच तें प्राचीन **भैरवाचें** देवालय. देवालयाचा **औरंगजेबानें** नाश करून तेथें मशीद बांधली, व **लाटेला** दूर फेंकून दिलें; पुढें कालांतरानें हिंदूंनीं तिची सांप्रतच्या जागीं स्थापना केली. मशिदीचे मागचे बाजूस एक मोठा तलाव आहे; तो व वरील घाट हे राणीभवानीनें बांधिलें. ह्या **लाटेविषयीं** एक ऐतिहासिक मनोरंजक कथा आहे. ही लाट प्राचीन आहे किंवा तिच्या ऐवजीं नवीन स्थापलेली आहे याविषयीं बराच मतभेद आहे. इतकी गोष्ट अगदीं

निर्विवाद आहे कीं, प्राचीन **लाट** ही स्थानभ्रष्ट झाली असून तिचे जागीं सांप्रत मशीद आहे. प्राचीन लाट ही सुमारें ४९ फूट उंच असावी असें **शेरिंग**चे ह्मणणें आहे, व हल्लींची फक्त १० फूटच आहे. त्याअर्थी सांप्रतची लाट हा प्राचीन **लाटे**चा अवशिष्ट भाग असावा, अशी कल्पना करणें निराधार होणार नाहीं. मि. शेरिंगची शिवाय अशीही कल्पना आहे कीं, ही **लाट अशोक** राजाचे काळची असून त्यावर एक लेखही असावा. परंतु हा लेख आहे किंवा नाहीं हें जाणण्यास सांप्रत कांहींच साधन नाहीं. कारण वरील भाग तांब्याच्या पत्र्यानें मढविलेला आहे.

गेल्या शतकाचे अखेरीस **काशींत हिंदू** व **मुसलमान** या दोन जातींत एक मोठा भयंकर दंगा झाला. याचें कारण असें झालें कीं, होळी व मोहोरम हे दोन्ही सण एकेच दिवशीं पडले होते. प्रथमतः एक मोठी मारामारी झाली त्यांत मुसलमानांना हार खावी लागली. हा अपमान त्यांस सहन झाला नाहीं. हिंदूंचा कोणत्या तरी रीतीनें सूड घेतला पाहिजे असा विचार करून ते **औरंगजेब**चे मशिदींत—जेथें पूर्वीं **लाट** होती तेथें—एकत्र जमून त्यांनीं **लाटे**चा उच्छेद केला व ती जमीनदोस्त केली. हें पाहून हिंदूंना फारच क्रोध आला. त्यांनींही मशिदींचा नाश करण्यास प्रारंभ केला; व दहा वीस तर समूळ नष्ट केल्या. जर कदाचित् सरकार मुसलमानांस मदत न करतें तर गांवांत

एक मशिदसुद्धां बाकी राहिली नसती!! त्या प्रसंगीं सरकारनें प्रत्येक मशिदीचे संरक्षणाकरितां चार पांच शिपाई ठेवले यामुळें त्या बचावल्या.


पुढें या दोन जातींत अधिकाधिकच क्रोधाग्नि पेटत चालला; व तो पेटणेंही स्वाभाविकच होतें. कारण मुसलमानांनीं प्रथम **लाटे**चा उच्छेद केला होता. मुसलमानांनीं नंतर एक गाय मारली व तिच्या रक्तानें **गंगा**जल अपवित्र केलें. ह्या अत्याचारानें हिंदूंचीं मनें तर फारच चवताळलीं! शेवटीं **गंगा** दुषित झाल्याकारणानें शेंकडों ब्राह्मण व अन्य भाविकजन अंगास भस्म फासून **गंगा**तीरीं जाऊन बसले; व कांहींनीं तर दोन तीन दिवस अन्न पाणीसुद्धां सेवन केलें नाहीं. या समयीं इंग्रज सरकारचा अंमल या क्षेत्रीं चांगलासा नव्हता. याच वेळीं बर्ड नामें एक इंग्रज वकील या क्षेत्रीं होता; तो ह्मणतो:—

"या समायाचा देखावा मोठा गंभीर, भयानक व हृदयद्रावक होता. अंगास भस्म फासलेलें ब्राह्मण दुःखी होऊन **गंगा**तटीं बसले आहेत; व तसेंच त्यांचीं मुलें व स्त्रिया यांची आरडाओरड चालली आहे; व घाटावर अहोरात्र तीन दिवस अनावर व असंख्य जमलेला जनसमूह वगैरे देखावा प्रेक्षणीय होता इतकेंच नव्हे; परंतु हें असें दुःख प्रदर्शन अन्यस्थळीं कोठेंही झालें नसेल." नंतर तीसरे दिवशीं **काशी**तील मुख्याधिकारी घाटावर येऊन

त्यांनीं त्या दुःखी जनास चांगऱ्या तऱ्हेनें समजावून त्यांस शांत केलें. हें वर्णन ऐकून कोणाचें मन तळतळणार नाहीं. अस्तु. या गोष्टीवरून **काशींतील** पौरजनांची धर्मश्रद्धा चांगली व्यक्त होते. या **लाट भैरवावर** भाद्रपदमासीं एक मोठा मेळा भरतो.

लाटभैरवाचे आसपास पुरातन काळीं बौद्धांचे मठ व इमारती असाव्यात असें पुष्कळांचें मत आहे. कारण कीं या प्रदेशांत अनेक प्राचीन शिला अवलोकनांत येतात; आणि त्यांवरील शिल्पकाम हेंही बौद्धांचे रीत्यनुसार असून तें मनोवेधक आहे.

लाटभैरवापासून राजमार्गानें १ मैल पुढें गेलें असतां एक लहान कबर लागते. तिच्याविषयीं अशी दंतकथा आहे की, कोणी एका फकीरानें जीवंतपणीं या ठिकाणीं आपणास पुरून घेतलें. ही कबर हिंदूंसही पूज्य असून पुष्कळ हिंदू तिला भजतात. काय करतील बिचारे कायते येऊन जाऊन तेहतीस कोटीच देव!!



# भाग १२ वा.

## पंचक्रोशी यात्रा वर्णन.

यात्रिक लोकांचें या क्षेत्रीं आगमन झाल्यावर त्यांना प्रथमत: सर्व तीर्थांचें व देवतांचें दर्शन घ्यावें लागतें; व तीर्थविधि आटोपल्यानंतर **पंचक्रोशी** यात्रा करण्याचा पुष्कळांचा प्रघात आहे. हा प्रघात शास्त्रानुसार आहे; व पुराणांतही **पंचक्रोशी**चें महात्म्य फार वर्णिलें आहे ह्मणून सवडीनुसार पुष्कळ लोक ही यात्रा करितात.

सुमारें ३० वर्षांपूर्वी **पंचक्रोशी**चा मार्ग हा पुराणोक्त नसून दुसरा होता; व पुष्कळ लोक त्याच मार्गानें यात्रा करीत असत. नंतर कांहीं पंडितांनीं तो मार्ग चुकीचा असल्याबद्दल शंका काढल्या; व पुढें यासंबंधानें **काशीं**त एक वाद उपस्थित झाला. या वादांत ही गोष्ट सिद्ध झाली कीं, हा मार्ग शास्त्रोक्त नाहीं. नंतर **काशीं**तील बहुमान्य व सुप्रसिद्ध ज्योतिषवेत्ते कै. **बापुदेव शास्त्री** यांनीं या कामांत स्वत: पुढारीपण घेतलें; आणि अनेक पंडितांच्या मदतीनें खऱ्या पुराणोक्त मर्यादेप्रमाणें नवीन मार्ग योजून आपला हेतु त्यांनीं तत्कालिन् तेथील प्रसिद्ध मॅजिस्ट्रेट **गव्हिन्स्** (तेथील लोकांत गोविंद साहेब नामें प्रसिद्ध आहेत) साहेबास कळविला. साहेब बहादुरांनीं लोकांचे विनंतीस मान देऊन पंडितांनीं योजिल्याप्रमाणें एक नवीन राजमार्ग सरकारी खर्चानें तयार केला. लहान लहान ओढे


व नाले होते तेथें पूल बांधिले. येणेंप्रमाणें सांप्रतच्या प्रचलित मार्गाचा इतिहास आहे.

या **गबिन्स्** साहेबाविषयीं एक स्मरणीय गोष्ट येथें सांगितली असतां ती वाचकांस मनोरंजक होण्यासारखी आहे. काशींत बदमाष लोक फार आहेत अशी पुष्कळ दिवसांपासून ख्याती आहे; व ह्मणून तेथील अधिकारीजनांस आपलीं कामें फार हुशारीनें करावीं लागतात. या **गबिन्स्** साहेबाचे वेळीं **काशींत** बदमाष लोकांनीं कहर करून सोडला होता. या बदमाषांत कांहीं महाराष्ट्रीय लोक सामील होते. पैकीं पुष्कळ लोक मारुती उपासक असल्यामुळें भोंवयाचे मध्यभागीं शेंदूर लावण्याची चाल त्यांच्यांत फार होती; हल्लींही ती कांहीं लोकांत आढळते. ही शेंदुराची निशाणी ह्मणजे एक बदमाषीचें लक्षण असें तेथील पोलीस समजत असत. यामुळें या लोकांवर पोलीसची विशेष करडी नजर असे. ही गोष्ट या बदमाष लोकांस असह्य होऊन कोणत्या तरी तऱ्हेनें **गबिन्स्** साहेबांचा सूड घ्यावा या हेतूनें एके प्रसंगीं त्यांस, रस्त्यांतून एकटेच जात आहेत असें पाहून या लोकांनीं त्यांजवर हल्ला केला. कित्येकांनीं त्यांजवर दगड मारून अखेरीस सर्वांनीं पलायन केलें. या लोकांत महाराष्ट्र लोकच पुष्कळ होते. दुसरे दिवशीं **गबिन्स्** साहेबांनीं शेंदूर लाविलेल्या इसमांस पकडून आणण्याचा हुकूम पोलिसास दिला. मग काय विचारता? **काशीं**तील वरिष्ठ अधिकाऱ्याचा हुकूम!! पोलिसानें दोन

तीनशें लोकांस पकडून शृंखलाबद्ध केलें. या पकडलेल्या लोकांत कांहीं कांहीं चांगले संभावितही लोक होते. पोलिस म्हणजे भूतलावरील यमदूतच!! नंतर कांहीं शिष्ट लोकांनीं मध्यस्ती करून कांहींची सुटका केली; व कांहींना ताकीद केली कीं, पुन्हां जो कोणी शेंदूर लावलेला भेटेल त्यास पकडून त्याचें नांव **काशीं**तील बदमाशाचे यादींत घातलें जाईल. हा शेंदूर लावण्याचा प्रचार पुढें कमी झाला, व आजकाल असे लोक क्वचित् आढळतात.

दुसरी एक चमत्कारिक गोष्ट ऐकण्यांत आली आहे. ही गोष्ट अगदीं अलीकडील म्हणजे सुमारें १० वर्षांतील आहे. त्यावेळीं **काशीं**त नंगे बैराग्यांचा फारच सुळसुळाट झाला होता. जिकडे तिकडे हे लोक निर्लज्जपणें रस्त्यांतून जात येत असलेले अवलोकनांत येत. ही गोष्ट फारच निंद्य व अश्लील होती. त्यावेळीं तेथील मॅजिस्ट्रेटनें असा हुकूम दिला कीं, लंगोटीशिवाय जो कोणी शहरांत आढळेल त्यास शिक्षा केली जाईल. असा हुकूम सुटल्यावर पुष्कळांनीं लंगोट्या लाविल्या; परंतु जे कोणी आडदांड होते त्यांनीं तो हुकूम मानला नाहीं. दुसरे दिवशीं कांहीं बैराग्यांस पोलिसनें पकडलें; त्यांत सुप्रसिद्ध परमहंस **तैलंगस्वामी** यांसही पकडलें. मॅजिस्ट्रेटनें सर्वांस ‘ लंगोट्या लावा, नाहीं तर शिक्षा करूं ’ अशी ताकीद दिली. तेव्हां **तैलंगस्वामी** खेरीजकरून बाकीचे सर्व घाबरून लंगोट्या लावण्यास तयार झाले म्हणून त्यांस मात्र सोडून दिलें.

## परमहंस तैलंग स्वामी.



हे **स्वामी** मात्र लंगोटी लावण्यास कबूल होईनात. त्यांस भीति घातली, सर्व कांहीं करून पाहिलें; परंतु ते कांहीं केल्या ऐकेनात. तेव्हां त्यांचें सत्त्व पहाण्याचे हेतूनेंच कीं काय न जाणें मॉजिस्ट्रेटनें त्यांस प्रश्न केला कीं 'तुह्मी साधु आहांत तर आमचें खाणें खाण्यास काय हरकत आहे' तेव्हां त्यांनीं जबाब दिला कीं, 'कांहीं नाहीं.' परंतु

'माझें खाणें जर तुह्मी खाल तर मी तुमचें खाईन.' साहेब बहादुरांचे मनांत दुसरी कांहीं शंका आली नाहीं. तेही या गोष्टीस तयार झाले. नंतर स्वामी महाराजांनीं लागलीच प्रातर्विधि करून साहेबास तो खाण्यास सांगितला यावरून साहेबास फारच क्रोध आला. तेव्हां तें पाहून स्वामींनीं तें सर्व आपणच भक्षण केलें. हें पाहतांच मॅजिस्ट्रेटनें त्यांस सोडून दिलें; व त्यांसच फक्त शहरांतून नग्न फिरण्याचा अटकाव ठेविला नाहीं. या स्वामीविषयीं **काशीं**त अनेक चमत्कारिक व मनोरंजक आख्यायिका सांगतात. सर्व शास्त्रांत हे पारंगत असून शिवाय योगसाधन यांनीं बरेंच केलें होतें. आपल्या आयुष्याचे शेवटीं शेवटीं यांनीं मौनव्रत धारण केलें होतें. हे नुकतेच ह्मणजे सुमारें ८ वर्षें झालीं समाधिस्त झाले.

सांप्रतची प्रचरित पंचक्रोशी प्रदक्षिणा ही सुमारें २९ कोसांची असून मार्गांत दुतर्फा आम्रवृक्ष, अनेक विश्रांति स्थानें, तसेंच रमणीय उपवनें, चांगल्या प्रशस्त धर्मशाळा, व जागोजाग मिळणारी सर्व सामुग्री, वगैरे सर्व गोष्टींची अनुकलता असल्यामुळें यात्रा करणें फारच सुखकारक आहे. मार्गांत एकंदर मुख्य देवता २०० असून शिवाय लहान मोठीं अनेक शिवालयें आहेत. मार्गक्रमण करतांना अनेक पुराणोक्त कडक नियम पाळावे लागतात. ही यात्रा सोंवळ्यानें करावी लागते; मार्गांत शिवनामाच्या जपाशिवाय अन्योच्चार करूं नये; **काशी**कडील प्रदेशांत मलमूत्र विसर्जन

केलें असतां यात्रा निष्फळ होते; थुंकण्याचीसुद्धां मनाई आहे! मुक्कामीं गेल्यावर सोंवळ्यांनीं रहावें लागतें. जाताक्षणीं स्नान केलें पाहिजे. दुसऱ्याचे हातचें अन्न भक्षण करतां कामा नये. तसेंच निरनिराळ्या स्थानीं श्राद्धतर्पण करून ब्राह्मणभोजन करावें लागतें. अशा प्रकारचे कडक नियम पाळावे लागतात; व त्यांचें उल्लंघन झालें असतां ही यात्रा निष्फळ होते असें पुराणांत सांगितलें आहे. आतां हे सर्व नियम आजकाल सर्वच पाळतात किंवा नाहीं याची शंकाच आहे. **पंचक्रोशी** यात्रेचा विधि असा आहे कीं, प्रथमतः यात्रेकरूंस **ज्ञानवापीचें** दर्शन घ्यावें लागतें. नंतर **विश्वेश्वराचे** देवालयांतील **मुक्ति** मंडपांत संकल्प करतात. नंतर **विश्वेश्वराची** यथासांग पूजा करून **मणिकर्णिका** तीर्थी स्नान करावें लागतें. पुढें घाट मार्गानें चालून व मार्गांतील देवतांचें दर्शन घेत घेत **असी** संगमावर पहिला मुक्काम करावा लागतो; अथवा कांहीं लोक जवळच दोन कोसांवर **कर्दमेश्वरीं** मुक्काम करतात. **कर्दमेश्वराचें** देवालय फार प्राचीन असून तेथें एक तलाव आहे. हा तलाव व त्यास लागून असलेली धर्मशाला कांहीं परोपकारी लोकांनीं यात्रिक जनाच्या सोयीसाठीं बांधिल्या आहेत. तलावास सुंदर व प्रशस्त घाट आहेत. कार्तिकमासापासून तों चैत्रापर्यंत हा पंचक्रोशी रस्ता अहोरात्र गजबजलेला असतो. नंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्नान करून प्रथम दिवसाप्रमाणें

पुन्हां मार्गक्रमण करावें लागतें. दुसरा मुक्काम ह्मटला ह्मणजे **भीमचंडी**चा होय. **भीमचंडी** हें देवीचें देवालय आहे. असें ह्मणतात कीं ही देवी फार जाज्वल्य आहे. या स्थळाचा असा प्रताप सांगतात कीं या ठिकाणीं स्त्रिया हटकून रजस्वला होतात!!

**भीमचंडी** सोडून निघालें ह्मणजे तिसरा मुक्काम **रामेश्वर** होय. हा पल्ला दूरचा आहे; ह्मणजे चांगलें १९ मैल चालावें लागतें. जे अशक्त व वृद्ध असतात ते मध्येंच मुक्काम करतात. येथें **रामलक्ष्मणा**च्या मूर्ति आहेत; व हें स्थानही फार आनंददायक आहे. पुढें चौथा मुक्काम **शिवपूर** होय. **शिवपुरीं**त पंच**पांडवां**च्या मूर्ति असून अनेक उपवनें आहेत.

**शिवपूरा**हून निघालें म्हणजे पांचवा मुक्काम **कपिल-धारा** तीर्थ आहे. या स्थानीं यात्रिक जनाचे स्नेही, मित्र भेटण्यास येतात. या तीर्थाचें महात्म्य पुष्कळ सांगितलें आहे. येथें श्राद्धतर्पण केलें असतां गयावर्जन केल्याचें पुण्य आहे. या तीर्थावर **वृषभध्वजेश्वरा**ची एक पिंडी आहे. त्याविषयीं अशी कथा सांगतात कीं, दिवोदास राजानें आपल्या तपोबलानें या क्षेत्राचें सार्वभौमत्व आपले हातीं घेतल्यावर त्यानें **काशीं**तील सर्व देवतांस नगरांतून काढून लाविलें. शेवटीं दिवोदास जेव्हां फार प्रबल झाला तेव्हां **विष्णूंनीं काशींत** युक्तीनें प्रवेश करून **काशीं**तील सर्व प्रजा वैदिक धर्मापासून भ्रष्ट केली, व बौद्धमत स्थापिलें.

याप्रमाणें धर्माचा लोप होऊन अधर्माचा प्रसार होत आहे हें पाहून **दिवोदासा**स वाटलें कीं आतां येथें रहाणें ठीक नाहीं. म्हणून क्षेत्राचा त्याग करून तो स्वर्ग लोकाप्रत चालता झाला. नंतर **विश्वेश्वर** हे मंदराचल पर्वताहून मोठ्या समारंभानें **काशी**क्षेत्रीं परत येत असतां **विष्णूंनीं** दुरून **विश्वेश्वरा**चे रथाचा **वृषभध्वज** या जागीं पाहिला, आणि तेथें एक **लिंग** स्थापन करून त्याचें नांव **वृषभ-ध्वजेश्वर** ठेविलें अशी कथा आहे.

**कपिलधारे**हून दुसरे दिवशीं मार्ग क्रमण करीत असतां मार्गांत **वरुणा** संगम लागतो, तेथें आदिकेशवाचें देवालय आहे. त्याचें दर्शन घेऊन नंतर तेथून जंव टाकीत **मणि-कर्णिका** घाटीं येऊन नंतर **'जव विनायक' 'साक्षी विनायक'** यांचें दर्शन घेतलें म्हणजे यात्रा पूर्ण झाली. एकंदर मार्गांत सर्व लहान मोठ्या देवता सुमारें ५०० वर येतील असा अंदाज आहे. पैकीं बहुतेक मंदिरें अर्वाचीन असून चार पांच कायतीं सुमारें ३०० वर्षांपूर्वींचीं आहेत. यवनांचे कारकिर्दींत पुष्कळांचा चकाचूर झाला होता; परंतु गेल्या शतकाचे अखेरीस राणी **भवानी** नामें एक वंगदे-शीय साध्वी स्त्री होती तिनें या सर्व मंदिरांचा उद्धार केला; व म्हणून **काशीं**त तिचें नांव अजरामर राहील यांत कांहीं शंका नाहीं. या क्षेत्रीं पुष्कळ लोक असे आहेत कीं, महि-न्यांतून एकदा तरी **पंचक्रोशी** यात्रा करितात.

# भाग १३ वा.

## रामनगर ऊर्फ व्यासकाशी.

काशी क्षेत्रांतील प्रसिद्ध स्थलांचें बहुतेक वर्णन गेल्या भागांत आलें आहे. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, हीं संपूर्ण स्थलें यात्रिक जनांनीं अवलोकन केलीं. फक्त **रामनगर** बाकी राहिलें आहे. याचा या भागांत विचार करूं. हें **रामनगर काशी**च्या दक्षिणेस सुमारें ३ मैलांवर **गंगेच्या** पूर्व तटाकीं असून तेथें एक **गंगेचे** काठीं प्रेक्षणीय **किल्ला** आहे. या किल्ल्यांत **व्यासेश्वर** नामें एक **शिवालय** आहे ह्मणून यास कोणी **'व्यासकाशी'**ही ह्मणतात. हें नगर **काशी**च्या महाराजांचे ताब्यांत आहे व त्यांचाच तेथें सर्व अधिकार आहे. महाराज स्वतः किल्ल्यांत राहत असल्यामुळें हा राजवाडा अत्यंत प्रेक्षणीय आहे हें सांगण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. हा राजवाडा अवलोकन करण्यास्तव अधिकाऱ्यांची परवानगी काढावी लागते; किंवा आंतील अधिकाऱ्यांची निदान ओळख तरी लागते. परंतु ज्या कोणास संधि मिळेल त्यानें हा अवश्य पहावा. **रामनगरीं** जाणें झाल्यास नौकेंत बसून जाणें आनंदप्रद असतें. दुसराही मार्ग डफरिन् पुलावरून आहे; परंतु हा फार लांबचा आहे. किल्ला हा **गंगेचे**

काठीं असल्यामुळें पर्जन्यकाळीं पाण्यांतच आहे किंवा काय असा भास होतो. ज्या किल्ल्यांत आतां आपणास प्रवेश करणें आहे, त्यांतील राजघराण्याचा अल्पवृत्तांत प्रथमतः निवेदन करून नंतर किल्ल्याच्या सौंदर्यमहिम्याकडे वळूं. पूर्वी अयोध्येच्या नबाबाचे कारकिर्दींत **मनसाराम** नामें कोणी गंगापुत्र जमीनदार मोठ्या उदयास आला होता. तो इ. स. १७४०त मृत्यु पावला. पुढें त्याचा मुलगा **बळवंतसिंग** हा मोठा शूर योद्धा असल्यामुळें अयोध्येचा नबाब वजीर **सुजाउद्दौला** यास अनेक प्रसंगीं यानें सहाय केलें; व ह्मणून नबाबसाहेब त्याजवर खुष होऊन त्यांनीं त्यास अनेक प्रांत जहागीर दिले; व अखेरीस त्यास **राजा** हा किताब दिला. **राजा बळवंतसिंग** हा मोठा न्यायी व लोकप्रिय असल्याकारणानें **काशीं**तील प्रजा फार सुखी असे. पुढें हा इ. स. १७७०त मृत्यु पावला. नंतर याचा मुलगा **चेतसिंग** हा गादीवर बसला. राज्यपदारूढ होतेवेळीं प्रथमतः त्यास अयोध्येच्या नबाबानें थोडी हरकत घेतली होती; परंतु रीतीप्रमाणें त्यास दरसाल खंडणी देण्याचें वचन दिल्यामुळें **काशी**राज्याविषयीं त्यास पूर्ण अधिकार देण्यांत आले. या समयीं बंगालचा गव्हर्नर **वॉरन्‌हेस्टिंग्स** होता. त्याचे मनांत कांहीं कुरापत काढून **चेतसिंगास** कंपनीचा मांडलिक करून घ्यावा असें घोळत होतें. याच सुमारास अयोध्येचा नबाब मृत्यु पावला. ही गोष्ट **वॉरनहेस्टिंग्जचे** आयती पथ्यावर पडली.

पुढें इंग्रज सरकार, अयोध्येचा नबाब **असोफ्उद्दवला** व **चेतसिंग** या तिघांत एक नवीन तहनामा झाला. त्यांत असें ठरलें कीं, **चेतसिंग** नबाबास जी दरसाल खंडणी देत असे ती यापुढें न देतां त्यानें कंपनी सरकारास दरसाल रुपये २२,६६,१८७ द्यावेत. अर्थात या तहान्वयें तो कंपनीचा आश्रित झाला. शिवाय याच तहांत असेंही ठरलें कीं, राजानें आपला कारभार स्वतंत्र रीतीनें चालवावा; व हे रुपये त्यानें कंपनी सरकारास कलकत्त्यांत रवाना करावेत. ठरल्याप्रमाणें **चेतसिंग** प्रतिवर्षी नियमितपणें खंडणी पाठवीत असे. यावरून इतकी गोष्ट व्यक्त होते कीं **चेतसिंगा**चे कंपनी सरकाराशीं दोस्तीचें वर्तन होतें. निदान तसें नसण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. अशा प्रकारें ७ वर्षे गेलीं. इतक्या अवधींत **कंपनी** सरकार व **चेतसिंग** या दोघांत कोणताही तंटा उपस्थित झाला नव्हता. परंतु १७७८ सालास प्रारंभ झाला व इकडे दोघांत भयंकर तंटा उपस्थित झाला व तें सर्व खापर अखेरीस **चेतसिंगा**चे डोक्यावर फुटून तो मात्र स्वतंत्रतेस मुकला !

इकडे दक्षिणेंत मराठे, हैदर व फ्रेंच हे फार प्रबल झाले होते. त्यांच्याशीं लढाया झाल्यामुळें कंपनी सरकारचा खजीना रिकामा झाला होता. ही तूट भरून काढण्याविषयीं **हेस्टिंग्सनें काशी**च्या तीन पलटणांचा खर्च सुमारें ९ लक्ष रुपयांची मागणी केली. हें ऐकून राजास फार आश्चर्य वाटलें. प्रथमतः त्यानें एवढी मोठी रक्कम

देण्याविषयीं कांकूं केलें, व अखेरीस कंपनी सरकारची आज्ञा त्यानें मान्य केली.*

पुढील वर्षीं पुन्हां पांच लाखांची मागणी कंपनीकडून आली. आतां मात्र **चेतसिंगा**स पंचाईत पडली! कसें तरी करून पहिल्या वर्षीं रुपये दिले. परंतु दुसऱ्याही वर्षीं जेव्हां मागणी आली तेव्हां त्यानें आपली स्थिति कंपनी सरकारास मोठ्या नम्रतेनें व्यक्त करून ह्मटलें कीं, दरसाल मी ठराविक खंडणी रवाना करतोंच जास्त रक्कम देण्याविषयीं तहांत उल्लेख नाहीं. ह्याकरितां एक वर्षाची सरकारची आज्ञा मान्य केली परंतु आतां मी असमर्थ आहें. हें उत्तर जातांच तिकडून जबाब आला कीं, 'कंपनीची आज्ञा मान्य केली पाहिजे. नाहींतर राज्यावर स्वारी करूं,' अखेरीस **चेतसिंगा**नें निरुपायास्तव ह्या वर्षींही पांच लक्ष रुपये दिले व दंडाबद्दल २०,००० रुपये दिले. नंतर **चेतसिंगा**नें ही मागणी बंद करण्याकरितां **लाला सदानंद नामें** एक वकील कलकत्त्यास पाठविला व त्याबरोबर दोन लक्ष रुपये शेलापागोट्याबद्दल पाठविले. हे रुपये घेऊनही **हेस्टिंग्स** साहेब तृप्त झाले नाहींत!! पुन्ह १७८० सालांत ही मागणी आली व 'विलंब न लावितां पाठवावी, नाहीं तर एक लाख रुपये दंडाप्रीत्यर्थ द्यावे लागतील' असें लिहून आलें. बिचाऱ्या **चेतसिंगा**नें ही

---

* *Insurrection in Benaras p. 3.*

रक्कम बिनबोभाट रवाना केली. ह्याप्रमाणें तीन वर्षें बराबर **चेतसिंगा**पासून जुलूमानें पैसे घेतले. पुढें १७८० च्या नोवेंबरचे दुसरे तारखेस सुप्रीम कौन्सिलांत असा ठराव पास झाला कीं अयोध्येचा नबाब **फैयाजउल्लाखान्** यानें व राजा **चेतसिंगानें** दोघांनीं आपली ठरावीक खंडणी देऊन शिवाय पांच हजार घोडेस्वार प्रत्येकानें सरकाराचे सेवेंत ठेवावेत. हा नवीन पास झालेला ठराव ऐकून त्यास फारच वाईट वाटलें; व त्यानें उत्तर पाठविलें कीं, 'माझे राज्यांत अवघे १५०० घोडेस्वार आहेत व मी ५००० कोठून देऊं?' तेव्हां तिकडून लिहून आलें कीं 'निदान २००० हजार तरी पाठवा; व अखेरीस १५०० तरी पाठवा, किमानपक्ष १००० तरी पाठवा.' तेव्हां राजानें २५० स्वार व कांहीं पायदळ पाठवितों असें कळविलें. परंतु तिकडून त्यासंबंधीं एक अक्षरही लिहून आलें नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, **चेतसिंगा**वर कंपनीचा हुकूम अमान्य केल्याचा दोष शाबीत करून त्याचे प्रांतावर स्वारी केली असतां पुष्कळ द्रव्य मिळेल, असा त्यांचा अंतस्थ हेतु होता. परंतु तें सर्व एकीकडे ठेवून **चेतसिंगा**वरच एक दोष कायम केला. तो लिहितो* कीं, '**चेतसिंगाचे** मनांतून आपणास स्वतंत्र करून घेणें होतें. इतकेंच नव्हे परंतु कंपनीसरकारचा समूळ नाश करण्याविषयीं त्याची इच्छा होती.' ही गोष्ट कधीं तरी संभवनीय वाटेल? राजा

* *Insurection in Benaras* p. 6-7.

चेतसिंग ह्मणजे एक संस्थानिक. याचे मनांत अशी कल्पना येणें सुद्धां अशक्य होती. परंतु हेस्टिंग्जनें अखेरीस कंपनीचा हुकूम अमान्य केल्याचा दोषारोप लावून इ. स. १७८१ जानेवारीचे ७ वे तारखेस कलकत्त्याहून काशीवर स्वारी करण्याचे हेतूनें कूच केलें!! स्वारी करण्याविषयीं तो आपला उद्देश लिहितो कीं, 'कंपनीची आज्ञा यानें अमान्य केली ह्मणून मी आपल्या मनाचा पक्का ग्रह केला कीं, अशा अडचणीचे प्रसंगीं याजपासून जबरदस्तीनें पैसे घेतले पाहिजेत; इतकेंच नव्हे, परंतु दंडाबद्दलही रुपये घेतले पाहिजेत. सारांश अपराध क्षमा करण्याबद्दल पुष्कळ द्रव्य तरी घेईन, नाहींपेक्षां चांगला सूड* घेईन."

अस्तु. वॉरन् हेस्टिंग्ज काशीवर स्वारी करणार हें ऐकून चेतसिंगास फार वाईट वाटलें, व ह्मणून त्यानें त्यास २० लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. एवढ्या रकमेनें तो तृप्त न होतां पन्नास लक्ष रुपये त्यानें दंडाप्रीत्यर्थ मागितले, नाहीं तर आमचें सैन्य मागें फिरणार नाहीं. परंतु हें उत्तर व सैन्य बरोबरच आलें. ता. १० ऑगष्ट-रोजीं हेस्टिंग्जची स्वारी काशींत दाखल होऊन माधवदासाचे बागेंत शहराचे मध्यभागीं त्यानें डेरा ठोकला. नंतर त्यानें दोषारोपाचा एक खलिता चेतसिंगाकडे पाठविला; व तावडतोब सफाई करण्याकरितां लिहिलें. दुसरे दिवशीं त्यानें काशींतील रेसिडेन्ट मार्कह्यामसाहेब यांस हुकूम

* *Insurrection in Banaras p.* 7-8.

फर्माविला कीं, आपण सैन्यासह **शिवालय** घाटावरील राजवाड्यांत जाऊन **चेतसिंगास** कैद करावें. हुकुमाप्रमाणें **मार्कह्यमनें** आपलें काम बजाविलें. राजवाड्यांतील असा हा शोचनीय वृत्तांत नागरीकजनांचे कानीं पडतांच सर्व नगरभर हाहा:कार सुरू झाला. इकडे **चेतसिंगावर** भयंकर प्रसंग गुजरला होता. इतकेंच नव्हे, परंतु राज्य जाण्याचा समय आल्यामुळें तो अगदीं गर्भगळित झाला यांत नवल तें कोणतें? सर्व नागरिकजन एकत्र होऊन ते इंग्रज सैन्यावर चालून गेले. या लढाईंत सुमारें २९० मनुष्यांची कत्तल झाली. **हेस्टिंग्जनें** आणखी फौज मेजर **पोफॅम्** साहेबाबरोबर रेसिडेन्टच्या मदतीकरितां पाठविली. परंतु या सैन्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. या गडबडींत **चेतसिंग** आपल्या राण्यासहवर्तमान हुजरे लोकांच्या पागोट्याचा दोर करून खिडकींतून खालीं उतरून नांवेंतून **रामनगरीं** ह्मणजे पूर्व तटाकीं गेला. तेथून तो **विजयगड** किल्ल्यांत गेला. हें वर्तमान **हेस्टिंग्जला** कळतांच त्यानें तो किल्ला लुटण्याकरितां आपल्या फौजेस हुकूम दिला. **चेतसिंगास** ही खबर कळल्यावर तो तेथून पळून **शिंद्याचे** आश्रयास **ग्वाल्हेरीस** जाऊन राहिला. तेथेंच त्याचा अंत इ. स. १८१०त झाला!

या लुटींत कंपनीसरकारास २३,२७,८१३ रुपये मिळाले. **चेतसिंग काशींतून** पळाल्यावर **काशीचें** राज्य आयतेंच कंपनीचे हातीं आलें. कंपनीनें नंतर **चेतसिंगाचे**

भाचास गादीवर बसवून त्यानें सालीना ४० लक्ष रुपये कंपनीस द्यावे असा ठराव करून घेतला. याचें नांव महाराज **महिप नारायणसिंह** बहादुर होतें. हा इ.स. १७९५ त मरण पावला. नंतर याचा मुलगा **उदितनारायणसिंह** बहादुर हा गादीवर बसला. हा १८३९ त मृत्यु पावला. नंतर याचा पुतण्या **ईश्वरीप्रसाद नारायणसिंह** हा गादीवर बसला. हा १८९० त मरण पावला. यास सरकारानें **जी. सी. एस्. आय्.** किताब दिला होता, व त्यास १३ तोफांची सलामी होती. हल्लीं त्यांचे चिरंजीव **प्रभुनारायणसिंह** हे गादीवर आहेत. येणेंप्रमाणें या राजघराण्याचा अल्पवृत्तांत आहे. असो, आतां आपण राजवाड्याकडे वळूं.

हा राजवाडा पांढऱ्या शुभ्र दगडांचा असून मुख्य प्रवेशद्वार संगमरवरी पाषाणाचें आहे; व त्यावर '**सत्यान्नास्तिपरोधर्मः**' अशीं अक्षरें आहेत. आंतील प्रदेश भव्य असून प्रेक्षणीय आहे. विशेषेंकरून राजे साहेबांचा ऐने '**तसबीर**' महाल, खास दिवाणखाना, संगमरवरी चंद्रशाला, तसेंच शकुंतलामहाल वगैरे स्थानें प्रेक्षकांस तल्लीन करून सोडणारीं आहेत. तसबीर महालांत अनेक प्रसिद्ध लोकांच्या तसबिरी हारीनें लाविल्या आहेत. हा महाल खालींच आहे. सोपानमार्ग चढून वर गेलें असतां वर एक दालन लागतें, हा खास दिवाणखाना होय. यांत निरनिराळ्या देशांतील यंत्रकलेचें अपूर्वत्व दाखविणारीं

नादमनोहर वाद्यें, नेत्राल्हादक कलाकौशल्याचे बहुविध जिन्नस, दरबारी मंडळीकरितां केलेलीं मृदु आसनें आणि खसाच्या तट्यांतून खुषबोईचा मंद वायु येण्याकरितां केलेली सुरेख व्यवस्था पाहून चित्त अगदीं रमून जातें. या दिवाणखान्यांत अनेक प्रकारच्या वस्तू आहेत. पैकीं एक हस्तीदंताचें झाड आहे तें पाहून खरोखरीच भारतवर्षीय कारागिरांच्या कौशल्याबद्दल परमावधीचें कौतुक वाटल्यावांचून रहावयाचें नाहीं. ह्या झाडाचें केलेलें नाजूक काम व त्यामधील पुष्पमधूचें सेवन करण्यांत आसक्त झालेला भ्रमर पाहून प्रत्येकाच्या मुखांतून '**धन्य**' '**धन्य**' असेच उद्‍गार निघाल्यावांचून राहणार नाहींत.

या महालांतून पुढें गेलें असतां दुसरे अनेक लहान लहान महाल लागतात. यांत पवित्र क्षेत्रें ह्मणजे **मथुरा, वृंदावन, हरिद्वार** वगैरे स्थलांचे हुबेहुब देखावे दाखविले आहेत. अंमळ पुढें गेलें असतां **गंगे**सन्मुख असलेली '**चंद्रशाला**' अवलोकनांत येते. या स्थलाचें सौंदर्य फार अपूर्व आहे. पैकीं शकुंतला महालाविषयीं जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे. यामध्यें जगत्प्रसिद्ध शकुंतला नाटकांतील सर्व देखावे दाखविले आहेत. एकंदरींत हाही हॉल अद्वितीय ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

किल्ल्याचे मागील बाजूस गंगासन्निध एक **व्यासेश्वरा**चें देवालय आहे. देवालय लहान आहे खरें परंतु स्थान फारच रमणीय आहे. देवालयांत **व्यासमुनीं**ची

तसबीर आहे. या मंदिराची स्थापना **काशी**राजानें केली आहे.

**रामनगर**चे उत्तरेस सुमारें एक मैलावर **दुर्गे**चें एक अप्रतिम देवालय आहे. अशीं देवालयें **काशीं**त फार तर एक दोनच असतील. मंदिरावरील कोरींव काम फारच उत्कृष्ट आहे. ह्मणजे कारागीर लोकांनीं आपल्या कुशलतेची कमाल करून सोडली आहे. या मंदिराचे पायाचा विधि **चेतसिंगा**चे हस्तें झाला. परंतु त्याच्या हयातींत तें काम तसेंच अपुरें पडलें होतें; व बिचाऱ्यास त्याच्या दर्शन सुखाचाही लाभ झाला नाहीं ! जमिनीपासून शिखरापर्यंत मंदिराची उंची १०० फूट आहे. बाह्य भाग अनेक देवतांच्या मूर्तींनीं विभूषित असल्याकारणानें मंदिराचें काम फारच अपूर्व झालें आहे. पुष्कळ मूर्तींचे अवयव छिन्नविछिन्न झाले आहेत. चौकशीअंतीं असें कळलें कीं, पूर्वी सांगितलेल्या **बंडांत** गोळ्यांच्या वृष्टीनें पुष्कळ मूर्ति अवयवहीन झाल्या. हें मंदिर बांधण्याकरितां अन्य देशाहून कारागीर लोक बोलाविले होते, व द्रव्याची मुळींच कमतरता नव्हती मग अप्रतिम कां न व्हावें ? **हत्ती, व्याघ्र, सिंह** वगैरे सर्व श्वापदांच्या मूर्ति, दशावतार, अनेक देवदेवता, **गंगा, यमुना** वगैरे नद्यांच्या मूर्ति, श्रीकृष्ण आपल्या **गो**पीसह आनंद करीत असलेला देखावा, इंद्र, ब्रह्मदेव, विष्णु, भैरव, कुबेर, गणपती, अग्नि, सूर्य, वायु, राम, लक्ष्मण, सीता, वगैरे अनेक मूर्ति अवलोकनांत येतात. महान्

महान् तपस्वी व ऋषिमंडळ, कौरव पांडव, नारद, बल-राम, व कृष्णानें अधांत्री धरलेला गोवर्धन पर्वताचा देखावा वगैरे मूर्ति फारच चित्तवेधक आहेत.

सभामंडप हा विस्तीर्ण असून प्रत्येक कोनांत एकेक संगम-रवरी पाषाण मूर्ति ह्मणजे, गरुड, सिंह, नदी वगैरे विरा-जीत आहेत. मंदिराचे जवळच एक स्वच्छोदकाचा विस्तीर्ण जलाशय असून तलावास चारी बाजूस घाट आहेत. या तलावाला लागून एक उद्यानभूमिका असून अनेक आम्र-वृक्ष ओळीनें लाविलेले दृष्टीगोचर होतात. माघमासीं प्रतिवर्षी व्यासेश्वराचा एक मोठा मेळा रामनगरीं भरतो. या समयीं हा संपूर्ण प्रदेश अहोरात्र काशींतील पौरजनांनीं गजबजलेला असतो. कांहीं जण तलावांत स्नान करीत असतात; कांहीं इतस्ततः आपल्या स्नेही मित्रांसह भ्रमण करीत असतात; कांहीं जन भोजनविधि उरकण्यांत निमग्न असतात; कांहीं चैनी लोक 'गौरेया' ह्मणजे मृत्ति-केची गुडगुडी भरून धूम्रपान करीत असतात; जिकडे तिकडे मेवामिठाईवाल्यांच्या पंक्ति भरगच्च असतात; शें-कडोंशें पानवाले 'बिडा लेव' अशी गर्जना करीत असतात; मधून मधून कांहीं हौशी लोक वेश्यांकडून नृत्य व गायन करवून मनरंजन करीत असलेले अवलोकनांत येतात; एकंदर माघ मासभर या उत्सवाचेयोगें या स्थानाचें रूपांतर होतें असें ह्मटलें पाहिजे. अशा या समयीं एखाद्या विदे-

शीय पुरुषाचें आगमन जर येथें अकस्मात् झालें तर त्यास सुद्धां क्षणभर कौतुक वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

या **दुर्गे**चे मंदिरापासून सुमारें एक मैल उत्तरेस दुसरें एक **व्यासेश्वरा**चें देवालय आहे, व या **व्यासा**निमित्तच हा मेळा भरतो. आंतील पिंडी स्वयंभु आहे असें लोक सांगतात. मंदीर हें पाहण्यासारखें मुळींच नाहीं. **व्यासा**-विषयीं अशी कथा सांगतात कीं, एके समयीं व्यासमुनी या क्षेत्रीं आले असतां **महादेवानें** त्यांची परीक्षा पाहण्यास्तव **अन्नपूर्णेस** अशी आज्ञा केली कीं, यांस कांहीं दिवस अन्न न द्यावें. सात दिवस झाल्यानंतर **व्यासमुनि** अन्न न मिळाल्यामुळें कोपायमान झाले व ह्मणून त्यांनीं क्षेत्रास शाप दिला. तेव्हां **विश्वेश्वर** प्रगट होऊन बोलले कीं, **व्यासा** तूं महान् तपस्वी असून अद्याप तुझा कोप शांत झाला नाहीं तस्मात् तूं येथें राहण्यास अयोग्य आहेस. नंतर **व्यासांनीं** **विश्वेश्वरा**ची विनंती केल्यावरून त्यांस **काशी**पलीकडे जागा रहाण्यास दिली, व वर दिला कीं, जो कोणी तुझें दर्शन घेणार नाहीं, त्याची यात्रा सफळ होणार नाहीं. **व्यासनगरीं** मृत्यु आल्यास पुढील जन्मीं तो गर्धभाचे वंशीं जातो असा भाविक जनांचा समज आहे. **रामनगर** बोरांविषयीं या प्रांतीं प्रसिद्ध आहे. हीं बोरें स्वादिष्ट असून मोठीं असतात.

# भाग १४ वा.

## काशींतील मेळे.

या क्षेत्राच्या सामाजिक स्थितीची एक बाजू ह्मणजे प्रतिमासिक आणि साप्ताहिक होणाऱ्या महोत्सवांविषयीं दाक्षिणात्यांस थोडीशी ओळख करून दिली असतां अप्रासंगिक होणार नाहींसें वाटल्यावरून त्यांचा या स्वतंत्र भागांत विचार केला आहे.

'मेळे' हे हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व लहान मोठ्या शहरांत, वर्षांतून नियमित समयीं व कधीं कधीं सणावारीं भरतात; हें या ठिकाणीं निराळें सांगण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. सांप्रत मेळा हा शब्द सर्वत्रांस परिचित झालेला आहे, व आपल्या दक्षिण प्रांतांतही **गणेशोत्सव, शिवजयंति** वगैरे महोत्सव आजकाल जरी निरनिराळया स्वरूपानें अस्तित्वांत आले आहेत तरी ही चाल फार पुरातन आहे. तथापि **काशींतील** मेळयाप्रमाणें—ज्यांत शेंकडोंशें स्त्रीपुरुष उंची कपडे परिधान करून आनंदानें इकडे तिकडे जात येत आहेत; व तऱ्हेतऱ्हेची मिठाई व फळफळावळ वगैरे पदार्थांच्या दुकानांनीं विशेष शोभा आली आहे—असे **मेळे** अन्यत्र क्वचित्‌च होत असतील असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. यात्रिकजनांचें या क्षेत्रीं वास्तव्य थोडें असल्याकारणानें त्यांस या मेळ्यां-

पासून होणाऱ्या आनंदाचा व सुखाचा लाभ करून घेतां येत नाहीं, ही गोष्ट निराळी. परंतु येथील स्थायिक जनांस हें एक करमणुकीचें साधन झालें आहे. उत्तर हिंदुस्थानांतील मेळे फारच प्रेक्षणीय आहेत. मेळ्याचे दिवशीं नागरिकजन मोठ्या थाटमाटानें त्या स्थानीं जातात. या मेळ्यांत इतका अनावर जनसमूह जमतो कीं, कधीं कधीं पन्नास हजारांवर प्रेक्षकांची संख्या असते. खरोखरीच काशींतील लोकांप्रमाणें चैनी व ऐषआरामी लोक अन्य स्थळीं क्वचित्‌च आढळतील असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

मेळे हे दोन प्रकारचे असतात. पैकीं एकाचा धर्माशीं थोडाबहुत संबंध असतो. त्यांस आपण धार्मिक मेळे असें ह्मटलें तरी चालेल; व दुसऱ्या प्रकारच्या मेळ्यांचा धर्माशीं मुळींच संबंध नसतो; व ते कारणपरत्वें अस्तित्वांत आले आहेत. हे मेळे केवळ हिंदु लोकांतच होतात असें नाहीं; तर मुसलमानांतही आहेत. कोणत्याही लोकांत एकीची वृद्धि होण्यास मेळे हें एक उत्तम साधन आहे. असो. प्रथमतः काशींतील फार सुप्रसिद्ध, प्रेक्षणीय व बहुजनप्रिय '**बुढवा मंगळ**' मेळ्याचें थोडें वर्णन करून नंतर अन्य मेळ्यांकडे वळूं.

१. **बुढवामंगळ मेळाः**—हा मेळा चैत्र कृष्ण पक्षांत ह्मणजे होळीनंतर येणाऱ्या दुसऱ्या महिन्यांतील मंगळवारीं

प्रतिवर्षी गंगेंत भरतो. हा महोत्सव इतर मेळ्यांपेक्षां फारच अवलोकनीय असतो. दूरदूरचे लोक हा मेळा पहाण्याकरितां या समयीं काशींत येतात. हा महोत्सव मंगळवारपासून तों शनिवारपर्यंत चार दिवस अहोरात्र गाजत असतो. या चार दिवसांत गंगेवर मोठी विलक्षण मौज असते. येथील मोठमोठे शेटसावकार मेळ्यांचे पूर्वींच पुष्कळ दिवस आपल्या नौका चित्रविचित्र रंगानें रंगवून हंड्या व झुंबरें यांनीं सुशोभित करितात; व मेळ्याचे दिवशीं आपल्या इष्टमित्रांसह नौकेंत बसून वेश्यांकडून नृत्यगायन करवितात. हा सर्व विधि गंगेंत होत असल्याकारणानें व असंख्य जनसमूह एकत्र झाल्यामुळें कधीं कधीं प्रेक्षकांस दहा रुपये देऊनही नौकेंत जागा मिळत नाहीं. रात्रीं सुमारें एक मैल सर्व नदीप्रदेश शेंकडोंशें नौकांनीं गजबजलेला असतो; व जिकडे तिकडे दीपकांची रोषनाई व बहुजनांचा किलकिलाट व नृत्य आणि गायन ऐकण्यांत आतुर झालेल्या जनांच्या मनाची आनंददायक वृत्ति; व एका नावेंतील गाणें ऐकून दुसऱ्या नावेंतील वेश्यांचें गायन ऐकण्याकरितां पडत असलेल्या उड्या; व इतक्यांत एखादी नाव पाण्यांत बुडाली असा ध्वनि कानीं पडतांच सन्निध असलेल्या नावेंतील लोकांची तारंबळ; व ही शोचनीय खबर सर्वत्र पसरतांच या महोत्सवाचा झालेला बेरंग; व कांहीं मनुष्यांनीं गंगेंत उड्या टाकून एखाद्या बालकास वर आणून

हातांत घेतलेला हृदयद्रावक देखावा; वगैरे प्रकार फारच प्रेक्षणीय असतो.

या मेळ्याची शोभा म्हटली ह्मणजे बुधवारपासून असते. त्या दिवशीं सायंकाळीं येथील सुप्रसिद्ध **भोंसल्या**चे घाटावर सर्व नौका एक ठिकाणीं जमतात. या सर्व नौका रात्रीं **दशाश्वमेध** घाटाकडे रवाना होतात. त्या रात्रीं तेथेंच मुक्काम होतो. **काशी**नरेश स्वतः आपल्या राज्ञीय नौकेंत बसून ताफ्यासह **रामनगराहून** येऊन मेळ्यांत सामील झाल्यामुळें मेळ्यास अधीकच शोभा प्राप्त होते. ही सर्व मजा पाहून प्रातःकाळीं सर्व मंडळी स्वगृहीं परत जाते. पुन्हां दुसरे दिवशीं ह्मणजे गुरुवारीं ज्यास '**दंगलची रात्र**' ह्मणतात त्या रात्रीं पूर्ववत् सर्व नौका **दशाश्वमेध**घाटीं एकत्र जमून असी घाटाकडे जातात; व त्या रात्रीं तेथेंच मुक्काम होतो. तिसरे दिवशीं ह्मणजे '**दंगल**'-चे रात्रीं हा **मेळा रामनगरीं** भरतो. हा शेवटचा दिवस असल्या कारणानें मेळ्यास फारच बहार येते. येणेंप्रमाणें हा समारंभ प्रतिवर्षी साजरा होतो. या चार दिवसांत सुमारें एक लक्ष रुपयांची घडामोड होत असावी असें अनुमान आहे. हा **मेळा** अवलोकन करण्याकरितां ज्यांस ऐपत नसते असे गरीबगुरीब लोक घांटावरूनच पाहतात. हा **मेळा** नागरिक लोकांतच फार प्रिय आहे असें नाहीं; तर मोठमोठे इंग्रजलोक सुद्धां **मेळा** पहाण्याकरितां

उद्युक्त झालेले असतात. एकंदरींत हा **मेळा** दर्शनीय असतो.

'**बुढवा मंगळ**' हें नांव पडण्याचें कारण वाचकांचे सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. **बुध** आणि **मंगळ** यां पासून **बुढवा मंगळ** हें नांव पडलें आहे. या मेळ्याचा धर्माशीं कोणत्याही प्रकारें संबंध नसून इतिहासप्रसिद्ध **काशी**चा राजा **चेतसिंग** यानें प्रचारांत आणिला. शिमग्याचा सण हा आपल्या लोकांत मोठा आहे; व हा **मेळा** शिमग्यानंतर होतो. तेव्हां अर्थात् शिमग्यानिमित्तच हा महोत्सव करण्यांत येतो. हा **मेळा** गेल्या शंभर वर्षांपासून अस्तित्वांत आला आहे. सांप्रत हा **मेळा** अगदीं बंद करण्याविषयीं पुष्कळांचे उद्योग चालले आहेत. कारण इतकेंच कीं या मेळ्यांत पुष्कळ द्रव्याचा अनावश्यक व्यय होतो.

२. **रामलीलाः**—हा उत्सव आश्विन मासभर उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र होतो. **अयोध्येंत** तर या मेळ्याचें माहात्म्य फारच आहे. **काशींत** देखील हा उत्सव अपूर्व होतो. या मेळ्यांत लहान लहान मुलांस राम, लक्ष्मण सीता वगैरे काल्पनिक सोंगें देऊन त्यांची शहरांतून मिरवणूक काढितात. या मिरवणुकींत त्या सोंगांकडून तुळशीदासकृत रामायणाचा पाठ करवितात. रामायणांतील वर्णिलेल्या गोष्टींची नक्कल त्यांकडून हुबेहुब नाटकाप्रमाणें

करवितात. ह्मणजे सीताहरण, रावणवध, रामाचा वनवास वगैरे देखावा अगदीं हुबेहुब दाखवितात. आतां कित्येक सुशिक्षित जनांस हा सर्व प्रकार वेडगळ भासतो तरी भाविकजन प्रेमपुरःसर अंतःकरणानें त्या सोंगांची एखाद्या देवाप्रमाणें पूजा अर्चा करितात. दसऱ्याचे दिवशीं येथील फार प्रसिद्ध **चित्रकूट** नामें एक स्थान आहे त्याठिकाणीं पन्नास हजारांवर जनसमूह जमतो; त्यादिवशीं प्रेक्षकजन जागेसंबंधीं मार्गांतील बगीच्यांत पूर्वींच तजवीज करून ठेवितात. सायंकाळीं वनवासाहून आलेल्या रामाशीं भरताची भेट होते. त्यास **'भरतमिलाप'** असें ह्मणतात. हा समारंभ फारच प्रेक्षणीय असतो. **काशी**नरेश आपल्या लवाजम्यासह अंबारींत बसून प्रतिवर्षीं हा समारंभ पहाण्याकरितां येतात.

२. **दुर्गेचा मेळाः**—हा नवरात्रांत नगराबाहेर असलेल्या देवालयांत नऊ दिवस अहोरात्र असतो. ही **देवी** एक राक्षसीणच ह्मटली पाहिजे. या नऊ दिवसांत हजारों निरपराधी बकऱ्यांचा या मंदिरांत निर्दयपणें होत असलेला वध पाहून मनुष्य कितीही कठोर मनाचा असला तथापि त्याचे मनास दयेचा पाझर फुटल्यावांचून राहणार नाहीं. इतक्या बकऱ्यांचा क्रूरपणें वध होत असतांही ही **देवी** तृप्त होत नाहीं!! दसऱ्याचे दिवशीं हिला एक धष्टपुष्ट **रेडा** बळी द्यावा लागतो!! आफ्रिकेंतील रानटी

लोकांच्या अशाच ज्या कांहीं चाली आहेत त्यांत व यांत कांहीं फरक आहे काय? देवालयासारख्या पवित्र व पूज्यस्थानीं अशा प्रकारें अनाथ प्राण्यांची अमानुषपणें होणारी कत्तल पाहून नेत्रांतून अश्रूपात होतात; व अशा देवीचें दर्शन घेण्याची सुद्धां इच्छा होत नाहीं. गरीब प्राण्यांची हत्या केल्यानें पूर्वकृत पाप जर कदाचित् नष्ट होत असेल तर वध करविणाऱ्यांनीं आपल्या या भूतदयेचा उपयोग आपल्या इष्टमित्रांवर करून त्या बकऱ्याप्रमाणें त्यांचा वध केला असतां कोणता दोष आहे? बकऱ्यांच्या मानेवर सुरी ठेवणारा तर खाटिकच असतो; परंतु जे लोक वध करवितात त्यांस महाखाटिक ह्मटलें पाहिजे. परंतु हें असें प्रतिपादन करावें कोणी? कारण धर्माजोबा दत्त ह्मणून पुढें उभे राहतात. आमच्यांतील कित्येक जुन्या लोकांस परकीयांचें आचरण रीतिरिवाज फार तिरस्करणीय वाटतात. परंतु आपल्या पायाखालीं किती अंधार आहे हें त्यांस कळूं नये हें मोठें नवल नव्हे काय? बिचाऱ्या धर्माचे नांवें आमच्या लोकांत नित्यशः पुष्कळ अघोर व अमानुष कृत्यें होत आहेत; यांविषयीं विचारी मनुष्य जर सूक्ष्मरीत्या विचार करील तर त्यास सहज कळून येण्यासारखें आहे कीं, आमच्या धर्मांत, आमच्या चालीरीतींत आणि आमच्या आचारविचारांत सुधारणा करण्यास बरीच जागा आहे. हिंदुस्थानांत असा अघोरपणें वध पुष्कळ ठिकाणीं होतो. याविषयीं एखाद्या धर्ममंडळ सभेनें कधीं तरी विचार

केला आहे काय ? असो. यासंबंधीं अधिक उहापोह कर-ण्याचें हें स्थळ नव्हे.

४. **गंगा सप्तमी मेळाः**—हा मेळा वैशाख शुक्लप-क्षांत सप्तमीचे दिवशीं असतो. हा **गंगे**चा जन्मदिवस होय. या दिवशीं भगीरथानें स्वर्गांतून **गंगेस** खालीं आणलें असा भाविक जनांचा समज आहे. या दिवशीं पुष्कळ लोक भक्तीनें **गंगे**ची पूजा करितात. रात्रीं कांहीं घाटा-वर नाच व रोषनाई असते. हा **मेळा**ही प्रेक्षणीय असतो.

५. **निर्जला एकादशी मेळाः**—हा मेळा ज्येष्ठमासीं शुद्ध एकादशीचे दिवशीं **गंगे**च्या कांठीं होतो. याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, एकेसमयीं श्रीकृष्णानें भीमास एकादशीचें व्रत करण्यास सांगितलें. परंतु तसें करणें भीमास कठीण वाटलें. परंतु काय करतो एकादशी करणें भाग पडलें. दोन प्रहरीं उन्हाच्या तापामुळें भीमास चैन पडेना. ह्मणून कृष्णानें भीमास ताप शमनार्थ **गंगे**चे तळीं जाऊन बसण्यास सांगितलें त्याप्रमाणें त्यानें केलें. या कारणास्तव **काशीं**तले लोक या दिवशीं तोंडांत पाणी न घेतां निर्जला व्रत करितात. सायंकाळीं **गंगे**वर अपूर्व शोभा असते. लहान मोठी सर्व पोहणारी मंडळी पूर्व तटापासून तों पश्चिम तटापर्यंत सुमारें अर्ध्या मैलाचें पात्र पोहून जातात, व नंतर पश्चिमतटीं कुस्त्या वगैरे खेळ खेळतात. हाही एक मोठा रमणीय देखावा असतो.

६. **गौरी घाट मेळा:**—हा मेळा राजमंदिरांत चैत्र शुक्ल तृतीयेचे दिवशीं भरतो. हा मेळा मुख्यत्वेंकरून मारवाडी लोकांचा आहे. सायंकाळीं घाटांवर थोडी मौज असते.

७. **रामनवमी मेळा:**—हा महोत्सव सर्व हिंदुस्थानांत असतो सबब याविषयीं येथें अधीक उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. या रामनवमीचे दिवशीं पुष्कळ स्त्री पुरुष प्रात:काळीं **गंगे**वर स्नानविधि आटपून रामघाटावरील रामाचें दर्शन घेऊन स्वगृहीं जातात. **अयोध्ये**स तर हा उत्सव अप्रतिम होतो. प्रतिवर्षी सुमारें पांच लक्ष यात्रा तेथें जमते.

८. **नृसिंह चतुर्दशी मेळा:**—हा मेळा वैशाख शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं '**बडा गणेश**' मोहोल्यांत **नारसिंहा**चे स्मरणार्थ होतो. या दिवशीं पुष्कळ नृसिंहभक्त लोक उपवास करितात. सायंकाळीं हिरण्यकश्यपू व नारसिंह या दोघांच्या लढाईचा देखावा दाखवितात.

९. **गाजीमिया मेळा:**—हा बकरिया कुंडाजवळ ज्येष्ट मासभर असतो. हा उत्सव मुसलमान लोकांचा आहे खरा; तथापि हिंदूंचेंही त्यांत अंग असतें. इतिहासप्रसिद्ध हिंदुधर्मद्वेष्टा गिझनीचा बादशहा सुलतान **महंमद** याच्या पुतण्याचे स्मरणार्थ हा उत्सव होतो. महंमदास सालरशाहू नामें एक मेव्हणा होता; त्यास त्यानें हिंदुस्थानांत लढाईनिमित्त पाठविलें होतें. त्याची **स्त्री** बेगम **सतार** नामें

त्यासमयीं गरोदर होती. ती मार्गांत अजमीर मुक्कामीं इ. स. १००२ त पुत्ररत्न प्रसूत झाली. त्याचें नांव सालर **मसाऊद** असें होतें. हा आपले वयाचे १९ वे वर्षीं ह्मणजे इसवी सन १०२१त हिंदूंशीं एका लढाईत लढत असतां जखमी होऊन मरण पावला. पुढें त्यास **अयोध्ये**जवळ बहराईच नांवें एक गांव आहे त्या ठिकाणीं पुरलें; व तेथें त्याचे स्मरणार्थ एक कबर बांधिली. ती मुसलमान लोक पूज्य समजतात. ही लढाई धर्मसंबंधीं होती; व **सालरशाहू**नें आपले प्राण स्वधर्मोन्नतीकरितां अर्पण केले होते सबब अशा महान् योध्याविषयीं यवन लोकांत पूज्यबुद्धि असणें हें स्वाभाविकच आहे. त्यांनीं त्याचें नांव साधुसंतांत गोंविलें आहे. दिल्लीचे आसपास हा शाहजादा '**पीर अलीम**' नांवानें प्रसिद्ध आहे. शेकडों मुसलमान त्याच्या कबरेचें दर्शन घेतात. **काशीं**तही मुसलमान जातींत हा उत्सव मोठ्या थाटमाटानें करितात. परंतु हा मेळा सभ्य लोकांन पहाण्यासारखा नसतो. कारण यांत हलक्या जातीचें अंग फार असतें. याशिवाय वेश्यांचा समुदाय फार असतो. त्या तमासगीर लोकांनां फारशी भाषेंत या शाहजाद्याचे स्तुतिपाठ ह्मणून करमणूक करितात. कांहीं अगदीं नीच जातीचे लोक मद्यप्राशन करून अंगांत संचार झाल्याचें ढोंग करून भाविक लोकांस फसवून त्यांजकडून पैसे उपटतात.

**१०. दशाहार मेळाः**—हा मेळा ज्येष्ठमासीं शुक्ल पक्षांत घांटांवर असतो. दशमीचे दिवशीं तर घांटावर स्त्रियांची फार दाटी असते; गंगापूजन वगैरे विधि प्रेक्षणीय असतो.

**११. रथयात्रा मेळाः**—हा मेळा पंडित वेणीराम नांवाच्या गृहस्थाचे बागेंत आषाढ शुक्ल पक्षांत प्रतिपदेपासून तों तृतीयेपर्यंत भरतो. या चार दिवसांत जगन्नाथाची रथांतून मिरवणूक काढितात. हा **मेळा** सभ्य लोकांनीं पाहण्यासारखा असतो. कधीं कधीं तर या मेळयांत असंख्य जनसमूह जमतो.

**१२. चौका घाट मेळाः**—हा मेळा आषाढी पौर्णिमेच्या दिवशीं चौका घाटावर असतो. या दिवशीं कांहीं विद्यार्थी जन पूर्वापार चालीला अनुसरून आपल्या **गुरूंची** यथाशक्ति पूजा करून त्यांस गुरुदक्षणाही देतात, व ह्मणून या दिवसास '**गुरु पौर्णिमा**' असें म्हणतात. असें सांगतात कीं, प्राचीनकाळीं या चौका घाटावर ज्योतिषी लोक एकत्र जमून पावसापाण्याचा कसा काय रंग आहे, साल शुभ आहे किंवा अशुभ वगैरे गोष्टींवर चर्चा करीत असत. परंतु सांप्रत हा देखावा फारसा अवलोकनांत येत नाहीं.

**१३. वृद्धकाल मेळाः**—हा मेळा वृद्धकाल मोहोल्यांत श्रावणमासीं प्रति रविवारीं होतो. वृद्धकालेश्वराचें स्थान फार पुरातन असून त्यांत एक मोठा कूप आहे.

त्यांतील जलाविषयीं अशी आख्यायिका सांगतात कीं, धन्वंतरी नामें जो महाचिकित्सक **वैद्य** होऊन गेला त्यानें आपल्या जवळील रसायनादि सर्व औषधें या कूपांत टाकलीं; व म्हणून कूपोदक पुष्कळ लोक नित्य पितात. हा कूप मंदिराचे अभ्यंतर भागीं एका उजाड चौकांत आहे. नित्य दोन चारशें लोक या कूपाचें उदक प्राशन करितात. या उदकाचा असा गुण सांगतात कीं, हें प्राशन केल्यानें शरीराची रक्तशुद्धि होऊन अंतर्बाह्य सर्व दोष नष्ट होतात. परंतु या युक्तींत कितपत् तथ्यांश असेल याविषयीं खात्रीलायक कांहीं आधार सांपडत नाहीं. कूपाजवळ एक मलिन पाण्याचें कुंड आहे यास '**अमृतकुंड**' अशी संज्ञा आहे. त्यांत महारोगी व इतर रोगग्रस्त लोक स्नान करितात. कुंडांतील जलाशय इतका घाणेरडा असतो कीं, जनावरें सुद्धां तें पाणी प्राशन करीत नाहींत; परंतु पुष्कळ भाविक जन हेंही उदक प्राशन करितात. कूपोदकाविषयीं कांहीं ह्मणणें नाहीं. कारण त्यांत क्षार फार आहे व ह्मणून उदकाचे अंगीं रोग शमन करण्याचा कदाचित् कांहीं गुण असण्याचा संभव आहे. परंतु या कुंडांतील उदक इतकें दुर्गंधयुक्त असतें कीं त्याकडे पाहवत सुद्धां नाहीं. श्रद्धेचें प्राबल्य अधिक ह्मटलें पाहिजे.

**१४. दुर्गेचा मेळा**:—हा श्रावणमासीं प्रति मंगळवारीं होतो; कधीं कधीं पंचवीस हजारांवर लोक जमतात. या

मेळ्यांत अधीक कांहीं वर्णनीय नाहीं ह्मणून आपण दुसऱ्या मेळ्यांकडे वळूं.

**१५. नागपंचमी मेळाः**—हा नागपंचमीचा सण सर्वत्र प्रसिद्ध आहेच. **काशींत** नागकुव्याजवळ एक मोठा मेळा होतो. या कुव्यास **कर्कोटक तीर्थ** अशी संज्ञा आहे. या मेळ्याविषयीं अधीक कांहीं लिहिण्यासारखें नाहीं. परंतु ह्या कूपाची रचना फारच चमत्कारिक आहे. एकंदरींत हा कूप प्रेक्षणीय आहे.

**१६. कजली मेळाः**—हा मेळा भाद्रपदमासीं तृतीयेचे दिवशीं शंकोधारानामें तीर्थाजवळ व ईश्वरी गंज मोहोल्यांत होतो. हा केवळ स्त्री जातीकरितांच मेळा आहे. मिरजापूराकडील एका राजानें हा उपस्थित केला. मिरजापूर तर या मेळ्याविषयीं प्रसिद्ध आहे. '**कजली**' ह्मणजे श्रृंगारिक गाणें वेश्या व इतर स्त्रिया गातात. शंकोधारातीर्थीं पुष्कळ स्त्रिया ही जलक्रीडाही करितात.

**१७. गणेशचतुर्थी मेळाः**—हा महोत्सव सर्वत्र होतोच यामुळें या स्थलीं अधिक उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु या क्षेत्रांतील एक चमत्कारिक चाल पुष्कळांस ठाऊक नसेल. हा मेळा 'बडा गणेश' मोहोल्यांत होतो. **यद्देशीय** लोकांत या दिवशीं उपवास करण्याची चाल आहे. रात्रौ शहरांत हिंडण्याफिरण्याची बिलकुल सोय नसते. केरकचरा, दगड वगैरे पदार्थ गल्लींतून जाणाऱ्याये-

णाऱ्यांवर फेंकून मारण्याचा प्रचार येथील लोकांत आहे. हा प्रचार उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. एकंदरींत ही चाल अनुकरणीय नसून अश्लाघ्य आहे.

**१८. दुर्गा अथवा कालीदेवता मेळा:**—हा मेळा दशाश्वमेध घाटीं आश्विन शुद्ध दशमीचे दिवशीं होतो. हा महोत्सव बंगाली लोकांत फार प्रिय आहे. सायंकाळीं **दशाश्वमेध** घाटावर फारच प्रेक्षणीय मौज असते. अक्राळविक्राळ देवीच्या मूर्ति पालखींतून मोठ्या थाटानें मिरवून त्यांस **गंगें**त बुडविण्याचा या घाटावर प्रचार या लोकांत आहे. हा मेळाही एक पाहण्यासारखा असतो.

**१९. धनत्रयोदशी मेळा:**—हा मेळा '**ठठेरी**' बाजारांत भरतो. हा दिवस दिवाळीचा असल्याकारणानें नगरवासी लोक मोठ्या आनंदांत असतात. व्यापारी, उदमी, दुकानदार सर्व लोक आपापलीं गृहें व दुकानें रंगवून फारच सुशोभित करितात. दुकानांत सुद्धां जिन्नस रचण्याची धाटणी मोठी अद्भुत असते; इतकेंच नव्हे, परंतु क्षणभर प्रेक्षकाचे चित्तास आनंद होतो. **ठठेरी** बाजार हा भांड्याचा बाजार आहे. यांतील दुकानांत सुरेख व नक्षीदार तांब्या पितळेची भांडीं हारीनें रचलेलीं पाहून ग्राहकांचें मन मोहून जातें. या दिवशीं कांहीं नवें भांडें विकत घेण्याचा **काशीं**तील लोकांचा परिपाठ आहे. दिवाळीचे चौथे दिवशीं एक रात्र **द्यूत** खे-

ळण्याकरितां सरकारी परवानगी असते. यामुळें सर्वत्र शहरभर द्यूतकुशल लोक आपापलीं दुकानें रस्त्यावर लावून खेळणाऱ्यांची वाटच पाहात असतात. या रात्रीं शहरांत लक्षावधी रुपयांची उलाढाल होऊन पोलिसासही चांगली मिळकत होते !

२०. **कार्तिकी पौर्णिमेचा मेळा:**—हा मेळा रात्रौ सर्वत्र घाटावर असतो. विशेषतः **पंचगंगा** घाटावरील दीपोत्सव प्रेक्षणीय असतो. बहुतेक सर्व घांटावर आतशबाजीचें दारूकाम सोडण्यांत येतें. **दुर्गा**घाटावरील '**मुक्कीचा**' अद्भुत खेळ या ठिकाणीं पहाण्यांत येतो. असा अपूर्व खेळ अन्यत्र कोठेंही होत नसेल. हा **मुक्की**चा खेळ येथील अहीर ( गवळी ) व महाराष्ट्र लोक यांत होतो. **मुक्की** लढण्यांत काशीकरांचीं मुलें फारच हुशार असतात. सहसा यांचा कधीं अपजय होतच नाहीं. ही लढाई केवळ हाताच्या पांच बोटांच्या मुष्टीनें होते, व बेधडक वाटेल त्या स्थानीं मारतात. पुष्कळ प्रसंगीं मुलांना अपघात होत असल्यामुळें सरकारनें हा खेळ सांप्रत बंद केला आहे; तथापि चोरून मारून हा होतोच. मुलांची तयारी पहिल्यापासून असते. आपल्या हाताचीं बोटें चांगलीं घटवून ठेवतात. हा **मुक्की**चा खेळ कार्तिक मासभर असतोच; परंतु पौर्णिमेचे दिवशीं शेंकडों जन हा खेळ पहाण्यास घाटावर जमतात. क्वचित् स्थानीं पंडित वर्गाचा घाटावर वादविवादही चाललेला पाहण्यांत येतो. खरोखरी हा देखावा अन्यत्र दुर्लभ होय.

**लोटा भंटा मेळा**:—हा मेळा पिशाचमोचन तीर्थाजवळ मार्गशीर्षमासीं चतुर्दशीचे दिवशीं होतो. '**लोटा-भंटा**' हें नांव पडण्याचें कारण इतकेंच कीं, त्या दिवशीं नागरीक लोक स्नानाकरितां लोटे घेऊन जातात, आणि '**भंटा**' ह्मणजे वांग्याची भाजी तेथें करण्याचा पुष्कळांचा प्रघात असल्यामुळें हें नांव प्राप्त झालें आहे. असो.

वर निर्दिष्ट केलेल्या मेळ्यांशिवाय आणखी लहान लहान पुष्कळ मेळे येथें होतात; परंतु त्या सर्वांचें वर्णन करणें वाचकांस कंटाळदायक होण्याची भीति आहे; सबब हें **मेळा** प्रकरण येथेंच संपवितों.



# भाग १५ वा.

## सारनाथ.

हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत एक समय असा आढळतो कीं, त्या समयीं ब्राह्मणधर्माचा अगदीं लोप झाला होता; व बौद्धमताचा प्रसार झाला होता. ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. विशेषेंकरून **काशी** क्षेत्र हें बौद्धमय झालें होतें, हें सिद्ध करून दाखविण्यास चांगला सबळ आधार आहे. बौद्धांचीं मनोहर कोरींव कामें त्यांचे प्राचीन दुर्बोध शिलालेख, त्यांच्या अद्भुत मूर्ति, त्यांचे विहार व त्यांच्या विध्वंस केलेल्या पवित्र मंदिरांचा अवशिष्ट भाग वगैरे पुरातन कामें, ज्यांचें अवलोकन करून सांप्रत पाश्चिमात्त्य देशांतील कुशल शिल्पकार सुद्धां थक्क होऊन जात आहेत अशीं अचाट कृत्यें या क्षेत्रांत अनेक अवलोकनांत येतात. या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या असतां ही गोष्ट निर्विवादपणें सिद्ध होते कीं, सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी येथें बौद्धांचें प्राबल्य फार होतें. ज्या कोणास प्राचीन शिल्पकलांचें ज्ञान करून घेणें असेल त्यास या स्थळाशिवाय अन्य स्थळ क्वचितच आढळेल. कित्येक पाश्चात्त्य पंडितांचें चित्त अलीकडे या हतभाग्य देशाची प्राचीन ऐतिहासिक माहिती मिळवून त्यापासून

कांहीं नवीन शोध लावण्याकडे गुंतलें आहे, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. परंतु आमच्या लोकांत असे यत्न जेव्हां सुरू होतील तो दिवस सुदिनच समजला पाहिजे.

बौद्धांच्या खाणाखुणा अथवा त्यांच्या ज्या कांहीं प्राचीन अद्‌भुत इमारती आहेत त्यांपैकीं **सारनाथ** हें एक होय. हें स्थान या क्षेत्राचे ईशान्येस सुमारें ४ मैलांवर असून त्या ठिकाणीं—सांप्रत मोडकळीस आलेले खरे परंतु मोठे भव्य असे दोन बुरूज आहेत. या प्रदेशास बौद्धकालीं '**मृगवन**' अथवा '**मृगदाव**' अशी संज्ञा होती. हल्लीं त्यास **सारनाथ** म्हणतात. ज्याप्रमाणें हिंदू मुसलमानांचीं पुण्यक्षेत्रें **काशी, मक्का,** आहेत तद्वतच हें स्थान बौद्ध मतानुयायांचें पवित्रस्थान आहे. ह्मणजे **चीन, जपान, ब्रह्मदेश,** इत्यादि देशांतील लोकांचें आगमन या क्षेत्रीं झालें असतां ते लोक या सारनाथाचें दर्शन घेऊन परत जातात. इतकेंच नव्हे, परंतु तेथील मृत्तिका स्वदेशीं घेऊन जातात. इतकी विलक्षण पूज्यबुद्धि या लोकांत या स्थानाविषयीं आहे. हा सर्व सपाट प्रदेश रमणीय असून, आम्रवृक्षांनीं गजबजलेला असल्यामुळें प्रेक्षकांस आनंद झाल्यावांचून राहत नाहीं. बुरुजाजवळ गेलें असतां तो अवलोकन करून एक प्रकारें विस्मययुक्त खेद वाटतो व मनांत अनेक तरंग येतात कीं या अशा अचाट इमारती बांधण्यांत त्या लोकांचे काय हेतु असावेत. केवळ धर्मस्मारक विजयस्तंभ बांधणें

होतें तर इतके श्रम, इतका काल, व इतकें द्रव्य खर्च करून त्यांस काय प्राप्ति झाली ? वगैरे नानाप्रकारचे वि- चार मनांत येऊन त्यांस मनोदेवता समर्पक प्रत्युत्तर देत नसल्यामुळें दुःखानें घरचा रस्ता धरणें भाग पडतें. असो.

वर निर्दिष्ट केलेल्या दोन बुरुजांपैकीं एक फार प्राचीन आहे; व दुसरा हा अर्वाचीन आहे हें पहातांक्षणींच ल- क्षांत येतें. पैकीं पहिला जो प्राचीन आहे त्यासंबंधीं आपणांस या भागांत विवेचन करणें आहे. हाच काय तो प्रेक्षणीय असून त्यावरील कोरींव काम मनोहर आहे. या बुरुजाचे आसपास विटांचे ढीग अस्ताव्यस्त पडलेले आज काल आढळतात; व मधून मधून छिन्नविछिन्न पाषाण मूर्ति अवलोकनांत येतात. हे बुरुज खोदून आंत कांहीं शिलालेख सांपडले असतां हिंदुस्थानच्या इतिहासांत बरीच भर पडेल या हेतूनें गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत कांहीं पाश्चात्य शिल्पकारविशारदांनीं अनेक उपाय केले. परंतु त्यांपासून फारसा फायदा झाला नाहीं. त्यापासून इत- काच फायदा झाला कीं, त्यांतून अनेक बुद्धाच्या मूर्ति, कांहीं चमत्कारिक वस्तु वगैरे हातीं लागल्या. हा सर्व व- स्तुसंग्रह येथील कॉलेजमध्यें जपून ठेवला आहे, व कांहीं वस्तु कलकत्त्यांतील एशियाटिक् सोसायटीचे वस्तुसंग्रहाल- यांत आहेत.

इ. स. चे पांचव्या आणि सातव्या शतकांत **फाहा- यन व हुएनसँग्** नांवाचे दोन चिनी प्रवासी हिंदुस्थानांत

आले होते असें प्रथम भागांत सांगितलेंच आहे. या दोघांनीं आपल्या प्रवास वर्णनांत या सारनाथाविषयीं थोडें वर्णन नमूद केलें आहे. पैकीं **फाह्यायनचें** वर्णन अगदीं त्रोटक आहे; परंतु **हुएनसंगनें** बरेंच वर्णन लिहिलें आहे. या दोघांची पुष्कळ एकवाक्यता आहे व त्यांत अतिशयोक्ति वगैरे कांहीं नाहीं. **हुएनसँगनें** प्रथमतः **काशी**राज्याचें वर्णन करून नंतर **सारनाथ**चें वर्णन केलें आहे. त्यांपैकीं कांहीं उतारे मी पुढें देतों.

तो ह्मणतो 'वाराणशीचे ईशान्येस अशोक राजाचा एक स्तूप (बुरुज) १०० फूट उंचीचा आहे. त्या समोरच थोड्या अंतरावर अस्मानी रंगाचा अगदीं चकचकीत व पारदर्शक एक पाषाणस्तंभ गोलाकृति आहे. त्यांत प्रेक्षकांचें आरशाप्रमाणें प्रतिबिंब दिसतें. सुमारें ४० लीचे अंतरावर नगराचे ईशान्येस एका उपवनांत एक मठ आढळतो. या उपवनास '**मृगदाव**' असें नांव असून त्याचे आठ भाग आहेत. व उपवनाचे सभोंवती तटबंदी आहे. उपवनांत अनेक पाषाणस्तंभ विभूषित राजवाडे, व पुष्कळ मठ आढळतात. या सर्व मठांत सुमारें १५०० विद्यार्थी बौद्ध मताचें अध्ययन करीत आहेत. मध्यभागीं एक विहार सुमारें २०० फूट उंचीचा असून त्यावर सोनेरी नक्षीदार काम आहे; व आसपास आम्रवृक्ष आहेत. बाह्यभागीं एकावर एक अशा शंभर विटांच्या कोनाड्यांच्या पंक्ति आहेत. त्या प्रत्येकांत एकेक सोनेरी मुलाम्याची

बुद्धाची प्रतिमा आहे, व अंतर भागीं बुद्धाची एक ताम्र-मूर्ति आहे.

'आग्नेयीस अशोक राजानें बांधलेला एक पाषाण बुरूज आहे; व त्याची उंची सुमारें १०० फूट आहे व त्यासमोर एक चकचकीत पाषाणस्तंभ सुमारें ७० फूट उंचीचा आहे. जे लोक नीतिमान् आहेत त्यांनीं या स्तंभांत पाहिलें असतां अनेक प्रतिमा त्यांस दिसतात. एथेंच प्रथम बुद्धानें धर्मोपदेश केला.'

'याच उपवनांत '**संग्राम**' मठ आहे. त्याचे पश्चिमेस एक स्वच्छोदकाचा जलाशय असून त्याचा परिघ सुमारें २०० कदमाचा आहे. मठाधिकारी या जलाशयाचा पाद-क्षालनार्थ उपयोग करितात.'

'पश्चिमेस थोड्या अंतरावर दुसरा एक मोठा जलाशय असून त्याचा परिघ सुमारें १२८ यार्डांचा आहे; व याचा उपयोग पात्रें धुण्यांत करितात.'

'आणखी उत्तरेस याहून मोठा जलाशय आहे, व त्याचा परिघ १९० यार्ड असून वस्त्रें धुण्याचे कामीं याचा उपयोग करितात. आंतील पाणी फार खोल असून उदक आरशाप्रमाणें स्वच्छ आहे. या उदकाचा असा गुण आहे कीं, यांत पापी जन स्नान केले असतां आंतील जलचर प्राणी त्यांस भक्षण करितात. परंतु धार्मिक व पापभीरु लोकांस जलचरांपासून मुळींच उपद्रव होत नाहीं.'


**हुएन्सँग** या स्थानाचें आणखी वर्णन करितो कीं, 'आग्नेयीस सुमारें ३–३ **लीचे** फासल्यावर एक स्तूप आहे त्याची उंची ३०० फूट असून हा सर्वांत भव्य व प्रेक्षणीय आहे; व त्यावर अमोल रत्नें जडविलीं आहेत.'

**हुएन्सँगनें** येणेंप्रमाणें या उपवनांतील आणखी अनेक बुरुजांचें व स्तंभांचें वर्णन दिलें आहे, व या ठिकाणीं ७०० विहार व अनेक स्तंभ आहेत असेंही तो लिहितो. परंतु सांप्रत फक्त दोनच बुरूज अस्तित्वांत आहेत. बाकी राजवाडे, महाल व जलाशय वगैरेंचा मागमूस सुद्धां लागत नाहीं. ठीकच आहे. काळाचे तडाक्यांतून कोण वांचला आहे? परंतु कालासही दोष न देतां मनुष्य जातीलाच देणें ठीक आहे. बौद्धांचा क्षय झाल्यावर ब्राह्मणांनीं आपल्या आनंदलहरींत त्यांच्या मंदिरांचा उच्छेद केला असावा असें कांहीं पाश्चात्य विद्वज्जनांचें ह्मणणें आहे. हें कदाचित् खरें असण्याचा संभव आहे. पण हें फक्त अनुमान आहे. बाकी ब्राह्मणांनीं धर्मसंबंधीं जुलूम व जांच केल्याविषयीं इतिहास कांहीं साक्ष देत नाहीं. असो. आतां आपण सांप्रतच्या बुरुजाकडे वळूं.

या बुरुजाचें एक अत्युत्कृष्ट व चटकदार वर्णन मे. जनरल **कनिंगह्यॅम** नांवाच्या एका शोधक पुरुषानें बंगाल्यांतील एशियाटिक् सोसायटीचे मासिक पुस्तकांत दिलें आहे. हें फारच मनोरंजक आहे, व तें सर्व या भागांत

देण्यास स्थलावकाश नाहीं, तरी पण त्यांतून एक दोन उतारे पुढें देतों:—

तो लिहितो, 'बौद्धांचा स्तूप हा गोलाकृति व उंच असून पायथ्याशीं त्याचा व्यास ९३ फूट आहे; व उंची जमिनीचे पृष्ठभागापासून १२३ फूट आहे.



सारनाथ बुरूज.

ह्या बुरुजाचा पाया मजबूत विटांनीं बांधिला असून तो जमिनींत खोल आहे. जमिनीपासून ४० फूट उंचीपर्यंत बांधकाम चनारगडमधील खाणींतल्या दगडांचें आहे;

व शिखरांवरील थोडा भाग वजा करून बाकी सर्व बांधकाम दगडाचें आहे. हे सर्व दगड लोखंडाच्या पट्यांनीं एक दुसऱ्यांशीं जोडले आहेत. त्यांवर मधून मधून वेलबुट्टीदार अत्युत्कृष्ट कोरींव काम केलेकें आहे. एकंदरींत हें काम दर्शनीय आहे.'

इ. स. १८३५ च्या जानेवारी महिन्याचे १८ वे तारखेस मे. ज. **कनिंगहॅम**नें बुरुजाचे शिखरावर जाण्याकरितां एक सोपानमार्ग केला. वर जाऊन त्यास पुष्कळ गवत आढळलें. तें सर्व उखडून बुरुजाचे अंतर्भागीं जाण्याकरितां वरून खालीं खोदण्यास त्यानें प्रारंभ केला. सुमारें १०–११ फुटांचे खोलीवर त्यास एक शिलालेख आढळला. अर्थात् हा बौद्धांचा असून अक्षरांची पद्धति तिबेटांप्रमाणें होती. या लेखावरून त्याचें असें अनुमान आहे कीं, हा बुरूज ख्रिस्तानंतर एक दोन शतकांत बांधला गेला असावा.

या बुरुजापासून अर्ध्या मैलावर दुसरा एक बुरूज आहे. हा सर्व विटांचा असून ७५ फूट उंच आहे. ह्यावर **हुमायून** बादशहानें एक अष्टकोनाकृति इमारत बांधिली होती ती आतां मोडकळीस आली आहे. **चेतसिंग** राजाचा दिवाण बाबू **जगतसिंग** नांवाचा होता त्यानें हा बुरूज मोडून त्याच्या विटांनीं **जगतगंज** नांवाचा मोहोल्ला बांधिला. हा बुरूज खोदण्याचें काम १७९४ च्या जानेवारी महिन्यांत चाललें असतां सुमारें २७ फुटांचे अंतरा-

वर मजूर लोकांस दोन पाषाण पात्रें सांपडलीं. त्यांपैकीं एकांत मनुष्यांचे अस्थिपंजर, मोत्यांचा चुरा व थोडेंसें सुवर्ण व हलकीं रत्नें सांपडलीं, व दुसऱ्यांत बुद्धाची मूर्ति व एक शिलालेख सांपडला. मूर्तीवर १०८३ संवत् होता. व शिलालेखांतील आशय असा आहे कीं, बंगालचा राजा **महिपाल** व त्याचे पुत्र श्री **स्थिरपाल** आणि **वसंतपाल** यांनीं धर्मस्मारक हा विजयस्तंभ उभारिला; इत्यादि.

मे. ज. **कनिंगहॅमचे** पश्चात् मेजर **किटो**, आणि मि. **टॉमस** वगैरे शोधक पुरुषांनीं आसपास पुष्कळ ठिकाणीं खणून आपल्या बुद्धिकौशल्यानें निरनिराळ्या स्थानांसंबंधीं लेख प्रसिद्ध केले आहेत. सारांश, इतकाच कीं, बौद्धमताचा ऱ्हास झाला खरा; परंतु असा प्रबल धर्म आपल्या देशांतून अगदीं नाहींसा झाला कसा हा मोठा गूढ प्रश्न आहे. याविषयीं मे. ज. **कनिंगहॅमचें** मत असें आहे कीं, "बौद्ध लोकांना शेवटीं शेवटीं हिंदुस्थानांतून हाकलून लावलें. त्यांचे मठाधिकारी ( महंत ) यांनीं जातां जातां बुद्धाच्या मूर्ति जमिनींत पुरून ते पळाले, व येथील लोकांनीं त्यांच्या इमारतींस आग लावून त्यांची राखरांगोळी केली असावी." येणेंप्रमाणें या बुरुजांचें वर्णन आहे.

# भाग १६ वा.

## काशींतील शिक्षण संस्था.

क्वीन्स् कॉलेजः–काशींत जीं अनेक विद्यालयें आहेत त्यांत **क्वीन्स् कॉलेज** हें अग्रगण्य आहे. हें विद्यालय शहरापासून एक मैल दूर असून त्याची इमारत प्रेक्षणीय आहे. इमारतीचें काम १८९३ सालांत पूर्ण झालें; व खर्च १,२६,९०० रुपये लागला. या विद्यालयाचे चतुष्कोनी चार घुमट असून मध्य घुमटाची उंची ७९ फूट आहे. ही दगडी इमारत भव्य असून आसपास मोठा बाग आहे; व यामुळें विद्यालयाला विशेष शोभा आली आहे. मुख्य द्वारानें आंत प्रवेश केला ह्मणजे एक मोठा हॉल लागतो; व डावे कडील बाजूस एका खोलींत अनेक प्राचीन व अर्वाचीन संस्कृत व इंग्लिश पुस्तकांचा संग्रह असून ताडपत्रावरील हस्तलेखादि ग्रंथ अनेक आहेत. या विद्यामंदिराचे बाह्य व अंतर्भागीं दगडावर सुभाषितें लिहिलीं असून ज्या लोकांनीं इमारतीला द्रव्यद्वारा मदत दिली त्यांचीं नांवें ही घातलीं आहेत. पुस्तकालयांत अनेक विषयांवर अनेक ग्रंथकारांचीं पुस्तकें आहेत. संस्कृत पुस्तकालयांत तर अगदीं दुर्मिळ असे ग्रंथ आहेत; व देखरेखीकरितां एक मनुष्य नौकर आहे. एकंदरींत पुस्तकालयाची व्यवस्था समाधानकारक आहे.

या कॉलेजचे दोन भाग असून एकास **संस्कृत डिपार्टमेंट** व दुसऱ्यास **इंग्लिश डिपार्टमेंट** असें ह्मणतात. निखालस संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची वेळ प्रातःकाळीं ६ पासून १० पर्यंत असते. या पाठशाळेंत संस्कृत शिक्षण अगदीं फुकट दिलें जातें. या संस्कृत **डिपार्टमेंट**-ला लागूनच एक इंग्लिश जाणणारा शास्त्री अध्यापक आहे. ही व्यवस्था दोन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां आहे. या खात्यांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां सहा वर्षांचा अभ्यास क्रम आहे; व तीन उच्च परिक्षा ठेविल्या आहेत. ह्मणजे **मध्यम** परीक्षा, **उत्तम** परीक्षा, व **आचार्य** परीक्षा. या शेवटच्या परीक्षेंत विद्यार्थी उत्तीर्ण झाला ह्मणजे त्याचा अभ्यास परीपूर्ण झाला.

या पाठशाळेंत संस्कृत भाषाच शिकणारे विद्यार्थ्यांची संख्या सुमारें ४०० वर येईल; व कॉलेजमध्यें जवळ जवळ १००० विद्यार्थी आहेत. संस्कृत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांस संस्थानिकांकडून स्कॉलरशिपा दिल्या जातात. विद्यमान अध्यापकांत महामहोपाध्याय पंडित **गंगाधर शास्त्री** हे सुप्रसिद्ध आहेत; हे उत्तम वैयाकरणी असून शीघ्र कवि आहेत. त्याचप्रमाणें महामहोपाध्याय पंडित **दामोदर शास्त्री** हे ही **काशींतील** पंडितांपैकीं एक विद्वद्रत्न आहे. महामहोपाध्याय पंडित **सुधारक** शास्त्री हे ज्योतिष शास्त्राचे प्रधान अध्यापक आहेत.

या कॉलेजच्या मागच्या बाजूस एक उंच गोलाकृति शिलास्तंभ आहे. त्याची उंची सुमारें २२ फूट असून त्यावर एक प्राचीन लेख आहे. हा लेख दुर्बोध असल्या कारणानें त्याचा काल अमुकच असें सांगणें कठीण आहे. तथापि बौद्धांचे कालचा तो असावा असें विद्वान् लोकांचें मत आहे. हा स्तंभ गाजीपूराजवळ सांपडला. तो त्यावेळचे लोकप्रिय पश्चिमोत्तर देशचे अधिपति मि. **टॉमसन** यांनीं आपल्या खर्चानें आणून कॉलेजमध्यें त्याची स्थापना केली.

या कॉलेजचे आजपर्यंत जे अनेक विद्वान् **प्रिन्सिपाल व अध्यापक** होऊन गेले त्यांत डा. **बॅलंटाईन** एम. ए. आर. टी. एच्. **ग्रिफिथ्** एम्. ए., डा. **फिडझ्वर्ड हॉल** डा. **कर्न,** डा. **म्यूर** वगैरे सर्व सुप्रसिद्ध आहेत. त्यांनीं आपल्या बुद्धिबलानें अनेक संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें केलीं आहेत व ते ग्रंथ जणुं काय त्यांचीं स्मारकेंच त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची अद्याप साक्ष देत आहेत. डा. **बॅलंटाईननें** सांख्याफिलासाफीचें अप्रतिम भाषांतर केलें आहे; **ग्रिफिथ**साहेबाचें इंग्लिश रामायण (काव्य) ज्यास निदान ऐकून ठाऊक नाहीं असा विद्वान् मनुष्य क्वचितूच आढळेल. तसेंच डॉ. **म्यूर** यांनीं जे कांहीं अनेक शोध लाविले आहेत त्यांमुळें त्यांचें नांव चिरकाल राहील असें ह्मणणें चुकीचें होणार नाहीं. सध्यां **आर्थर व्हेनिस** एम. ए. नांवाचें साहेब प्रिन्सिपाल आहेत. हे संस्कृत भाषेचे

इतके भक्त आहेत व त्यांचा व्यासंग इतका जबरदस्त आहे कीं, पुष्कळ वेळपर्यंत अस्खलित संस्कृत भाषेंत भाषण करितात, व ऐकणारास असें वाटतें कीं, संस्कृत म्हणुंकाय यांची मातृभाषाच आहे.

या कॉलेजपासून थोड्या अंतरावर एक **नॉर्मल** स्कूल आहे. या स्कूलमध्यें खेडेगांवांतील शाळांकरितां शिक्षक तयार होतात.

यांशिवाय आणखी अनेक मिशनरी लोकांनीं स्थापिलेल्या शिक्षणसंस्था आहेत. पैकीं **लंडन मिशन कॉलेज व जयनारायण** कॉलेज ह्या सुप्रसिद्ध आहेत. या दोन्ही संस्था जुन्या आहेत; व या ठिकाणींही पुष्कळ गरीब विद्यार्थी अध्ययन करितात.

**बंगालीटोला** हायस्कूल नामें एक शाळा त्याच नांवाच्या मोहोल्यांत आहे. ही संस्था नूतन असून त्यांत प्रवेश परीक्षेपर्यंत अभ्यास होतो. ही संस्था बंगाली लोकांनीं स्थापिली असून त्यांत चांगलें शिक्षण मिळतें असा लौकिक आहे.

सदरहूप्रमाणें कांहीं महाराष्ट्र तरुण व होतकरू लोकांनींही एक इंग्लिश स्कूल काढलें आहे. हें नूतन असून यांत महाराष्ट्रीय मुलांना इंग्लिश चार इयत्तापर्यंत शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे, हें स्कूल दुर्गाघाटावर असून तेथें एक लायब्ररीही आहे.

इ. स १८९८ चे जून महिन्यांत मिसेस् **बिझांट** या विदुषीनें **सेंट्रल हिंदू कॉलेज** नांवाचें एक मोठें विद्यालय स्थापन केलें आहे. या विद्यालयाचा उद्देश व हेतु काय, हें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेंच आहे. विद्यालयाची सर्व व्यवस्था मोठमोठ्या विद्वान् लोकांच्या एका कमेटीच्या स्वाधीन आहे. या कमेटीचे अध्यक्ष **काशी**चे महाराज आहेत; व त्यांनीं या पाठशाळेला लागणाऱ्या जागेकरितां ९० हजार रुपयांची जागा उदारबुद्धीनें फुकट दिली आहे!

हें विद्यालय काढण्याचा हेतु इतकाच आहे कीं, या देशांतील विश्वविद्यालयांतून जें सांप्रत शिक्षण दिलें जातें तें पाश्चात्त्य देशांतील पद्धतीस अनुसरून असून त्यांत धर्मशिक्षण मुळींच नसल्या कारणानें आपल्या आर्य-धर्माचीं तत्वें अथवा रहस्य यांविषयीं आधुनिक विद्वान् मंडळींत बरेंच अज्ञान असतें; व पाश्चात्त्य देशांतील तत्व-वेत्ते व शास्त्रज्ञ यांचे उदात्त विचारांचा त्यांचे मनावर चांगला ठसा बसल्यामुळें पुष्कळांना जुने तेवढें वाईट असें वाटूं लागलें आहे—व हें स्वाभाविकच आहे. या कारणा-मुळें आजकालच्या लोकांच्या मनाची प्रवृत्ति कांहींशीं ना-स्तिक होत चालली आहे. हे विचार नव्या अथवा भावी प्रजेच्या डोक्यांतून काढून त्यांऐवजीं आपल्या धर्मांत काय सांगितलें आहे आणि नीतीची इमारत कोणत्या तत्त्वांवर उभारिली आहे हें शिकविण्याचा ह्या संस्थेचा हा थोडक्यांत उद्देश आहे. हा हेतु सिद्धीस जाण्याकरितां लहान मुलां-

पासून तों थोर मुलांपर्यंत शिक्षणक्रम अशाच सोयीचा चालू केला आहे; व चांगल्या विद्वान् अध्यापकांची योजना केली आहे. इतकेंच नव्हे, परंतु प्रारंभापासून तों एम्. ए. एल्एल्. बी. व डी. एस्. सी. च्या उच्च पदवीपर्यंत शिकण्याची सोय या पाठशाळेंत केली आहे; व त्याबरोबर संस्कृत भाषेचेंही ज्ञान दिलें जातें.

या विद्यालयाचे चार भाग ह्मणजे, एक स्कूल, कॉलेज, बोर्डिंग व शारीरिक व्यायामाकरितां एक कसरतशाळा, असे आहेत. इतकी सर्व व्यवस्था असून अगदीं गरीबांपासून तों श्रीमान्पर्यंत सर्वत्रांस या संस्थेचा फायदा थोड्या खर्चांत घेता येईल अशी तजवीज केली आहे.

अशी संस्था चालविणें ह्मणजे एक दोघा गृहस्थांची शक्ति नाहीं. कमींतकमी ३०,००० तीस हजार रुपये सालीना खर्च लागेल असा अदमास आहे. ह्मणजे ७ लक्ष रुपयांचा फंड या संस्थेप्रीत्यर्थ जमा झाला पाहिजे; व १ लक्ष रुपये इमारती, लायब्ररी, सामानसुमान वगैरेकरितां पाहिजे आहेत. ह्मणून या संस्थेच्या चालकांनीं एक विज्ञप्तिपत्र काढलें आहे. त्यांत या संस्थेचा उद्देश, ख़र्च वगैरे सर्व माहिती दिली आहे. एक हजार रुपयाहून जास्त रक्कम देणाऱ्यांचीं नांवें स्मारकरूपीं विद्यालयांत लिहिलीं जातील असें प्रसिद्ध केलें आहे; व मोठी रक्कम देणाऱ्या उदार गृहस्थांच्या नांवानें फेलोशिप् ठेवून त्यांचीं नांवें अजरामर केलीं जातील असेंही प्रसिद्ध केलें आहे. शिवाय अगदीं

गरीब मनुष्यांनीं यथाशक्ति या संस्थेस मदत करण्याविषयीं मि. बिझांटनें मोठ्या कळकळीनें मागणी केली आहे. असो. ही संस्था बाल्यावस्थेंतच असल्यामुळें इष्ट हेतु कितपत् सिद्धीस जाईल हें सध्यां सांगणें कठीण आहे. परंतु हा उद्योग स्तुत्य आहे, इतकें ह्मटल्यावाचून राहवत नाहीं.


काशींत आणखी अनेक उपयुक्त संस्था व सभा आहेत, त्या सर्वांचें वर्णन येथें देतां येत नाहीं. परंतु कारमाईकल लायब्ररीविषयीं चार शब्द लिहिणें इष्ट आहे.

ही लायब्ररी विश्वेश्वराजवळ असून यांत बराच उपयुक्त पुस्तकांचा संग्रह आहे; व इंग्रजी, उर्दू, हिंदी प्रसिद्ध वर्तमानपत्रें असतात. सन १८७२त जेम्स कारमाईकल नांवाचे लोकप्रिय कमिशनर काशींत होऊन गेले, व ही लायब्ररी हें एक त्यांचें स्मारक आहे. वाचनाकरितां वर्गणी वगैरे कांहीं द्यावें लागत नसून फुकट आहे, व कधीं कधीं आल्यागेल्याचें व्याख्यानही होतें.

गेल्या २५-३० वर्षांत काशींत राजकीय, सामाजिक धार्मिक वगैरे अनेक उपयुक्त सभा अस्तित्वांत आल्या आहेत. या सर्व आपापल्या दिशेनें सुधारणाशकट हाकीत आहेत. पैकीं, काशी सुजन समाज हा राजकीय प्रकरणीं समाज असून लोकोपयोगी अनेक कामें या सभेनें बजाविलीं आहेत. तसेंच बंग साहित्य समाज, भारतवर्षीय आर्यधर्म प्रचारिणी सभा, काशीतत्व सभा, काशी

आर्यसमाज, लिटररी सोसायटी बनारस, नागरी प्रचारिणी सभा व काशी वक्तृत्वोत्तेजक सभा वगैरे अनेक उपयुक्त समाज, कांहीं जुने व कांहीं नवीन अस्तित्वांत आले आहेत.

स्टेशनापासून शहरांत येणाऱ्या राजमार्गावर **काशीचा टाऊन हॉल** लागतो. ही इमारत भव्य असून प्रेक्षणीय आहे. राज्ञीपुत्र **प्रिन्स ऑफ वेल्सचे** या क्षेत्रीं कांहीं वर्षींपूर्वीं आगमन झालें होतें, त्यावेळीं त्यांचे स्मरणार्थ हा हॉल बांधला व याचा उपयोग सार्वजनिक कामाकडे करितात.



# भाग १७ वा.

## काशीयात्रेविषयीं चार शब्द.

काशी क्षेत्रांत प्रतिवर्षी सुमारें १ लक्षावर यात्रा जमते. इतक्या लोकांतून कांहीं लोक मार्गांतच किंवा येथें आगमन झाल्यावर मृत्युमुखीं पडतात; पुष्कळांचे हाल होतात; पुष्कळांस येथील भाषा नीटपणें अवगत नसल्यामुळें येथील लुच्चे लफंगे वगैरे लोकांकडून फार त्रास होतो; पुष्कळ स्त्रियांची अप्रतिष्ठा व विटंबना होते; ह्या व अशा अनेक कारणांमुळें यात्रेकरूंचे अथवा यात्रेनिमित्त न येतां केवळ प्रवास करणाऱ्या लोकांचे हाल होतात. ह्मणून या शेवटल्या भागांत या किरकोळ गोष्टी संबंधीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत त्या अंमलांत आणल्या असतां बराच फायदा होईलसें वाटल्यावरून येथें दिल्या आहेत.

यात्रेकरू आपल्याकडून होईल तितक्या बंदोबस्तानें व तयारीनें निघतातच; परंतु प्रवासाचा फारसा अनुभव नसल्यामुळें कांहीं गोष्टी अखेरीस बाकी राहतात व मग प्रसंगीं त्यांची जरूरी लागल्यास स्मरणांतीं त्यांस वाईट वाटतें. ह्मणून त्यांनीं पुढील सूचना लक्षांत ठेवाव्या.

१. उत्तर हिंदुस्थानांत हवेचें प्रमाण कांहीं चमत्कारिक आहे, उन्हाळ्यांत अत्यंत उष्मा असतो व ह्मणून या दिव-

सांत कपड्यालत्त्याची मुळींच आवश्यकता नसते; परंतु थंडीच्या दिवसांत कडाक्याची थंडी असल्यामुळें चांगले गरम व उबदार असे भरपूर कपडे घेऊन यात्रेस निघावें. असें केलें असतां थंडीवाऱ्यापासून पुष्कळ रक्षण होईल. त्याचप्रमाणें उपासमार करून एकदम काशीचे तिकिट न घेतां मार्गांत मुक्काम करीत करीत जावें व एकदम जरी तिकिट घेतलें तरी १०० मैलांवर एक दिवस उतरण्याची सवलत असल्यामुळें त्याचा उपयोग न घेतां पुष्कळ लोक उपासमार करून दूरचा प्रवास कारितात याचें कारण काय असेल तें असो. पण यापासून अनेक तोटे आहेत. एक तर वेळचेवेळीं पोटांत अन्न न गेल्यामुळें शरीरांत अनेक दोष उत्पन्न होतात. पटकीचें हेंच प्रधान कारण जरी नसलें तथापि अशींच कांहीं तरी कारणें असावींत. या भयंकर रोगाचें मान काशींत इतकें असतें कीं, कधीं कधीं दोन दोनशें लोक एका दिवसांत मृत्युमुखांत पडतात! ज्या अर्थीं हा रोग यात्रिक लोकांतच अधिक प्रमाणानें असतो त्या अर्थीं मार्गांतच शरीरांत दोष उत्पन्न होत असावेत असें म्हणणें असंयुक्तिक होणार नाहीं. म्हणून यात्रेस निघतांना कॉलेरा पिल्स, (पटकीवर गोळ्या) प्रत्येक मनुष्यानें संग्रहीं ठेवाव्या.

२. मार्गांत स्वच्छतेनें राहण्याची विशेष खबरदारी घ्यावी व घामानें दुर्गंधयुक्त झालेले कपडे वापरूं नयेत. यावरून असें मात्र अनुमान काढूं नये कीं, प्रत्येकानें दररोज परीट घडीच घातली पाहिजे; हें सर्वांना शक्यही

नाहीं; पण मुक्कामांत स्वच्छ पाण्यांत धुवून वाळवून तेच कपडे घातले असतां बराच फायदा होईल.

३. मार्गक्रमणांत स्टेशनवर मिळत असलेले तेलकट पदार्थ मिठाई, चिवडा वगैरे मुळींच भक्षण करूं नयेत. त्यां ऐवजीं फळफळावळ खावी; अथवा याहीपेक्षां सुलभ उपाय ह्मटला ह्मणजे मुक्कामीं उतरून स्वयंपाक करून तो भक्षण केला असतां फारच उत्तम. याकरितां मोठमोठ्या स्टेशनांवर धर्मशाळा वगैरे सोयी आहेत.

आतां अशी कल्पना करूं कीं, आपण आतां काशीयात्रेकरितां निघालों आहोंत व जबलपुरास येऊन पोहोंचलों आहों. येथें आल्यावर आपणास प्रथमतः दुसऱ्या देशांत आहो कीं काय, असाच भास होतो. आपले आवडते परिचित शब्द आपणास ऐकूं येत नाहींत. जबलपुरापासून पुढें ऊर्दू किंवा हिंदी भाषा लागते. तसेंच पेहरावही कांहींसा भिन्न आढळतो; व क्वचित् स्थानीं बोडके बंगाली मधून मधून आढळतात. वाहनें ज्यांस इकडे एक्का ह्मणतात हीं देखील रथाकृति कांहीं चमत्कारिक अवलोकनांत येतात. यांत फक्त दोनच स्वाऱ्या बसतात, व त्यांत थोड्या ओझ्याचा समावेश होतो. परंतु भाडें थोडें ह्मणजे दोनतीन पैशांत मैल दोनमैल जातां येतें. असो. जबलपूर हें शहर नवीन वसलेलें असून टुमदार व स्वच्छ आहे. या ठिकाणाहून थोड्याच अंतरावर नर्मदेचा प्रवाह आहे, व त्या ठिकाणीं कांहीं खडक प्रेक्षणीय आहेत. जबलपुराहून प्रयागाचें भाडें

३ रुपये ( तिसऱ्या क्लासचें ) आहे. हा सुमारें १०-१२ तासांचा प्रवास आहे. मार्गांत फारसें अवलोकनीय कांहीं नाहीं. **अलाहाबाद** अथवा **प्रयाग** मुक्कामीं पोहोंचल्यावर प्रयागवळांच्या झुंडींच्या झुंडी मागें लागतात व 'आपला तीर्थोपाध्या कोण आहे' 'आपण कोठून आला' वगैरे प्रश्न करितात. यांच्याशीं जपूनच बोलावें. ज्यास्थानीं **गंगा, यमुना** संगम झाला आहे त्यास **प्रयागतीर्थ** अशी संज्ञा आहे व त्या भागास दारागंज असें ह्मणतात. हा संगम स्टेशनापासून चांगले ४ मैल आहे. स्टेशनवर थोड्या अंतरावर एक धर्मशाळा आहे. रात्रीं येणें झाल्यास धर्मशाळेंत उतरून प्रातःकाळीं एक्क्यांतून दारागजांत जावें. त्या स्थानीं महाराष्ट्र लोकांची वस्ती आहे. रात्रीं दारागंजांत न जाण्याचें कारण इतकेंच, कीं हा गंज शहरापासून दूर आहे व मध्यंतरीं वस्ती नसल्यामुळें चोऱ्या वगैरे होतात सबब ही गोष्ट यात्रेकरूंनीं अवश्य लक्षांत ठेवावी.

सदरहुप्रमाणें यमुनेचे कांठीं मुंबईच्या सुप्रसिद्ध **गोकुलदास** तेजपाल नांवाच्या उदार पुरुषानें एक धर्मशाळा हिंदु लोकांकरितां बांधिली आहे. स्वच्छतेच्या मानानें पाहिलें असतां हिची बरोबरी दुसरी कोणतीही धर्मशाळा करील असें वाटत नाहीं. ही धर्मशाळा स्टेशनापासून १॥ मैल अंतरावर आहे. वाटल्यास येथें उतरावें. परंतु प्रवासी जनांकरितां ही सोय चांगली आहे. यात्रेकरूंस दारागंजांत किंवा या धर्मशाळेच्या सन्निध असलेल्या कीडगंजांतच उतरलें पाहिजे.

**प्रयागास** पाहण्यासारखीं स्थानें ह्मटलीं ह्मणजे अकबर बादशाहाचा **भुईकोट** किल्ला होय. हा किल्ला संगमावर असून त्याचें बांधकाम चांगलें मजबूत आहे. या किल्ल्यांत **अक्षयवट** नांवाचें झाड आहे. यात्रिक लोक या झाडाचें दर्शन घेतात. या किल्ल्याचे बाहेर वाळवंटीं आल्यावर संगमाचा अपूर्व देखावा पाहिला असतां मनास जो कांहीं आनंद होतो त्याचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. एका बाजूस **गंगेचें** प्रचंड श्वेतपात्र व दुसरीकडे यमुनेचें कृष्णपात्र व दूरपर्यंत पसरलेला वालुकामय प्रदेश पाहून मन तल्लीन होतें. असो. **प्रयागास** क्षौर करण्याची चाल आहे. भाविक स्त्रियाही दोन बोटें वेणी **गंगेस** अर्पण करितात. मद्रासेकडील बायका तर सगळी वेणी अर्पण करितात. **काशी**प्रमाणें येथेंही **दशाश्वमेध** ह्मणून एक स्थान आहे. त्याठिकाणीं सांप्रत एक पिंपळाचा वृक्ष अवलोकनांत येतो. संगमावर पूजनविधि श्राद्धतर्पण ब्राह्मणभोजन वगैरे सर्व विधि यात्रिक लोकांस करावे लागतात. यात्रेच्या दिवसांत यात्रा फार असल्यामुळें व ब्राह्मणवस्ती थोडी असल्यामुळें कधीं कधीं श्राद्धास ब्राह्मण मिळत नाहींत व ह्मणून एथील ब्राह्मण दोन दोन तीन तीन वेळां श्राद्धें झोडण्यांत पटाईत झालेले आहेत.

यांखेरीज प्रेक्षणीय स्थान ह्मटलें ह्मणजे **अलाहाबाद** येथील **म्यूर सेंट्रल कॉलेज** होय. या इमारतीचें काम उत्तम असून ज्या कोणास संधि मिळेल त्यानें तें अवश्य पहावें. तसेंच **यमुने**वरचा दुमजली पूल हा देखील पहाण्यासारखा आहे. खालच्या मजल्यांतून माणसें व गाड्या

जातात; व वरून आगगाडी जाते. गाडींत बसून जातांना खालीं अवलोकन केलें असतां संथपणें वाहत असलेलें **यमुने**चें पात्र नेत्रास फारच आनंददायक दिसतें.

**अलाहाबादेहून काशीस** जाण्याकरितां निघालों असतां माणशीं १ रु. ६ आणे भाडें लागतें, व पांच तासांत मनुष्य पोहोंचतो. मध्यंतरी **मोगलसराईचें** औध रोहिलखंड रेलवे कंपनीचें जंक्शन लागतें. तेथें उतरून या लायनीचे गाडींत बसलें असतां पहिलें स्टेशन हें **काशी**चेंच आहे.

**काशीं**त आल्यावर **प्रयागा**प्रमाणेंच येथें आगतस्वागत करण्याकरितां बुभुक्षित लोक तयार असतात. त्यांच्या नादीं न लागतां एखादा 'एक्का' करून **दुर्गाघाटा**वर आलें असतां महाराष्ट्र लोकांची गाठ पडेल. नंतर एखाद्या चांगल्या गृहस्थास गाठून चार शब्द गोडीगुलाबीनें बोललें असतां रहाण्याची वगैरे सोय होण्यास फारसें कठीण पडणार नाहीं.

**काशीं**तील यात्रेसंबंधीं वर्णन पुस्तकांत आलेंच आहे व ह्मणून त्याची द्विरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. क्षेत्रीं आगमन झाल्यानंतर **काशीं**तील लोकांवर फारसा विश्वास ठेवूं नये. पैशासंबंधीं सर्व कामें यजमानानेंच खुद्द केलीं तर अधिक चांगलें. श्राद्धसंकल्प, ब्राह्मणभोजन वगैरे प्रसंगीं पुष्कळ तंटे बखेडे होतात व हें सर्व काम मक्त्यानें होतें. सबब यांत यजमानानें चांगलें लक्ष पुरवावें.

**काशीं**त कांहीं जिन्नस ह्मणजे कपडालत्ता वगैरे घेणें झाल्यास मोठ्या हुशारीनें घ्यावा. मालांत फार लबाडी असते.

काशींतील दलाल फार लुच्चे असतात. ह्मणून आपल्या ओळखीच्या विश्वासनीय मनुष्यामार्फत माल घ्यावा. नाहीं तर कधीं असें होतें कीं, १० रुपयाची चीज घेतली तर तिची खरी किंमत २ रुपये सुद्धां नसते. ही ठगविद्या रेशमी माल घेण्यांत फार आहे. तसेंच जरीचा माल घेणें झाल्यास तो देखील चांगल्या मनुष्याचे मार्फत घ्यावा. नाहींतर घेणाऱ्याच्या फटफजीतीस पारावार नसते.

यात्रेकरूंनीं एक इंग्रजी जाणणारा मनुष्य घेतल्यास चांगलेंच. परंतु हें सर्वत्रांस कसें साध्य आहे? नाहीं. परंतु रेल्वेगाईड तर अवश्य संग्रहीं ठेवावें. गाईड बरोबर असलें ह्मणजे '**गयेचें** काय भाडें' असें विचारण्याची पाळीही येणार नाहीं, व दुसऱ्याची खुशामत करायला नको. ज्यांना लिहितां वाचतां येत नाहीं त्यांची गोष्ट निराळी. परंतु चांगल्या सुशिक्षित लोकांस दुसऱ्याचे आर्जव करणें अयोग्य आहे. पुष्कळ लोक असे आढळतात कीं, अमक्या ठिकाणांहून अमक्या ठिकाणचें काय भाडें ह्मणून विचारतात विचारणाऱ्याला तर ठाऊक नसतेंच परंतु सांगणाऱ्यालाही ठाऊक नसतें, आणि उगीच वाद घालीत बसतात. शिवाय भाडें ठाऊक नसलें ह्मणजे रेल्वे स्टेशनावर तिकिट काढण्यांत मोठी पंचाईत पडते. इकडील रेल्वेवर लबाडीचा धंदा फार आहे. कांहीं गोष्ट विचारणें झाल्यास 'पैसा' हा शब्द पुढें असतो, बरें पैसा दिला तरी चांगल्या रीतीनें सोय लावतील? नाहीं. दुसरा कोणी तरी येतोच व त्यालाही थोडेंबहुत द्यावें लागतें. तिकीटें घेतांना ज्या स्थानीं जाणें असेल तेथपर्यंतच्या भाड्याची चांगली माहिती करून घेऊन

नेमकेच पैसे तिकिटवाल्यास द्यावे. कांहीं स्टेशनांवरील बाबू इतके लुच्चे असतात कीं, कमी जास्ती पैसे घेणें झाल्यास देतच नाहींत; व मग त्यांच्याशीं हुज्जत घालायची, कीं गाडीची वेळ संभाळावयाची? यापेक्षां ठराविक पैसे देणें चांगलें. त्यांचें हें असलें दुर्वर्तन चांगल्या लोकांशीं नसतें; परंतु विशेषेंकरून अशिक्षित लोकांशीं त्यांचें वर्तन वर लिहिल्या प्रकारचेंच कांहींअंशीं असतें. **जबलपूर, अलाहाबाद** व **काशी** या तीन स्टेशनांवर यात्रेकरूंनीं फारच जपून रहावें. येथें पुष्कळ चोऱ्या होतात. अस्तु. हा असा अंधार रेल्वेकडील अधिकारी कां बंद करीत नाहींत याचें मात्र आश्चर्य वाटतें!

## काशींत मिळणारे जिन्नस.

**काशींत** सर्व प्रकारचे जिन्नस तर मिळतातच; परंतु **काशींत** मिळणारे जिन्नस मात्र अन्यत्र मिळत नाहींत. येथें तांब्याचीं व पितळेचीं भांडीं फार सुरेख मिळतात; व त्यांवरील कोरीव काम फारच उत्कृष्ट असतें. प्रतिवर्षी शेंकडों रुपयांचीं भांडीं आंग्लदेशीय लोक विकत घेतात; यावरून लोकांची खात्री होईल कीं, भांडीं किती सुरेख बनतात. तसेंच रेशमी कपडे ह्मणजे **कद, पितांबर, पामऱ्या, लुगडीं** व **जरी**चें बहुमूल्य कापड हें तर सर्वत्र प्रसिद्धच आहे. सर्व प्रकारचा भाजीपाला, फळफळावळ स्वस्त व विपुल मिळतो. भाजीपाल्याचीं दुकानें रस्तोरस्तीं आढळतात. एवढ्या मोठ्या शहरांत मार्केट नाहीं असें एखाद्यास सांगितलें असतां त्यास आश्चर्य

वाटेल! परंतु वास्तविक स्थिति अशीच आहे. काशींत एकही मार्केट नाहीं. काशींत तंबाखू (ओढण्याची) ही तर सुप्रसिद्ध आहे. हीस 'गुडाखु' किंवा 'खम्मिरा' असें ह्मणतात. हा खम्मीरा १ रुपयापासून तों ८० रुपये शेरपर्यंत विकत मिळतो. धूम्रपानाचा येथें सार्वत्र प्रचार आहे. परंतु तद्देशीय ब्राह्मण लोक यास स्पर्शसुद्धां करीत नाहींत. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नाहींपेक्षां दक्षिणेंतील ब्राह्मण लोकांस विडीवांचून घटकाभरसुद्धां करमत नाहीं. धूम्रपानपात्रें ज्यांस 'हुक्का' अशी संज्ञा आहे हीं याच प्रांतांत **मुरादाबाद** नामें एक सुप्रसिद्ध शहर आहे तेथें चांदीसारख्या शुभ्र धातूचीं तयार होतात. या ठिकाणीं अनेक प्रकारचीं भांडीं ह्मणजे पेले, बशा, अत्तरदान, गुलाबदान, उपकरणीं वगैरे जिन्नस फारच सुबक हुबेहुब चांदीसारखे असून स्वल्प किमतींत विकत मिळतात. या सर्व जिन्नसांस 'मुरादाबादी जिन्नस' असें ह्मणतात. भांड्यावर अनेक प्रकारची वेलबुट्टीही असते. परंतु यांस किंमत जास्त पडते. जर्मनसिल्व्हरच्या भांड्यापेक्षां हीं भांडीं फारच चांगलीं असतात. वजनांत भारी असून पुष्कळ दिवस वापरलीं असतांही रंग फिक्का पडत नाहीं. अस्तु. काशींतील मृत्तिका पवित्र आहे असें लोक समजतात. व ह्मणून मृत्तिकापात्रें हीं फारच उपयोगांत येतात. धूम्रपानपात्रही एक मृत्तिकेचें मिळतें. यास 'गौरेया' असें ह्मणतात. हें पात्र अगदीं हुक्याचे आकृतीचें असून अति स्वस्त ह्मणजे दमडीपासून तों पैशापर्यंत लहान मोठे विकत मिळतें. तसेंच 'टिकिया' ह्मणून

रुपयाकृती कोळसा कुटून त्यांत भातांची पेज किंवा आणखी कांहीं चिकट पदार्थ घालून वाळवून त्याच्या वड्या केलेला पदार्थ विकत मिळतो; हा पेटवून अग्नीचे जागीं उपयोग करितात. सर्व प्रकारचीं मृत्तिकापात्रें गरीबापासून तों श्रीमंतापर्यंत लोक उपयोगांत आणितात; व ह्यासंबंधीं तेथें कोणीही बिलकुल विधिनिषेध मानीत नाहीं. अघेल्याचें सुगंधी तेल घेणें झाल्यास एका लोटाकृति मृत्तिकेचे शिशींत विकत मिळतें. एकंदरींत ही सर्व व्यवस्था पाहून मनास समाधान होतें. **दिल्ली, मथुरा, अयोध्या, आग्रा** वगैरे ठिकाणींही अशीच व्यवस्था आढळते.

**मिठाईवाल्यांचीं दुकानें:**—हीं दुकानें सर्व शहरभर आहेत. परंतु कांहीं दुकानें अशीं आहेत कीं तेथें निर्लेप, फराळाचें सामान विकत मिळतें. हीं दुकानें सर्वत्र नसून फक्त **दुर्गाघाट, पंचगंगाघाट** व **दशाश्वमेध** वगैरे घाटांवर क्वचित् ठिकाणीं आहेत. दूध, पेढे, बर्फी, जिलब्या व यांशिवाय अनेक मिष्ट पदार्थ स्वस्त किमतींत मिळतात. दुकानांची थाटणीही फारच चांगली असून स्वच्छता अधीक असते. मलाईची विक्री **काशींत** फार होते. याचें कारण इतकेंच कीं, येथील लोक भांग, अफू वगैरे पदार्थांचे व्यसनाधीन असल्याकारणानें या मादक द्रव्यास जे पदार्थ उताऱ्यापैकीं आहेत त्यापैकीं हा एक उतारा आहे. या दुकानांत '**दहींचक्का**' ह्मणजे घट्ट दही उत्तम मिळतें. तसेंच 'कुटू' ह्मणून एक फलाहारी जिन्नस मिळतो हा इतरत्र क्वचित्च आढळतो.

**काशींतील तांबोळीः**—तांबोळयांचीं दुकानें तर अनेक आहेत. येथें पानांचा खप फारच आहे. लहान मुलांपासून तों मोठ्या पुरुषांपर्यंत तांबुलभक्षणाचा सार्वत्रिक परिपाठ आहे. सायंकाळीं दुकानांवर मंडळीची बरीच गर्दी असते. दुकानांतील व्यवस्था व टापटीप पाहून खरोखरीच मनास एक प्रकारचें समाधान होतें. तांबोळयांची विडा लावण्याची सफाई व कात, चुना, सुपारी वगैरे सामान कसें स्वच्छ व वर्णनीय असतें! कितीही विडे भक्षण केलें असतां मनास कंटाळा येत नाहीं व जिव्हेचा स्वादही कमी होत नाहीं. असा या पानांचा कांहीं चमत्कारिक गुण आहे. दक्षिणेंतील तांबोळयाप्रमाणें कोरड्या काताचा खडा पानांत घालण्याची इकडे चाल नाहीं. कात प्रथमतः कुटून छानून व त्यांत कांहीं सुगंधी पाणी ह्मणजे गुलाबजल किंवा केवडाजल घालून आर्द्रता येण्याकारितां एका पात्रांत सदोदीत भिजत असतो. यामुळें विडा खातांना दातास खडा वगैरे कांहीं लागण्याचा संभव नसतो; तसेंच सुपारीही भिजलेली घातल्यामुळें विड्यास चांगला स्वाद येतो. ही गोष्ट अन्य तांबोळयांनीं अनुकरण करण्यासारखी आहे.

**मद्यपान**—हें **काशींत** अधिक आहे. अशा या पवित्र क्षेत्रीं असला प्रकार असणें हें अत्यंत अश्लाघ्य, निंद्य व तेथील लोकांस अत्यंत लाजिरवाणें आहे असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. असें ऐकण्यांत आहे कीं, **काशी** जिल्ह्यांत **अबकारी** खात्यापासून सरकारास पुष्कळ उत्पन्न आहे. अस्तु. हा प्रसार कांहीं अंशीं कमी होण्याची आशा

आहे. **काशींत** एक 'मद्यपान निषेध' संस्था स्थापन झाली आहे. या संस्थेंतील मेंबर लोक पुष्कळ मेहेनत करीत आहेत. ही एक अभिनंदनीय गोष्ट समजली पाहिजे. या गोष्टीवरून एक अनुमान करण्यास जागा आहे व ती ही कीं, अलिकडील सुधारकांवर मद्यमानासंबंधीं जो अक्षेप कांहीं लोक आणितात याचें कारण पाश्चत्यशिक्षण हें निराधार ठरतें. कारण वरील मद्यपानाचा प्रकार हा ज्यांस पाश्चात्य शिक्षणांचा गंध सुद्धां लागला नाहीं अशा लोकांतच आढळतो. **काशींतील** उच्च जातींत 'शाक्त' पंथी लोक अनेक आढळतात व त्यांत चांगले शास्त्री पंडित् ही आहेत!!

या क्षेत्राचे बाह्यभागीं अनेक उद्यानभूमिका व उपवनें आहेत. यांत श्रीमंत व भाग्यशाली लोक कधीं कधीं 'सैर' ह्मणजे सहल करण्यास जातात. यजुर्वेदी लोकांत हा प्रकार पुष्कळांशीं आहे. **डोहाळेजेवणा**ची चाल आमच्या लोकांत आहे व यथाशक्ति जो तो करतोच. परंतु येथील लोकांचा प्रकार अगदीं भिन्न आहे. द्रव्य नसलें तरी हरकत नाहीं परंतु घर गहाण ठेवून स्त्रीपुरुषांस या डोहाळेजेवणाप्रीत्यर्थ एक **वनभोजन** केलेंच पाहिजे!! व अशीं आज मित्तीस **काशींत** अनेक घरें गहाण आहेत. कारण या जेवणांत कमींत कमी त्यांना ९०० रुपये खर्च लागतो. हा खर्च केवळ भोजनाप्रीत्यर्थ नसून नाच, गाणें वगैरेचा यांत समावेश होतो. **तात्पर्य**—'ऋण काढून सण करणें' ही गोष्ट स्तुत्य नाहीं.

काशीयात्रा करून नंतर पुष्कळ लोक **गयेस** जातात. या तीर्थाचें महात्म्य पुराणांतरीं फार सांगितलें आहे. **काशीहून गयेस** जाणें झाल्यास २–२॥ रुपये भाडें पडतें. मध्यंतरीं **पुनःपुनः** ह्मणून एक तीर्थ आहे त्या ठिकाणीं स्नान करणाऱ्या लोकांच्या सोयीसाठीं आगगाडी उभी रहाते. तेथें स्नान करून नंतर **गयेस** जावें.

**गया** हें शहर बेहारप्रांताची राजधानी आहे. हें शहर **फल्गू** नदीचे कांठीं आहे. स्टेशनपासून गांव सुमारें २ मैलावर आहे. **गयेस** गेल्यावर प्रथमतः **विष्णु**पदाचें दर्शन घ्यावें लागतें. **विष्णु**पद ह्मणजे मोठ्या मनुष्याच्या पावला एवढें पाऊल आहे. यात्रिक लोक या पावलाची पूजा करितात. या पाऊलाविषयीं तेथील लोक अनेक गोष्टी सांगतात. कोणी ह्मणतो कीं, **श्रीविष्णु** चालत असतां हें पाऊल उमटलें. त्यांस 'एकच कां उमटलें' असें विचारिलें असतां 'दुसरें मक्केत आहे' ह्मणून सांगतात. असो. या पाऊलावर वडिलांच्या नांवानें जो कोणी पिंड देईल त्याचे पितर मुक्तीस जातात असें तेथील गयावळ लोक सांगतात. हें पाऊल एका देवळांत असून तें देऊळ मात्र प्रेक्षणीय आहे.

विष्णुपदाचें दर्शनानंतर **अक्षयवटाचें** दर्शन घेतात. **अक्षयवट** नांव पडण्याचें कारण इतकेंच कीं, येथें एक वडाचें झाड आहे. या वडाला लागून लहान लहान देवालयें आहेत. या ठिकाणीं पिंड दिले असतां हा वड चिरकाल सुख देतो असें सांगतात.

**गयें**त आणखी अनेक स्थानें गयावळ लोक दाखवितात. पैकीं एक खडक आहे. ह्या खडकास एक ४–५

हात भेग आहे. याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं धर्मराजाचे बंधु **भीमसेन** या खडकावर तर्पण करीत असतां गुडघा खडकांत शिरून भेग पडली. दुसरा एक खडक आहे त्यावर कांहीं खळगे आहेत. **ब्रह्मदेवानें** या ठिकाणीं कोट गाई दान दिल्या त्या या स्थानीं उभ्या राहिल्यानें हें देऊळ पडकें ह्मणून सांगतात. याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, या ठिकाणीं **गाय** दान दिलें असतां पुण्य आहे असें सांगतात. त्याचप्रमाणें **श्रीरामचंद्रानें** पिंडदान करते समयीं **दशरथांनीं** स्वर्गांतून पिंड घेण्याकरितां पुढें केलेल्या हाताची खुण एक दगडाचा हात व एक गोळाही एका देवालयांत गयावळ दाखवितात.

**गये**संन्निध एक दोन डोंगर आहेत; पैकीं एकाचें नांव **प्रेतपर्वत,** व दुसऱ्याचें नांव **रामपर्वत** आहे. हे दोन्ही सुवर्णाचे व रुप्याचे डोंगर व दुधाची **फल्गुनदी श्रीरामचंद्रानें गयावळांस** दान दिल्याबद्दल येथील लोक आख्यायिका सांगतात. इतकें देऊन जेव्हां **गयावळ** तृप्त झाले नाहींत तेव्हां **रामांनीं** हे दोन्ही डोंगर दगडाचे करून त्यांना शाप दिला. याच डोंगरावर मोठमोठीं दोन बिळें आहेत. त्यांस **विष्णु**योनी व **रुद्रयो**नी अशीं नांवें असून त्यांतून पाताळांत जाण्यास मार्ग आहे; वगैरे अनेक मनोरंजक गोष्टीं तेथील लोक यात्रिकजनांस सांगतात.

**फल्गुनदी**चे पात्र पावसाळ्यांत मोठें असतें; परंतु उन्हाळ्यांत पाणी आटतें. वाळवंटांत तेथील लोक मलमूत्र बिसर्जन करितात; यामुळें तेथील हवा दुर्गंधमय असते.

ही नदी उलटी वाहते असें पंडे भासवितात; परंतु अशा-तला प्रकार कांहीं नाहीं. वीत दोन वितीं खणलें असतां पाणी लागतें. परंतु अशा नद्या बेळगांव, कलादगी प्रांतांत असल्याचे ऐकिवात आहे. येणेंप्रमाणें हें गया वर्णन आहे.

**गये**पासून सुमारें १९ मैलांवर **बुद्धगया** नांवाचें देवालय आहे. हें देवालय प्राचीन असून यासंबंधीं मोठा वाद चाललेला आहे. सांप्रत हें हिंदूचें स्वाधीन आहे. परंतु जपान देशांतील बौद्ध लोकांनीं या देवळावर आपला हक्क लागू केला आहे. हें देवालय बौद्धांचें वेळचें प्राचीन असून शिल्पकाम उत्तम आहे. बुद्धांचें आगमन प्रथम याच ठिकाणीं झाल्याविषयीं विद्वान् लोकांचें मत आहे.

येणेंप्रमाणें या भागांत यात्रिकजनांकरितां कांहीं सूचना व त्रिस्थळी यात्रेसंबंधीं थोडी माहिती दिली आहे. इकडे यात्रेकरी लक्ष देतील अशी आशा आहे.



# भाग १८ वा.

## उपसंहार.

काशीक्षेत्राच्या आद्यस्थितीचें व सद्यस्थितीचें एक चित्र आतां वांचकांपुढें ठेविलें आहे. या चित्राचा कांहीं भाग प्रशंसनीय व कांहीं अप्रशंसनीय असेल. पण ह्याविषयीं येथें विचार कर्तव्य नाहीं. कारण "**भिन्नरुचिर्लोकः**" या उक्तीप्रमाणें या क्षेत्राच्या पुष्कळ बाबतींविषयीं विद्वज्जनांत व सामान्य लोकांत मतभेद असण्याचा संभव आहे; व तो असणें हें एकंदर देशाच्या प्रगतीस इष्टच आहे. कारण ज्या लोकांत भिन्नभाव, भिन्नमतें नाहींत, त्या लोकांत कोणतीही सुधारणा होणें शक्य नसतें. या क्षेत्रांतील लोकांचे आचारविचार, धर्मभोळेपणा त्यांच्या कोत्या समजुती वगैरे गोष्टींविषयीं त्यांस दोषदेतां येत नाहीं. कारण तेथील परिस्थितींत जितकें अंतर पडायला पाहिजे तितकें अद्याप पडलें नाहीं; व हें अंतर ज्या प्रमाणानें पडत चाललें आहे त्याप्रमाणें सुधारणाही होत चालली आहे, ही एक मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

हें क्षेत्र अवलोकन करण्याचे इच्छेनें दूरदूर देशांतून लोक येतात खरे; पण त्यांपैकीं पुष्कळ लोक येथील स्थिति पाहून दुःखानें परत जातात. '**दुरून डोंगर साजरे**' या

ह्मणीप्रमाणें प्रथमतः या क्षेत्राविषयीं जी पूज्यबुद्धि असते ती अंतस्थिति प्रत्यक्ष पाहिल्यानें नष्ट होते. हा पुष्कळांचा अनुभव आहे. याचें कारण काय व ही स्थिति दूर होण्यासारखी आहे, किंवा नाहीं व यासंबंधीं **काशीं**तील भिक्षुक लोकांची व विद्वज्जनांचीं काय कर्तव्यकर्मे आहेत हे प्रश्न साहजिकच उत्पन्न होतात.

प्रथमतः भिक्षुक लोकांचें इतकेंच कर्तव्यकर्म आहे कीं, यात्रेकरूंस जेणेंकरून फारसा त्रास होणार नाहीं अशा रीतीनें त्यांनीं त्यांची व्यवस्था केली पाहिजे; व जी कांहीं प्राप्ति होईल त्यांत संतोष मानून राहिलें पाहिजे. तसेंच शास्त्री व पंडित वगैरे विद्वज्जनांनीं केवळ वेदाध्ययन व शास्त्रपठण केलें ह्मणजे आयुष्याची इतिकर्तव्यता संपली असें न समजून धर्म रक्षण कोणत्या उपायानें होईल असे उपाय योजिले पाहिजेत. सांप्रत आपल्या धर्माची स्थिति किती शोचनीय आहे हें येथें सांगण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

अशा समयीं आमच्यांतील जुन्या व नव्या विद्वान् ह्मणविणाऱ्यांनीं जागृत होऊन हालचाल केली पाहिजे, व खऱ्या धर्माचा कित्ता लोकांपुढें ठेविला पाहिजे. राजनीति व धर्मनीति हीं समाजरूपीं शकटाचीं दोन चाकें आहेत व या दोघांना सारखी गति मिळाली असतां समाजाची उन्नति होईल. ह्मणून **काशीं**तील विद्वज्जनांनीं आजकालच्या आणीबाणीच्या प्रसंगीं स्तब्ध न राहतां पुढें येऊन सामाजिक सुधारणेसंबंधीं आपापलीं मतें निर्भिड व प्रांजलपणें समाजापुढें ठेविलीं पाहिजेत. हें **काशीस्थ शास्त्री** व **पंडि-**

त लोकांचें प्रधान कर्तव्यकर्म होय. कारण आर्यधर्माच्या सर्व शाखांचा उगम **काशींत** आहे ही गोष्ट लक्षांत बाळगिली असतां भावी सुधारणेचे आधारस्तंभ **काशीं**तील विद्वज्जनच होत असें प्रतिपादन करणें चुकीचें होणार नाहीं. प्रतिवर्षी पुष्कळ लोक–दुष्काळामुळें ह्मणा किंवा अन्य कारणांनीं ह्मणा–परधर्मांत जात आहेत, व ही स्थिति कांहीं शतकें चालली असतां **आर्यधर्माचा** समूळ नाश होईल यांत संदेह नाहीं; व मग अर्थात् **काशी**क्षेत्राची अविनाशित्वाबद्दल जी ख्याति आहे ती देखील नाहींशी होईल. ह्मणून समयास अनुलक्षून, परिस्थिति पाहून व राष्ट्रहित काय केल्यानें होईल यांवर मनन करून ज्या सामाजिक सुधारणेसंबंधीं मतैक्य आहे अशा सुधारणा अमलांत आणण्याविषयीं **काशीं**तील लोकांनींच पुढारीपण हातीं घेतलें पाहिजे.

**उदाहरणार्थः**–परदेश गमन या विषयावर सध्या मोठा कडाक्याचा वाद चालला आहे. तर परदेशांत जाऊन परत आलेल्या लोकांस प्रायश्चित्त देऊन पुन्हां जातींत घेण्याविषयीं **काशी**स्थ लोकांनीं खटपट केली पाहिजे. सदरहुप्रमाणें परधर्मांत जाऊन पश्चात्ताप झालेल्या लोकांस पुन्हां आपल्या धर्मांत घेण्याविषयीं सक्त उपाय अमलांत आणले पाहिजेत. तसेंच ज्या पोटजातींत अन्नव्यवहार आहे त्यांमध्यें बेटीव्यवहार करण्याची चाल सुरू झाली पाहिजे. त्यापासून भिन्नभिन्न जातींतील आपापसांत कलह नाहींसा होऊन ऐक्यभाव पुष्कळ वाढेल. याविषयीं **शंकरा-**

चार्यांनीं देखील अनुकूल मत दिलें आहे. ह्मणून काशीं-तील विद्वज्जनांस सरतेशेवटीं इतकी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं वार्षिक **धर्मपरिषद** एखाद्या स्थानीं भरवून त्यांत या विषयांचा उहापोह व निर्णय करून या सर्व सुधारणा अंमलांत आणण्याचा उद्योग केला असतां एक प्रकारें देशहित केल्यासारखें होईल, इतकेंच नव्हे पण भावी प्रजेवर महदुपकार केल्यासारखें होईल. इतकें सांगून हें आमचें पुण्यक्षेत्रवर्णन येथें समाप्त करितों.

समाप्त.

# [ परिशिष्ट अ. ]

## काशींतील २४ यात्रा.

| यात्रा. | देवता. |
|---|---|
| १. नित्य यात्रा ( लहान ) ... ... ... | १० |
| २. नित्य यात्रा ( मोठी ) ... ... ... | २६ |
| ३. अंतर्गृही यात्रा ... ... ... ... | १०० |
| ४. पंचतीर्थी यात्रा ... ... ... ... | १६ |
| ५. पंचक्रोशी यात्रा ... ... ... ... | १८६ |
| ६. छपन्न विनायक ... ... ... ... | ५६ |
| ७. बेचाळीस लिंगांची यात्रा ... ... ... | ४२ |
| ८. एकादश रुद्रयात्रा ... ... ... | ११ |
| ९. अष्टभैरव यात्रा ... ... ... ... | ८ |
| १०. द्वादशादित्य यात्रा ... ... ... | १२ |
| ११. अष्टवसु यात्रा ... ... ... ... | ८ |
| १२. नवदुर्गा यात्रा ... ... ... ... | ९ |
| १३. नवगौरी यात्रा ... ... ... ... | ९ |
| १४. चतुःषष्ठियोगिनी यात्रा ... ... ... | ६४ |
| १५. दक्षिणमानस यात्रा. ... ... ... | ११७ |
| १६. उत्तरमानस यात्रा ... ... ... ... | १२३ |
| १७. नगरप्रदक्षिणा यात्रा ... ... ... | ५५ |
| १८. सप्तऋषि यात्रा ... ... ... ... | ७० |
| १९. अष्टविनायक यात्रा ... ... ... | ८ |
| २०. द्वादश ज्योतिर्लिंग यात्रा ... ... ... | १२ |
| २१. नवग्रह यात्रा ... ... ... ... | ९ |
| २२. मोक्षप्रदक्षिणा यात्रा ... ... ... | ९३ |
| २३. अविमुक्ति प्रदक्षिणा यात्रा ... ... | ४९ |
| २४. सप्तपुरीयात्रा ... ... ... ... | ७ |

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | १० | मूळें | मुळें |
| ७ | २१ | हीनपणा, | हीनपणा |
| ९ | १९ | अज्ञानांधः | अज्ञानांध |
| १० | १८ | विपूल | विपुल |
| १९ | ८ | परीघ | परिघ |
| १७ | ७ | एक | एकसमयावच्छेदें |
| १७ | १७ | ग्रंथाचें | ग्रंथांचें |
| १७ | २२ | दृष्टी | दृष्टि |
| १८ | ७ | दंपत्याचें | दंपत्यांचें |
| १८ | १३ | त्यावरि | त्यांवरि |
| १८ | १९ | जितके | जितकें |
| २० | १९ | औंध | औंध |
| २१ | ७ | झाला, | झाला. |
| २१ | १९ | नाहीं | नाहीं; |
| २२ | ५-९ | अवश्यकता | आवश्यकता |
| २२ | १४ | विशारदवेत्त्यांनीं | वेत्त्यांनीं |
| २३ | २ | त्याच्या | त्यांच्या |
| २३ | ३ | विहिरीचा | विहिरींचा |
| २३ | ७ | गच्यावर | गच्यांवर |
| २३ | २२ | असे | आहे |
| २९ | १९ | कोरीव | कोरींव |
| २६ | ४ | लोकांची | लोकांचीं |
| २६ | ६ | जलोद्रार | जलोद्धार |
| २६ | १८ | निपूण | निपुण |
| २६ | २० | कर्मणुक | करमणुक |

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २७ | ८ | करावी | करावीं |
| २७ | १० | पृष्ट भागापासून | पृष्टभागापासून |
| २७ | १५ | हिदूची | हिंदूची |
| २७ | १५ | आहे | आहे; |
| २७ | १७ | आहे | आहे; |
| २७ | १८ | आहेत | आहे; |
| २८ | २० | अलिकडे | अलीकडे |
| २९ | ११ | वमत | (वाचू नये) |
| ३० | ४ | चालली; | चालली. |
| ३२ | १२ | ही | हीं |
| ३२ | १८ | लिंगाची | लिंगांची |
| ३२ | २२ | त्यावर | त्यांवर |
| ३३ | ४ | पहावे | पहावें |
| ३३ | १७ | हिंदूवर | हिंदूंवर |
| ३४ | १ | हिंदूंवर | हिंदूंचा |
| ३४ | १६ | कालगती | कालगति |
| ३९ | २ | घाटावर | घाटांवर |
| ४२ | २ | लागतो, | लागतो. |
| ४२ | ५ | प्रत्येकावरील | प्रत्येकीवरील |
| ४३ | १० | बहूत कोंरीव | बहुत कोरींव |
| ४५ | ९ | एक | एका |
| ४६ | १४ | आलों तर बाहेर | (वाचू नये) |
| ४६ | १५ | आहे | लागते |
| ४६ | १९ | गेलें | गेलों |
| ५२ | २ | भासवितात | भासवितात. |

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६३ | १७ | हरंतु | परंतु |
| ६७ | मथळा | प्रसिध्ध | प्रसिद्ध |
| ६७ | १४ | देवादिकास | देवादिकांस |
| ८१ | २ | देवादिकाचा | देवादिकांचा |
| ८१ | ४ | भरवानें | भैरवानें |
| ८४ | ३ | आणि | ( वाचू नये ) |
| ८४ | ८ | सूना | सुना |
| ९४ | ८ | गोष्ठ | गोष्ट |
| १०० | ९ | वडग | वङ्ग |
| १०० | २० | मूर्ती | मूर्ति |
| १०७ | ८ | प्राणि | प्राणी |
| १०८ | २० | पाहं | पाहूं |
| ११० | १३ | वर्गांची | वर्गांची |
| ११२ | १७ | रस्त्यावरील | रस्त्यांवरील |
| ११६ | ९ | मूर्ती | मूर्ति |
| ११६ | १८ | होते | होते. |
| १३० आणि १४० | मथळा | रामनगर उर्फ काशी | रामनगर ऊर्फ व्यास काशी (असें वाचावें.) |
| १४० | ६ | मंदीर | मंदिर |
| १४८ | ७ | घाटा | घाटां |
| १५३ | १९ | ही | ( वाचू नये ) |
| १६७ | २१ | सुधारक | सुधाकर |
| १८७ | ९ | हें | हे |
| १८७ | ६ | देऊळ | खळगे |